# सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. २० मे २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ३६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## ट्रम्प-शी भेटीच्या चौथ्या दिवशी चीन दौरा करून पुतिन यांनी गेम पालटला

## रशिया-चीनमध्ये कोण-कोणते करार होणार ?

वृत्तसंस्था

चीन : पश्चिम आशियात अमेरिका-इराण यांच्यातील संघर्षामुळे जगातील तेल बाजारातील समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. होर्मुझची सामुद्रधुनीतील जहाजणांची वाहतूक अक्षरशः ठप्प पडली असून या नाकाबंदीमुळे भारतासह अनेक देश त्रस्त झाले आहेत. भारतासोबत चीनला देखील अभूतपूर्व संकटाचा सामना करत असून या संकटाच्या पार्श्र्वभूमीवर रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन एका 'मास्टरप्लॅन'सोबत बीजिंगला पोहोचणार आहेत.



शी जिनपिंग यांच्यासोबतच्या भेटीदरम्यान रशियाच्या 'पॉवर ऑफ सायबेरिया २' या महत्त्वाकांक्षी गॅस पाइपलाइन प्रकल्पाला मंजुरी मिळण्याची शक्यता सध्या वर्तवली जात आहे. अलीकडेच, व्लादिमीर पुतिन यांनी 'ऊर्जा आणि तेल सहकार्याशी संबंधित 'जवळजवळ सर्व प्रमुख मुद्द्यांवर' चीनसोबत एकमत झाल्याची माहिती दिली होती.

रशियाच्या सायबेरियन प्रदेशातून मंगोलियामार्गे या महाकाय पाइपलाइनद्वारे चीनला कोणत्याही अडथळ्याशिवाय नैसर्गिक गॅसचा पुरवठा करण्याचा पुतीन यांचा प्लॅन आहे. मध्य-पूर्व आणि ऊर्जा बाजारातील अशांततेमुळे चीन आता वायूच्या किमतींवर वाटाघाटी करताना लवचिकता वखवतील अशी रशियाला अपेक्षा आहे.

तेल आणि गॅसचा पुरवठा करण्यासाठी महत्त्वाचा होर्मुझचा सागरी मार्ग बंद झाल्यापासून सुरक्षित पर्यायांचा तीव्र अभावामुळे चिनी अधिकाऱ्यांनी रखडलेल्या प्रकल्पावरील वाटाघाटींना गती देण्यास तीव्र स्वारस्य दाखवल्याचे सरकारच्या जवळच्या सूत्रांनी सांगितले. सप्टेंबरपर्यंत गॅसच्या किमतींवर अंतिम करार करणे रशियाचे मुख्य उद्दिष्ट आहे जेणेकरून पाइपलाइनचे बांधकाम सुरू करता येईल. पुतिन यांच्या चीन दौऱ्यातील अजेंड्यावर गॅस पाइपलाइन करार सर्वात महत्त्वाचा असल्याची रशियाचे परराष्ट्र धोरण सल्लागार युरी उशाकोव्ह यांनीही मान्य केले. पुतिन आणि शी जिनपिंग बुधवारी या विषयावर औपचारिक द्विपक्षीय चर्चा करतील आणि बुधवारी संध्याकाळी होणाऱ्या अनौपचारिक चहापानाच्या वेळी कराराचा तपशीलही निश्र्चित केला जाऊ शकतो.

२०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यावर पाश्र्चात्य देशांनी आणि युरोपियन युनियनने लादलेल्या कठोर निर्बंधांमुळे रशियाची पारंपरिक युरोपीय बाजारपेठ जवळजवळ पूर्णपणे बंद झाली. परिणामी, अर्थव्यवस्था टिकवण्यासाठी रशिया पूर्णपणे आशियाई बाजारांवर, विशेषतः चीनवर अवलंबून आहे. रशियाच्या हायर स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधील चीन तज्ज्ञ, वासिली काशिन म्हणतात की इराण युद्ध रशिया-चीन संबंधांसाठी नवीन उत्प्रेरक ठरत आहे.

त्याचवेळी, येत्या काही वर्षांत रशिया आपला दीर्घकाळचा ग्राहक असलेल्या युरोपपेक्षा सुमारे एक तृतीयांश कमी किमतीत चीनला गॅस विकेल अशी अपेक्षा आहे. या महायोजनेअंतर्गत २०२९ पर्यंत चीनला वार्षिक ५२.५ अब्ज घनमीटरपर्यंत रशियन गॅसचा एकूण पुरवठा करण्याचे लक्ष आहे.

## मोदीच्या आवाहनाला राज्यात चांगला प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचत आणि काटकसरीच्या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. आता राज्यातील सत्ताधारी नेत्यांचाही प्रतिसाद हा प्रत्यक्ष कृतीतून दिसू लागला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेही खाजगी विमानाऐवजी एअर इंडियाच्या प्रवासी विमानाने दिल्ली दौरा करत चर्चेत आले आहेत. त्याचवेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही इलेक्ट्रिक कारचा वापर सुरू केल्याने राज्यातील सत्ताधारी नेत्यांकडून 'काटकसरीचा संदेश' दिला जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

केंद्रीय नगरविकास विभागाच्या वतीने दिल्लीत आयोजित स्वच्छ भारत मिशन अर्बन २.० आढावा बैठकीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज दिल्लीला रवाना झाले. यावेळी त्यांनी नेहमीप्रमाणे खाजगी विमानाचा वापर न करता एअर इंडियाच्या प्रवासी विमानाने प्रवास केला. मुंबई विमानतळावर अनेक प्रवाशांनी त्यांच्यासोबत फोटो काढले, तर काहींनी निवेदनही दिली. सर्वसामान्य प्रवाशांप्रमाणे विमानतळावरील प्रक्रियेत सहभागी झाल्याने शिंदे यांच्या या दौऱ्याची चर्चा सुरू झाली.

जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि संभाव्य आर्थिक ताण लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी इंधन बचत आणि काटकसरीचे आवाहन केले होते. त्यानंतर राज्य सरकार पातळीवरही हालचाली वाढल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्र्यांसाठी काही मार्गदर्शक सूचना जारी केल्या होत्या. स्वतः फडणवीस यांनी काही दौऱ्यांसाठी इकॉनॉमी फ्लाइटने प्रवास केला होता. तसेच मंत्रालयात जाताना बाईकचा वापर केल्याने त्याचीही मोठी चर्चा झाली होती.

दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही पर्यावरणपूरक आणि इंधन बचतीच्या दृष्टीने इलेक्ट्रिक कारचा वापर सुरू केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे राज्यातील प्रमुख नेते आता प्रत्यक्ष कृतीतून 'इंधन बचत' आणि 'काटकसर' याचा संदेश देत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. याशिवाय, एकनाथ शिंदे यांनी आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्याही कमी केली आहे. तसेच हेलिकॉप्टर दौरे मर्यादित ठेवण्यावर भर दिला जात आहे. ईव्ही वाहनांचा वापर वाढवण्याबरोबरच सरकारी खर्चात बचत करण्याचा प्रयत्न राज्य सरकार पातळीवर सुरू असल्याची चर्चा आहे.

## 'गरीब नगर'वर रेल्वे प्रशासनाकडून हातोडा,

मुंबई : मुंबईतील वांद्रे येथील 'गरीब नगर' परिसरात पश्चिम रेल्वेकडून मोठी अतिक्रमण हटाव मोहीम सुरू करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर १९ ते २३ मेदरम्यान ही कारवाई केली जात असून रेल्वे जागेवरील अनधिकृत झोपड्या हटवण्यात येत आहेत. कारवाईदरम्यान कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी मुंबई पोलिस, रेल्वे पोलिस आणि जीआरपीचे सुमारे ४०० जवान तैनात करण्यात आले आहेत. रेल्वे प्रशासनाने ही मोहीम सुरक्षा आणि भविष्यातील रेल्वे क्षमता वाढीसाठी आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

## प्रशासनाविरोधात भाजयुमोचा धडक मोर्चा

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ प्रशासनाच्या कथित हलगर्जी आणि ढिसाळ कारभाराविरोधात मंगळवारी भारतीय जनता युवा मोर्चाच्या (भाजयुमो) कार्यकर्त्यांनी जोरदार आंदोलन छेडले. विद्यार्थ्यांचे निकाल सातत्याने रखडत असल्याने, परीक्षा प्रक्रियेत गोंधळ निर्माण होत असल्याने आणि प्रशासन विद्यार्थ्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत भाजयुमोने विद्यापीठ परिसरात धडक मोर्चा काढला. आंदोलनादरम्यान घोषणाबाजी, गोंधळ आणि तोडफोडीचे प्रकार घडल्याने काही काळ परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

## मनसेनं अंडा फेकत केलं आंदोलन

लातूर : नीट पेपरफुटी प्रकरणात शिवराज मोटेगावकर यांचे नाव समोर आल्यानंतर लातूरमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी उद्योग भवन परिसरातील ठउउच्या मुख्य कार्यालयासमोर आंदोलन केलं. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांच्या उपस्थितीतही मनसे कार्यकर्त्यांनी कार्यालयावर अंडे फेकत संताप व्यक्त केला.

## नाशिकमध्ये 'तीन तलाक' प्रकरण;

नाशिक : नाशिकमध्ये 'तीन तलाक' म्हणत पत्नीचा मानसिक आणि शारीरिक छळ केल्याप्रकरणी इंदिरानगर पोलिस ठाण्यात पतीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वडाळा गावातील संशयित पतीने पत्नीला माहेरून पैसे आणण्यासाठी वारंवार त्रास दिल्याचा आरोप आहे. तक्रारीनुसार, १५ मे रोजी रात्री संशयिताने पत्नीला 'तलाक, तलाक, तलाक' म्हणत मारहाण केली आणि घराबाहेर हाकलून दिले. पीडित महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी मुस्लिम महिला विवाह संरक्षण कायदा २०१९ अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## भटके कुत्रे हटवण्याच्या आदेशात दुरूस्ती नाहीच, SCचा निर्णय

दिल्ली : सर्वोच्च न्यायालय आज मंगळवारी रोजी भटक्या कुत्र्यांच्या व्यवस्थापनाबाबत सुनावणी झाली. नागरिकांच्या सुरक्षेचा मूलभूत अधिकार आणि प्राण्यांचे कल्याण यांच्यात समतोल साधण्याशी संबंधित महत्त्वाच्या कायदेशीर प्रश्र्नांवरील निकालाकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागून होतं. सर्वोच्च न्यायालयाने नोव्हेंबर २०२५ मध्ये दिलेल्या रूग्णालय, शाळा, कॉलेज, बस स्टेशन, रेल्वे स्टेशन इत्यादी सार्वजनिक ठिकाणांवरून भटकी कुत्री हटवण्याच्या आपल्या आदेशात दुरूस्ती करण्यास नकार दिला आहे.

## कोकणाला जलवाहतुकीने जोडणार : मुख्यमंत्री

तभा वृत्तसेवा

मुंबई : मुंबई महानगर आणि संपूर्ण कोकण किनारपट्टीचा प्रवास अधिक वेगवान, पर्यावरणपूरक आणि किफायतशीर करण्यासाठी राज्य सरकारने जलवाहतुकीचे जाळे विणण्यास सुरुवात केली आहे. मुंबई आणि आसपासच्या परिसरात पुढील तीन वर्षांत टप्प्याटप्प्याने तब्बल २७ आधुनिक जेट्टी कार्यान्वित करण्यात येणार असून, आगामी काळात ही जलवाहतूक सेवा संपूर्ण कोकण किनारपट्टीला जोडेल, अशी माहिती घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिली. मुंबईत आयोजित एका वृत्तपत्राच्या विशेष कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. लॉजिस्टिक आणि प्रवासी वाहतुकीसाठी रस्ते किंवा रेल्वेपेक्षा जलमार्ग हा सर्वात स्वस्त आणि वेगवान पर्याय असल्याने सरकार या क्षेत्राला सर्वोच्च प्राधान्य देत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले. ते म्हणाले, अनेक वर्षांपासून मुंबईत जलवाहतूक आणि 'रो-रो' सेवेबाबत केवळ चर्चाच सुरू होत्या. माझ्या मागील मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात आम्ही प्रत्यक्ष पावले उचलत भाऊचा धक्का ते मांडवा (अलिबाग) अशी रो-रो सेवा सुरू केली, जी आज प्रचंड यशस्वी ठरली आहे. याच धर्तीवर आता आम्ही संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्रात एकात्मिक जलवाहतूक व्यवस्था उभारण्याचे काम हाती घेतले आहे. मुंबई आणि उपनगरांना सागरी मार्गाने जोडण्यासाठी वेगवेगळ्या २७ ठिकाणी अत्याधुनिक जेट्टी आणि पायाभूत सुविधांचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. पुढील ३ वर्षांत ही कामे विविध टप्प्यांत पूर्ण केली जातील. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबईतील रस्त्यांवरील वाहनांचा ताण आणि प्रदूषण लक्षणीयरीत्या कमी होईल. मुंबईच्या या जलवाहतूक नेटवर्कचा विस्तार करून पुढे संपूर्ण कोकण किनारपट्टी जलमार्गाने मुंबईशी थेट जोडली जाईल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. 'लॉजिस्टिक' खर्च कमी होणार जलमार्गाच्या आर्थिक फायद्यांवर प्रकाश टाकताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, देशाच्या किंवा राज्याच्या आर्थिक विकासात लॉजिस्टिक कॉस्ट (वाहतूक खर्च) अत्यंत महत्त्वाची असते. रस्त्यांच्या तुलनेत जलमार्गाने होणारी वाहतूक ही अत्यंत स्वस्त असते. त्यामुळे प्रवासी वाहतुकीसोबतच मालवाहतुकीसाठीही हा जलमार्ग क्रांती घडवून आणेल. या शाश्र्वत पर्यायामुळे मुंबई ते कोकण प्रवासाचा वेळ कमालीचा वाचणार असून स्थानिक पर्यटनालाही यामुळे मोठी उभारी मिळेल, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

## शेतकरी कर्जमाफीच्या मार्गात विघ्न

## ३० जूनची डेडलाइन हुकण्याची शक्यता

तभा वृत्तसेवा

मुंबईः शेतकरी नेत्यांच्या आंदोलनानंतर काही महिन्यांपूर्वी राज्य सरकारने शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली. ३० जूनपर्यंत शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ दिला जाईल, असं सरकारकडून जाहीर करण्यात आलं आहे. मात्र केंद्रीय निवडणूक आयोगाने काल महाराष्ट्र विधानपरिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केली आहे. २२ जून रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर होणार असून २५ जूनपर्यंत हा निवडणूक कार्यक्रम संपणे अपेक्षित आहे. या पार्श्र्वभूमीवर विधानपरिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे शेतकरी कर्जमाफीची डेडलाइन हुकणार की काय, अशी शंका निर्माण झाली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघातील विधानपरिषदेच्या जागांसाठी निवडणूक होत आहे. या निवडणुकीत थेट सर्वसाामान्य मतदारांचा सहभाग नसतो. स्थानिक स्वराज्य सस्थांमध्ये निवडून आलेले लोकप्रतिनिधी या निवडणुकीत मतदान करत असतात. त्यामुळे शेतकरी कर्जमाफीचा निर्णय घेण्यासाठी ही निवडणूक अडसर ठरणार की नाही, याबाबत संभ्रम आहे. याबाबत राज्य सरकार नेमकी काय भूमिका घेणार, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

राज्य सरकारने शेतकरी कर्जमाफीचा निर्णय घेतला असून ३० जूनपर्यंत निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. काही दिवसांपूर्वीच याबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे की, ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात येईल. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदानही देण्यात येईल. कर्जमाफीची तयारी अंतिम टप्प्यात असून या संदर्भात मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली असून, अधिकची माहिती आल्यानंतर ३० जूनपूर्वी कर्जमाफी केली जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं होतं.

मागील अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या विधान परिषदेच्या निवडणुकांचा कार्यक्रम केंद्रीय निवडणूक आयोगाने सोमवारी जाहीर केला. त्यानुसार विधान परिषदेच्या १६ स्थानिक स्वराज्य प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणुकीसाठी येत्या १८ जून रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीची मतमोजणी येत्या २२ जूनला होणार आहे. त्याच वेळी नागपूर स्थानिक स्वराज्य प्राधिकारी मतदारसंघासाठी पोटनिवडणूक होणार आहे.

राज्यातील बहुतांश स्थानिक निवडणुका पार पडल्या आहेत. निवडणूक होऊ घातलेल्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांत ७५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त मतदार आहेत. यासंदर्भात राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणुकांबाबतचा प्रस्ताव केंद्रीय निवडणूक आयोगाला सादर केला होता. या प्रस्तावाआधारे निवडणूक आयोगाने विधान परिषदेच्या निवडणुकीचा कार्यक्रम सोमवारी घोषित केला.

दरम्यान, महसूल मंत्री आणि भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे हे २०२२मध्ये नागपूर स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून निवडून गेले होते. मात्र, २०२४मध्ये विधानसभेवर निवडून आल्यानंतर, त्यांनी विधान परिषदेचा राजीनामा दिला. नागपूरच्या जागेची मुदत १ जानेवारी २०२८ रोजी संपत आहे. त्यामुळे नागपूर पोटनिवडणुकीत निवडून येणाऱ्या उमेदवाराला विधान परिषदेचा जेमतेम दीड वर्षांचा कालावधी मिळणार आहे.

## मोबाईलमधील इंटरनेट आणि UPI सेवा ठप्प होणार ?

### इराणच्या खळबळजनक वक्तव्याने उडाली तारांबळ!

वृत्तसंस्था

इराण : आजच्या काळात श्र्वास घेण्याइतकेच इंटरनेट गरजेचे झाले आहे. सकाळच्या अलार्मपासून ते रात्रीच्या सोशल मीडिया (डेलळरश्र चशवळर डलीश्रश्रळपस) स्क्रोलिंगपर्यंत, आणि रस्त्यावरच्या चहावाल्याला णझख पेमेंट करण्यापासून ते ऑफिसच्या महत्त्वाच्या कामांपर्यंत सर्व काही इंटरनेटवरच अवलंबून आहे. पण, तुमचे हे डिजिटल आयुष्य आता एका मोठ्या संकटात सापडण्याची शक्यता आहे. इराण (खीरप) आणि अमेरिका (-ाशीळलर) यांच्यात धुमसत असलेल्या युद्धाचे ढग आता केवळ सीमेवर किंवा शेअर बाजारापुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर ते थेट तुमच्या स्मार्टफोनच्या स्क्रीनपर्यंत पोहोचले आहेत. युद्धाच्या या नव्या तंत्रामुळे संपूर्ण जगाची चिंता वाढली आहे.

अनेकांना वाटते की इंटरनेट हे सॅटेलाईटद्वारे हवेतून चालते. मात्र, सत्य हे आहे की जगातील तब्बल ९९ टक्के इंटरनेट हे समुद्राच्या खोल तळाशी पसरलेल्या 'सबमरीन फायबर ऑप्टिक केबल्स' च्या महाकाय जाळ्यावर चालते. याच पार्श्र्वभूमीवर इराणचे लष्करी प्रवक्ते इब्राहिम जोल्फाघरी यांनी 'एक्स' (द) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक अत्यंत खळबळजनक घोषणा केली आहे. त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, इराण आता समुद्राखालून जाणाऱ्या या आंतरराष्ट्रीय इंटरनेट केबल्सवर 'टोल' (कर) आकारण्याच्या तयारीत आहे. याचा सरळ अर्थ असा की, दिग्गज टेक आणि टेलिकॉम कंपन्यांना आता इंटरनेटची देवाणघेवाण करण्यासाठी इराणला मोठी किंमत मोजावी लागू शकते. यामागील भूराजकीय आणि तांत्रिक गणित समजून घेतल्यास परिस्थितीचे



गांभीर्य अधिक स्पष्ट होते. आखाती देशांमधील 'स्ट्रेट ऑफ होर्मुज' हा समुद्रधुनीचा भाग आतापर्यंत केवळ खनिज तेलाच्या वाहतुकीसाठी जगातील सर्वात संवेदनशील मार्ग मानला जात होता. पण, आता तो जागतिक इंटरनेटचा 'किल स्विच' (घळश्रश्र ड्ढ्ढीलह) बनला आहे. टेलिजिओग्राफी या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या आकडेवारीनुसार, याच अरुंद सागरी मार्गाच्या खालून आशिया, आफ्रिका आणि युरोप खंडांना जोडणाऱ्या अनेक महत्त्वाच्या केबल्स जातात. यामध्ये प्रामुख्याने खालील केबल्सचा समावेश आहे:

या जागतिक वादाचा भारताला काय फटका बसेल? तर याचे उत्तर भारतासाठी धोक्याची घंटा देणारे आहे. समुद्राखालून जाणाऱ्या या आंतरराष्ट्रीय केबल्स भारताच्या डिजिटल कनेक्टिव्हिटीचा कणा आहेत. या प्रमुख केबल्स थेट भारताच्या मुंबई आणि चेन्नईच्या समुद्रकिनाऱ्यांवर येऊन मिळतात (डरपवळपस डीरींळेपी). रिलायन्स जिओ आणि भारती एअरटेल यांसारख्या भारतातील आघाडीच्या टेलिकॉम कंपन्या याच आंतरराष्ट्रीय नेटवर्कवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहेत. जर इराणने आपला शब्द खरा करत या केबल्सवर टोल लादला किंवा युद्धात या केबल्सचे नुकसान झाले, तर भारताचा युरोप, आफ्रिका आणि आखाती देशांशी असलेला डिजिटल संपर्क मोठ्या प्रमाणावर विस्कळीत होईल.

जर खरोखरच ही परिस्थिती ओढवली, तर भारतातील कोट्यवधी युजर्सना याचा भयंकर फटका बसेल. या निर्बंधांमुळे केवळ इंटरनेटचा वेगच मंदावणार नाही, तर कंपन्यांचा खर्च वाढल्याने इंटरनेटचे प्लॅन्स प्रचंड महाग होऊ शकतात. सर्वात मोठा फटका बँकिंग क्षेत्र, रोजचे 'णझख' पेमेंट्स, वर्क फ्रॉम होम करणारे कर्मचारी आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला बसेल. समुद्राच्या हजारो फूट खाली जाऊन बिघाड झालेल्या केबल्स शोधणे आणि त्या दुरुस्त करणे हे अत्यंत आव्हानात्मक आणि वेळखाऊ काम असते. त्यामुळे, महासत्तांमधील हा भूराजकीय वाद जर वेळीच मिटला नाही, तर येणाऱ्या काळात संपूर्ण जगाला एका अभूतपूर्व 'डिजिटल महामंदीचा' सामना करावा लागू शकतो.

## 'ट्रम्प आणि नेतन्याहूंना मारणाऱ्याला मिळणार ५६० कोटी

### ब्रिटिश मीडियाचा दावा

वृत्तसंस्था

इराणः मध्य-पूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्र्वभूमीवर अमेरिका, इस्रायल आणि इरामधील युद्ध परिस्थिती आता टोकाच्या वळणावर पोहोचले आहेत. इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनेई यांच्या निधनानंतर हा संघर्ष अधिक तीव्र झाला असून, इराणच्या संसदेत आता एका अत्यंत वादग्रस्त कायद्यावर चर्चा सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांना जीवे मारणाऱ्या व्यक्तीला कोट्यवधी रुपयांचे इनाम देण्याबाबतचे एक विधेयक इराणच्या संसदेत मंजुरीसाठी आणले जात असल्याची खळबळजनक बातमी समोर आली आहे.

ब्रिटीश वृत्तपत्र टेलीग्राफ यूके आणि ज्यूइश क्रॉनिकलच्या अहवालानुसार, इराणच्या राष्ट्रीय सुरक्षा आयोगाचे अध्यक्ष इब्राहिम अजीजी यांनी दिलेल्या माहितीनुसार, इराणच्या संसदेत एक नवीन बिल तयार केले जात आहे. या बिलाच्या अंतर्गत डोनाल्ड ट्रम्प यांना मारणाऱ्या व्यक्तीला ५० मिलियन युरोचे म्हणजेच ५६० करोड रुपयांचे बक्षीस दिले जाईल. इराणच्या राष्ट्रीय सुरक्षा समितीचे उपाध्यक्ष महमूद नबावियन यांनीही या बातमीला दुजोरा दिला आहे. संसद लवकरच या मोठ्या बक्षीसाच्या प्रस्तावावर त्यांची मते स्पष्ट करणार आहेत.

दरम्यान, इराण सरकाने असा दावा केला आहे की, २८ फेब्रुवारी रोजी इराणवर झालेल्या हल्ल्यासाठी डोनाल्ड ट्रम्प, बेंजामिन नेत्यानहू आणि अमेरिकन सेंट्रल कमांडचे एडमिरल ब्रॅड कूपर हे जबाबदार



आहेत. या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनेई यांचा मृत्यू झाला होता. इराणने या नेत्यांना इशारा दिला असून, त्यांना या कारवाईचे परिणाम भोगावे लागतील असे म्हटले आहे. हा प्रस्तावित कायदा म्हणजे आतापर्यंत मर्यादित असलेल्या धमक्यांना आता थेट संसदेच्या अधिकृत कारवाईचे स्वरूप देण्याचा प्रयत्न मानला जात आहे.

इराणमधील एक अत्यंत प्रभावी, कट्टरपंथीय नेते महमूद नबावियन यांनी त्यांच्या अधिकृत एक्स अकाउंटवर लिहिले होते की, इराण किंवा त्यांच्या नेतृत्वाविरुद्ध भविष्यात कोणतीही लष्करी कारवाई झाल्यास, त्याचा परिणाम केवळ अमेरिका किंवा इस्रायललाच नाही, तर त्यांना पाठिंबा देणाऱ्या इतर प्रादेशिक अरब देशांनाही भोगावे लागतील. यापूर्वी इराणमधील काही सरकार-समर्थक संघटनांनी ट्रम्प यांच्या विरोधात कोट्यवधि डॉलर्सचा निधी गोळा केल्याची बातमी इराण वायरने दिली आहे.

दरम्यान, २०२६ या वर्षाच्या सुरुवातीला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला इशारा दिला होता की, जर इराणने अमेरिकेच्या कोणत्याही नागरिकाला किंवा नेत्याला इजा पोहोचवण्याचा प्रयत्न केला तर इराणला गंभीर परिणामांना समारे जावे लागेल.

नबावियन यांनी ट्रम्प आणि नेत्यानहू यांना मारणाऱ्याला बक्षीस देण्याच्या बातमीला दुजोरा दिला होता. पण सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सच्या पॉलिसीनुसार, कोणालाही कोणत्याही देशाच्या प्रमुखाला किंवा व्यक्तीला अशी थेट जीवे मारण्याची धमकी किंवा हिंसक मजकूर असलेली पोस्ट शेअर करता येत नाही. त्यामुळे एक्सकडून त्यांचे अकाउंट सस्पेंड होऊ नये यासाठी ही पोस्ट नंतर त्यांच्या अकाउंटवरून हटवण्यात आली. अशा प्रकारच्या पोस्टमुळे इराणवर आतंरराष्ट्रीय स्तरावर मोठा राजनैतिक दबाव येतो. त्यामुळे हा कायदा अधिकृतपणे संसदेत येण्यापूर्वीच ही पोस्ट डिलिट करण्यात आली.

## ३ लाख हायब्रिड वाहन विक्रीचा ऐतिहासिक टप्पा गाठला

छत्रपती संभाजीनगर : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज आपल्या इलेक्ट्रिफिकेशन/मल्टीपाथ वे प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा जाहीर करत भारतात एकत्रितपणे ३ लाख हायब्रिड वाहन विक्री पूर्ण केल्याची घोषणा केली. हा टप्पा शाश्वत गतिशीलतेला चालना देण्याच्या दिशेने मोठे पाऊल मानला जात असून, हायब्रिड तंत्रज्ञानावरील ग्राहकांचा वाढता विश्वासही अधोरेखित करतो. हा टप्पा भारतीय ग्राहकांमध्ये सेल्फ-चार्जिंग हायब्रिड इलेक्ट्रिक व्हेईकल (एसएचईव्ही) तंत्रज्ञानाच्या वाढत्या स्वीकाराचे प्रतीक आहे. उत्तम इंधन कार्यक्षमता, कमी उत्सर्जन, अधिक चांगली ड्रायव्हिंग परफॉर्मन्स आणि सहज मालकी अनुभव याबाबत वाढती जागरूकता यामागील प्रमुख कारणे आहेत. तसेच, हा टप्पा टोयोटा ब्रँडवरील ग्राहकांचा दृढ विश्वास अधोरेखित करत असून, मल्टी-पाथवे दृष्टिकोनाद्वारे हरित गतिशीलता उपाय उपलब्ध करून देण्याच्या कंपनीच्या वचनबद्धतेलाही अधोरेखित करतो.

## क्लिअरक्लेम तर्फे राष्ट्रीय पातळीवर जनजागृती

छत्रपती संभाजीनगर : भारतामध्ये सध्या सुमारे ४,००,००० कोटी (५० अब्ज अमेरिकन डॉलर्स) इतकी मोठी रक्कम शेअर्स, लाभांश आणि इतर आर्थिक मालमत्तांच्या स्वरूपात निष्क्रिय व अदावी आहे. माहितीच्या अभावामुळे, जुने कागदपत्रे हरवणे, पत्ता बदलणे व नोंद न करणे किंवा मूळ गुंतवणूकदारांचे निधन यामुळे अनेक गुंतवणूकदार व त्यांचे कायदेशीर वारस आपली गुंतवणूक परत मिळवू शकत नाहीत. क्लिअरक्लेम ही गुंतवणूकदार सेवा व रिकव्हरी प्लॅटफॉर्म संस्था देशभरात आपली कार्यक्षमता वाढवत आहे. जुन्या, विस्मरणात गेलेल्या गुंतवणुकी परत मिळवण्यासाठी क्लिअरक्लेम संपूर्ण प्रक्रियेसाठी सेवा देते. डीमॅट प्रोसेस मध्ये विलंब, जुन्या गुंतवणुक कागदपत्रे गहाळ होणे किंवा कुटुंबातील सदस्यांना माहिती नसणे यामुळे अनेक गुंतवणूकदार अडचणीत सापडतात. सलग सात वर्षे लाभांश न मिळाल्यास शेअर्स IEPF कडे वर्ग होतात, ज्यामुळे त्यांना परत मिळवणे कठीण व वेळखाऊ बनते.

## एमबँक ला मिळाले इंटरनेट बँकिंग लायसन्स

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्रातील सर्वात विश्वासार्ह नागरी सहकारी बँकांपैकी एक असलेल्या एमबँक, दि मुस्लिम को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडला आरबीआय कडून इंटरनेट बँकिंग लायसन्स मिळाले आहे. बँकेच्या ग्राहकांसाठी यामुळे डिजिटल बँकिंगचा नवा अध्याय सुरू होत आहे. आजवर क्लायंट्सपुढे एक मोठी मर्यादा होती ती म्हणजे डिजिटल पद्धतीने पैसे स्वीकारता येत होते, मात्र बल्क आउटवर्ड पेमेंट म्हणजेच पगार, व्हेंडर वितरण, सप्लायर सेटलमेंट या प्रत्येकासाठी स्वतंत्र चेक द्यावा लागत होता. जितके कर्मचारी, तितके चेक. पण ही प्रक्रिया आता इतिहासजमा झाली आहे.

## मिनिमली इन्वेसिव्ह 'व्हॉल्व्ह-इन-व्हॉल्व्ह' प्रक्रियेमुळे ७२ वर्षीय पुणेकराला नवसंजीवनी

छत्रपती संभजीनगर : मणिपाल हॉस्पिटल, बाणेर येथील हृदयरोग तज्ज्ञांनी हृदयाच्या झडपेच्या गंभीर बिघाडाने त्रस्त असलेल्या ७२ वर्षीय रुग्णावर अत्याधुनिक आणि मिनिमली इन्वेसिव्ह पद्धतीने यशस्वी उपचार केले. 'ट्रान्सकॅथेटर माइट्रल व्हॉल्व्ह-इन-व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट' या प्रक्रियेद्वारे रुग्णाच्या जुन्या खराब झालेल्या व्हॉल्व्हमध्ये नवीन व्हॉल्व्ह बसवण्यात आला.सदर रुग्णावर २०१४ मध्ये बायोप्रोस्थेटिक माइट्रल व्हॉल्व्ह बसवण्याची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. मात्र कालांतराने हा व्हॉल्व्ह कमजोर होत गेला आणि त्यामुळे हृदयाशी संबंधित गंभीर समस्या निर्माण झाल्या. गेल्या सहा महिन्यांपासून रुग्णाला सतत धाप लागण्याचा त्रास होत होता. सुरुवातीला चालताना किंवा श्रम केल्यावर त्रास जाणवत होता, मात्र नंतर विश्रांती घेत असतानाही श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. रात्री अचानक धाप लागण्याचे झटके येत होते. हृदय निकामी होण्याच्या तक्रारीमुळे त्यांना अनेकदा रुग्णालयात दाखल करावे लागले होते.

## नीव्ह फाउंडेशननेसमर रीलीफ मोहिम सुरू

छत्रपती संभजीनगर - भारताच्या बहुतांश भागांमध्ये तापमानाने ४५ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला असताना नीव्ह फाउंडेशनने या हंगामातील तीव्र उष्णतेचा सामना करावा लागत असलेले मैदानी भागातील कामगार, सामान्य जनता, भटके प्राणी आणि पक्षी यांना दिलासा देण्यासाठी 'इस गर्मी, फर्क नजर आयेगा' ही मोठ्या प्रमाणावरील समर रीलीफ मोहिम सुरू केली आहे. हा उपक्रम राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, हरियाणा आणि महाराष्ट्र या ६ राज्यांमध्ये राबवला जात आहे. या उपक्रमाबाबत मत व्यक्त करत वंडर सिमेंटचे संचालक आणि नीव्ह फाउंडेशनचे संस्थापक श्री. विवेक पटनी म्हणाले, "भारतात उन्हाळा बहुतांश वेळ घराबाहेर घालवावा लागणाऱ्या व्यक्तींसाठी दिवसेंदिवस अत्यंत कठीण होत चालला आहे. या मोहिमेच्या माध्यमातून, आम्हाला अशा व्यक्तींसाठी त्वरित आणि सहज उपलब्ध होईल अशी मदत निर्माण करायची होती, जे अत्यंत प्रतिकूल हवामानातही आपली शहरे सुरळीत ठेवण्यासाठी काम करत असतात. कधी-कधी सर्वात अर्थपूर्ण मदत अत्यंत सोपी देखील असते; मग ते एक ग्लास पाणी देणे असो, सावलीमध्ये आराम करण्याचा क्षण देणे असो किंवा कठीण परिस्थितीत मुलभूत आधार देणे असो."

## मोटोरोलाकडून मोटो जी37 पॉवर लॉँच

छत्रपती संभजीनगर : मोटोरोला या मोबाईल तंत्रज्ञान व नाविन्यतेमधील जागतिक अग्रणी आणि भारतातील आघाडीच्या एआय स्मार्टफोन ब्रँडने आज नवीन मोटो जी37 पॉवर , मोटो जी37 , आणि मोटो बड्स २ लॉँच केले आहेत. एक शक्तिशाली नवीन लाईनअप, जे या सेगमेंटमधील सर्वोत्तम बॅटरी, फास्ट 5जी आणि अप्रतिम कार्यक्षमता, सर्वोत्तम मनोरंजन आणि दर्जात्मक टिकाऊपणाच्या माध्यमातून परवडणाऱ्या किमतीत शक्तिशाली स्मार्टफोन अनुभवाची पुनर्रचना करण्यासाठी डिझाइन केले आहे. आपल्या सेगमेंटमधील सर्वात शक्तिशाली फोन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, मोटो जी37 पॉवर मध्ये या सेगमेंटमधील सर्वोत्तम 7000 एमएएच बॅटरी^, मीडियाटेक डायमेन्सिटी 6400 द्वारे समर्थित अत्यंत गतीशील 5 जी परफॉर्मन्स, गोरिला® ग्लास 7आय सह सेगमेंटमधील सर्वोत्तम टिकाऊपणा, आकर्षक 120 हर्ट्झ डिस्प्ले, शानदार 50 मेगापिक्सल एआय-पॉवर्ड क्वाड-पिक्सलकॅमेरा सिस्टम, आणि सर्वोत्तम ऑडिओ एक्सपिरियन्स देणारे डॉल्बी ॲटमॉस® स्टीरिओ स्पीकर्स यांचा समावेश आहे, जे सर्व एका स्टायलिश वीगन लेदर डिझाइनमध्ये उपलब्ध आहे.

## बजाज जनरल इन्श्युरन्सचा एमएचसीपी एज प्लस लॉँच

मुंबई : भारताची आघाडीची प्रायव्हेट जनरल इन्श्युरर बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडने (पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स कंपनी लिमिटेड) 'माय हेल्थ केअर प्लॅन एज प्लस ' (एमएचसीपी एज प्लस ) नव्या प्लॅनची घोषणा केली आहे. वाढत्या आरोग्यसेवेवरील खर्चांना सामोरे जाण्यासाठी आणि अधिक लवचिकता व सानुकूलनाद्वारे स्वतःच्या खिशातून होणारा खर्च कमी करण्यासाठी या खास प्रगत, सुधारित सर्वसमावेशक हेल्थ इंडेम्निटी प्लॅनची निर्मिती करण्यात आली आहे. सध्याच्या एमएचसीपी स्कीमच्या मजबूत पायावर आधारित एमएचसीपी एज प्लस मध्ये मूलभूत हॉस्पिटलायझेशन कव्हरेज सोबत विविध पर्यायी रायडर्सचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे कस्टमरला बदलत्या आरोग्यविषयक गरजा, जीवनातील टप्पे आणि माफकता यानुसार आपली पॉलिसी सानुकूलित करता येते. या स्कीम मध्ये ₹ 5 लाखांपासून ते ₹ 5 कोटींपर्यंत इन्श्युरन्स रकमेचे पर्याय उपलब्ध आहेत. तसेच, एका पॉलिसी वर्षात इन्श्युरन्स रक्कमेची अनलिमिटेड रिइनस्टेटमेंट सुविधा दिली जाते.

# पर्यटनमंत्री खंवटे यांची दक्षिण गोव्यातील समुद्रकिनाऱ्यांना भेट प्रस्तावित पायाभूत सुविधा व सुशोभीकरण कामांची पाहणी





पणजी, दि. १६ मे २०२६ (प्रतिनिधी) : पर्यटन मंत्री रोहन अशोक खंवटे यांनी आज दक्षिण गोव्यातील केळशी व बाणावली समुद्र किनार्यांना भेट देऊन प्रस्तावित पायाभूत सुविधा व सुशोभीकरण कामांसाठी निश्चित करण्यात आलेल्या ठिकाणांची पाहणी केली. दक्षिण गोव्यात येणाऱ्या पर्यटकांसाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही पाहणी करण्यात आली. यावेळी पर्यटन संचालक केदार नाईक, केळशीचे सरपंच डिक्सन व्हाज, शॅक मालक संघटनेचे अध्यक्ष क्रूझ कार्दोज तसेच पर्यटन खात्याचे इतर अधिकारी उपस्थित होते. या भेटीदरम्यान मंत्र्यांनी समुद्रकिनाऱ्यावरील पादचारी मार्ग, सुशोभीकरणासाठी निश्चित केलेली ठिकाणे, सार्वजनिक स्वच्छतागृहांसाठी प्रस्तावित जागा तसेच इतर पर्यटन संबंधित पायाभूत सुविधांची पाहणी केली. दक्षिण गोव्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणात देशी व विदेशी पर्यटक भेट देत असल्याने पर्यटन सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी आणि पर्यटकांचा अनुभव अधिक चांगला करण्यासाठी सरकारतर्फे हे प्रयत्न करण्यात येत आहेत. बाणावली समुद्रकिनाऱ्यावरील भेटीदरम्यान मंत्र्यांनी मच्छीमार, जलक्रीडा व्यवसायाशी संबंधित सदस्य तसेच शॅक ओनर्स असोसिएशनच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. पर्यटन व्यवसाय, समुद्रकिनाऱ्यांची स्वच्छता, स्थानिकांच्या उपजीविकेशी संबंधित प्रश्न, स्थानिक समुदायासमोरील अडचणी तसेच विविध सुविधांबाबत चर्चा करण्यात आली. आगामी पर्यटन हंगाम सुरळीत पार पडण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर मंत्र्यांनी संबंधितांशी सविस्तर चर्चा केली. अलीकडेच मंत्री खंवटे यांनी पर्यटन क्षेत्रातील विविध घटकांशी बैठक घेतली होती. या बैठकीदरम्यान उद्योगासमोरील अनेक समस्या त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या होत्या. या प्राथमिक सूचना व अभिप्रायांच्या आधारे त्यांनी प्रत्यक्ष स्थळांना भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. माध्यमांशी बोलताना खंवटे म्हणाले की, "गोवा हे देशातील एक प्रमुख पर्यटन स्थळ आहे. त्यामुळे पर्यटनाशी संबंधित पायाभूत सुविधांची स्थिती प्रत्यक्ष पाहणे आणि प्राधान्याने प्रश्न सोडवणे अत्यंत आवश्यक आहे." "दक्षिण गोव्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पर्यटक येतात. त्यामुळे केळशी समुद्रकिनाऱ्यावर भेट देऊन पायाभूत सुविधा, सुशोभीकरण कामे, पादचारी मार्ग तसेच प्रस्तावित स्वच्छतागृह सुविधांची पाहणी केली. अलीकडेच पर्यटन क्षेत्रातील विविध घटकांसोबत बैठक घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या होत्या. प्राप्त झालेल्या सूचनांच्या आधारे प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून पर्यटक आणि संबंधित घटकांच्या अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत, असे खंवटे यांनी सांगितले. पर्यटन विभाग गोव्यातील किनारी पर्यटनस्थळांवरील सुविधा सुधारण्यासाठी, स्वच्छता राखण्यासाठी, पर्यटकांसाठी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि शाश्वत पर्यटन विकासासाठी कटिबद्ध असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. पर्यटन पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी, स्थानिक समुदाय व पर्यटन क्षेत्राशी संबंधित घटकांना सहकार्य करण्यासाठी तसेच पर्यटकांना अधिक चांगला अनुभव देण्यासाठी पर्यटन विभाग सातत्याने प्रयत्नशील असल्याचे या भेटीतून स्पष्ट झाले. (BOX ITEM) बाणावली येथे पर्यटन मंत्री खंवटे यांनी जेट स्की राईडचा अनुभव घेतला आणि स्थानिक मच्छिमार जे, पेले या नावाने ओळखले जातात, त्यांच्यासह त्यांनी जलक्रीडा उपक्रमाचा आनंद लुटला. मंत्र्यांनी समुद्री क्षेत्राची पाहणी करत असताना दक्षिण गोव्याच्या या सुदर किनारपट्टीवर साहसी जलक्रीडा उपक्रमात ते सहभागी झाले.

बाणावली बीचवर साहसी पर्यटनाची मोठी क्षमता असल्याचे आणि देशी-विदेशी पर्यटकांमध्ये या ठिकाणाची लोकप्रियता अधिक वाढविण्याचे त्यांचे इरादे या भेटीने अधोरेखित झाले.

## डिजिटल युगात देवगिरी बँकेची दमदार झेप; अत्याधुनिक इंटरनेट बँकिंग सेवेचा शुभारंभ




छत्रपती संभाजीनगर,प्रतिनिधी : ग्राहकांना आधुनिक, सुरक्षित व तंत्रज्ञानाधारित बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने देवगिरी नागरी सहकारी बँकने अत्याधुनिक इंटरनेट बँकिंग सेवेचा शुभारंभ केला आहे. डिजिटल बँकिंगच्या माध्यमातून ग्राहकांना आता घरबसल्या विविध आर्थिक व्यवहार सहज, सुरक्षित आणि जलद पद्धतीने करता येणार आहेत. नेट बँकिंग सुविधा देणाऱ्या मोजक्या बँकांमध्ये देवगिरी बँकेचा समावेश झाला आहे.

बँकेच्या या नव्या इंटरनेट बँकिंग सेवेमध्ये शिल्लक चौकशी, निधी हस्तांतरण (एनईएफटी / आरटीजीएस / बँकेअंतर्गत हस्तांतरण), कर्ज परतफेड, खाते विवरणपत्र डाउनलोड, धनादेश सेवा यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच व्यावसायिक ग्राहकांसाठी Bulk Upload, Maker-Checker Approval, Workflow, Customer Limit Setting यांसारख्या आधुनिक कॉर्पोरेट बँकिंग सुविधांचाही समावेश करण्यात आला आहे. ग्राहकांच्या व्यवहारांची सुरक्षितता लक्षात घेऊन अत्याधुनिक सुरक्षा प्रणालीचा वापर करण्यात आला असून चोवीस तास उपलब्ध असलेली ही सेवा ग्राहकांना अधिक वेगवान आणि विश्वासार्ह डिजिटल बँकिंगचा अनुभव देणार आहे.

देवगिरी नागरी सहकारी बँक ही ग्राहककेंद्रित सेवा, आर्थिक शिस्त आणि विश्वासार्ह कार्यपद्धतीमुळे मराठवाड्यात आपली वेगळी ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरली आहे. नुकताच बँकेला शेड्यूल्ड बँकेचा दर्जा प्राप्त झाला असून मराठवाड्यातील ही पहिली शेड्यूल्ड सहकारी बँक ठरली आहे. तसेच "१० वी अखिल भारतीय नागरी सहकारी बँकिंग परिषद व पुरस्कार २०२६" मध्ये बँकेला "आर्थिक समावेशन उपक्रम" या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

बँकेची आर्थिक स्थितीदेखील अत्यंत भक्कम असून बँकेचा एकूण व्यवसाय २८३७.५० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असून मागील वर्षाच्या तुलनेत त्यामध्ये १७.२६ टक्के वाढ झाली आहे. बँकेच्या ठेवी १७४६.८६ कोटी रुपयांवर पोहोचल्या आहेत, तर कर्जे १०९०.६४ कोटी रुपयांपर्यंत वाढली आहेत. बँकेची निव्वळ संपत्ती ३३७.२५ कोटी रुपये असून बँकेने ४०.४४ कोटी रुपयांचा विक्रमी निव्वळ नफा कमावला आहे. तसेच निव्वळ अनुत्पादित मालमत्ता (नेट एनपीए) शून्य टक्के आहे.

बँकेमार्फत शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, रक्तदान शिबिरे, सामाजिक जनजागृती तसेच विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी दिली.

यावेळी बँकेचे उपाध्यक्ष उमेश दाशरथी, संचालक प्रशांत देशपांडे, रजिश जैन, सजनराव मते, सागर विध्वंस, सुरेश जगाडे, नागनाथ काजवे, अमिता लिकुरवाडे, जयश्री किदवेकर, सरदारसिंग बैनाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण नांदेडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे व रुपेंद्र कोयाळकर उपस्थित होते.

## फर्दापूर येथे एका मनोरुग्णाचा चोवतीस वर्षांपासून मुक्काम



फर्दापूर दि 19 : फर्दापूर . फर्दापूर गावात एक मनोरुग्ण चोवतीस वर्षांपासून फर्दापूर गावात मुक्काम याला मनोरुग्ण म्हणात येत नाही कारण की तो ना गावात फिरत तो फक्त महादेव मंदिराचा मागे एका दुकानाच्या पत्राच्या शेड मध्ये राहतो तेथे झोपतो सकाळी उठला की रस्त्यावरील हॉटेल समोर उभा राहतो आणि त्याला प्रत्येक हॉटेल चालक चहा पाव, बिस्कीट, देतात कारण की याचा कोणाला त्रास नाही त्या खान्याच्या वस्तू घेऊन बाजूला जाऊन खात बसतो काही वेळा भाजी चपाती ही त्याला मिळते विशेष याला कोरोना वेळी कुठल्याही प्रकारचा त्रास नाही या चोवतीस वर्षात त्यांनी एक गोळी ना एक इंजेक्शन सुध्दा त्याला माहित नाही याला ती म्हण लागू होते ज्यांचे कोणी नाही त्यांचे साक्षात भगवंत आहे याला आता सध्या थोडी हिंदी भाषा येते मात्र हा मनुष्य एकतर आंध्र प्रदेश किंवा तामिळनाडू ईकडचा असेल असे वाटते फर्दापूर येथील नागरिक याला दोन तीन महिन्यांतून यांची दाढी, कटिंग तसेच त्याला नवीन कपडे बदलून देतात या मनुष्यामुळे कोणाला काही इजा नाही तर गावात सुध्दा मागत हॉटेल मधून जे भेटते त्यावर हा जगत आहे.

## सौ. स्नेहा मुसरिफ यांना 'आदर्श माता पुरस्कार' प्रदान



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी : ज्येष्ठ साहित्यिक सौ. स्नेहा हेमंत मुसरिफ (सौ. विद्या कलबुर्गे) यांना पुण्यातील आपेक्षा मासिक यांच्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठेच्या 'स्व. सौ. उर्मिला कराड आदर्श माता पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले.

'आदर्श माता' या विषयावर महाराष्ट्रभरातून मातृसेवा विशेषांकासाठी लेख मागविण्यात आले होते. या लेखांमधून सौ. स्नेहा मुसरिफ यांच्या लेखाची एकमताने निवड करण्यात आली. या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन पुण्यातील वेदशास्त्रोत्तेजक मंडळ येथे करण्यात आले होते.

या समारंभात सौ. स्नेहा मुसरिफ यांना स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र तसेच मातृसेवा विशेषांक प्रदान करून गौरविण्यात आले.

## झी टीव्हीच्या मालिकांची टीआरपीत दमदार आघाडी

छत्रपती संभाजीनगर : हिंदी मनोरंजन वाहिन्यांच्या टीआरपी शर्यतीत झी टीव्हीच्या मालिकांनी दमदार कामगिरी करत अव्वल स्थान पटकावले आहे. 'वसुधा' मालिकेने सलग दुसऱ्या आठवड्यात २.० गुणांसह पहिले स्थान कायम राखले असून 'गंगा माई की बेटियाँ' मालिकेने १.७ गुणांसह दुसरे स्थान मिळवले आहे. त्यामुळे झी टीव्हीचा हिंदी मनोरंजन क्षेत्रातील दबदबा अधिक मजबूत झाला आहे. 'वसुधा' मालिकेतील प्रमुख अभिनेत्री प्रिय ठाकूर हिने प्रेक्षकांच्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत हे यश संपूर्ण टीमच्या मेहनतीचे फलित असल्याचे सांगितले. तसेच 'गंगा माई की बेटियाँ'मधील अमनदीप सिद्धूने प्रेक्षकांच्या सातत्यपूर्ण पाठिंब्याबद्दल आभार मानले.

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project**

**E-TENDER NOTICE NO: 2026_DOAWB_1303809**

***Construction of Breeder Shed for Goats 1500 Sq. ft.,Kids or Weaning Shed 750 Sq. ft., Sick Animal Shed 150 Sq.ft., Feed Godown 1590.65 Sq.ft.,Storage Room 179.86 Sq.ft***

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. *Jatakeshwar Farmer Producer Co. Ltd.* is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned works. The estimated cost of work is ***Rs. 52.19 lakhs (Including GST)***. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org**, in *tender and procurement section*. The last date for submission of online bid is 29/05/2026 up to 03:00 PM. Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit, SMART Project Dist Chhatrapati Sambhajinagar**

जा.क्र.जे.३/2373/202६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
बाबा पेटोल पंपाजवळ अदालत रोड
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
दि. 18 MAY 2026

**(चौकशीची नोटीस)**

**मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ५० अ (१) अन्वये.**

चौकशी अर्ज क्रमांक: जे-३/०७/२०२६ (क. ५० अ (३)
अर्जदार :- दिलीप रामकृष्ण पाखले व इतर ०६
विरुध्द

गैरअर्जदार :- १) मोहन तोताराम बोरसे, रा. एम. नं.१५५, गोकुळनगर, जाधववाडी न्यू मोंढा मागे, हर्सल जि. छत्रपती संभाजीनगर २) देवराम मालजी पाटील (मयत) ३) पंढरीनाथ विठ्ठल महापुरे (मयत) ४) बाळकृष्ण झिपरू वाणी (मयत)

आपणास या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विवेक वाचनालय, मु. पो. गोंदेगाव, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर नोंदणी क्रमांक ई-२२५/ औरंगाबाद या न्यासाचा कारभार व व्यवस्था योग्य रितीने चालविण्याच्या दृष्टीने न्यासाला योजना (घटना) तयार करण्यासाठी वरील चौकशी अर्जाची सहायक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद हे चौकशी करणार आहेत.

त्याअर्थी या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, वरील नमुद न्यासाच्या योजना मंजूर करणे बाबत किंवा योजनेच्या मसुदया बाबत हितसंबंधीत व्यक्तींची काही हरकत असल्यास किंवा कुणाला काही म्हणणे दयावयाचे असल्यास संबधितांनी लेखी हरकत / निवेदन देण्यासाठी दि. २४/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद या कार्यालयात स्वतः अगर प्रतिनिधी किंवा वकीलांमार्फत हजर राहुन लेखी म्हणणे सादर करावे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत / निवेदन प्राप्त न झाल्यास प्रकरणांमधे पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

ही नोटीस दि.१८/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनीशी व सहायक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्या शिक्क्यानिशी दिली.

अधिक्षक, (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद

**जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस**

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हिल एम.ए.क. ८२६/२०२५

अर्जदार :- सोनाली राहुल रिंढे, वय २९ वर्षे, धंदा, घरकाम, रा. बोलठाण ना. नांदगाव जि. नाशिक, ह.मु. वडगांव, गट क. १२ पुण्यनगरी रोड, ता. जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार :- १) नंदाबाई विठठल नरोडे, वय. ४५ वर्षे, धंदा. शेती, रा. वसुसायगांव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर ह.मु. सेंट जॉर्ज इंग्लिश स्कूल जवळ, शिक्षक कॉलनी, लासूर स्टेशन ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर २) आदित्य विठठल नरोडे, वय. १६ वर्षे, धंदा. शिक्षण, अ.पा. कर्ती आई गैरअर्जदार क. १नामे नंदाबाई विठठल नरोडे रा. वसुसायगांव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर ह.मु. सेंटजॉर्ज इंग्लिश स्कुल जवळ, शिक्षक कॉलनी, लासूर स्टेशन ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर ३) प्रियंका ज्ञानेश्वर जाधव, वय. २६ वर्षे, धंदा. घरकाम, रा. अंबेगांव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर ह.मु. देहु पुणे ता. जि. पुणे.

प्रकरण:-वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात बारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, विठठल आसाराम नरोडे हे मौजे वसुसायगांव ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर येथील रहीवासी होते व ते दिनांक २३/०९/२०२५ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने शासकीय घाटी छ. संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत. मयत विठठल आसाराम नरोडे यांची पहिली पत्नी नामे नंदा उर्फ मंगल विठठल नरोडे ही दिनांक १६/०८/१९९७ रोजी मौजे पानगव्हाण ता. वैजापूर जि. छ. संभाजीनगर येथे मयत झालेली आहे. सदर प्रकरणातील अर्जदार ही मयत विठठल आसाराम नरोडे यांची पहिली पत्नी नामे नंदा उर्फ मंगल विठठल नरोडे यांची मुलगी आहे व गैरअर्जदार क. १ ही मयत विठठल आसाराम नरोडे यांची दुसरी पत्नी असून गैरअर्जदार क. २ हा मयत विठठल आसाराम नरोडे व गैरअर्जदार क. १ चा मुलगा असून गैरअर्जदार क. ३ ही मयत विठठल आसाराम नरोडे व गैरअर्जदार क. १ ची विवाहीत मुलगी आहे. मयत विठठल आसाराम नरोडे यांची आई नामे चंद्रभागाबाई आसाराम नरोडे व वडील आसाराम दगडु नरोडे हे मयत झालेले आहेत. मयत विठठल आसाराम नरोडे यांना अर्जदार व गैरअर्जदार क. १ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. मयत विठठल आसाराम नरोडे यांच्या नावे मौजे शिवार महेबुबखेडा ता. गंगापूर येथे गट क. ८३ मध्ये १ हे. २२ आर शेतजमिन आहे. तसेच मयत विठठल आसाराम नरोडे यांच्या नावे मौजे अनंतपूर/हर्मुल ग्रामपंचायत हददीतील प्लॉट नं. ३७ मिळकत नं. २३२८ ज्याची लांबी २५ व रुंदी ४० फुट ज्याचे क्षेत्रफळ १००० चौ. फुट सहान जागा आहे. तसेच मयत विठठल आसाराम नरोडे यांच्या नावे मौजे अनंतपूर / हर्मुल ग्रामपंचायत हददीतील मिळकत नं. ३१ मिळकत नं. २३२२ ज्याची लांबी २५ व रुंदी ४० फुट ज्याचे क्षेत्रफळ १००० चौ. फुट सहान जागा आहे. सदर मिळकत ही मयत विठठल आसाराम नरोडे यांच्या नावे असून सदर मिळकत ही अर्जदार व गैरअर्जदार यांच्या नावे वारसाने करण्यासाठी अर्जदार ही संबंधीत महसुल कार्यालय/तलाठी कार्यालय महेबुबखेडा ता. गंगापूर व ग्रामपंचायत कार्यालय अनंतपूर/हर्मुल येथे गेले असता संबंधीत कार्यालय यांनी मयत विठठल आसाराम नरोडे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्राची मागणी केली. मयत विठठल आसाराम नरोडे हे दिनांक २३/०९/२०२५ रोजी मयत झाले असून मयत विठठल आसाराम नरोडे हे हयात असतांना शिरेसायगांव ता. गंगापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे मुख्याध्यापक म्हणुन नौकरीस होते व मयत विठठल आसाराम नरोडे यांची ग्रॅज्युटी, पेन्शन, विमा पॉलीसी, गटविमा, ई.पी.एफ. व इतर शासकीय मदत मिळण्यासाठी व अनुकंपतत्वावर नौकरी घेण्यासाठी अर्जदार ही जि.प. छ. संभजीनगर व पंचायत समिती गंगापूर येथे गेले असता संबंधीत जि.प. व पंचायत समिती कार्यालय यांनी अर्जदारास मयताचे वारस असल्याबाबतची मागणी केली.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप /उजर नोंदववा. मुदतीत आक्षेप उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक २४/१२/२०२५.

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, गंगापूर

**जाहीर प्रगटन/सायटेशन**

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. २८३/२०२६

अर्जदार :-१) व्दारकाबाई जगन्नाथ मुळे, वय. ६९ वर्षे, धंदा, घरकाम, रा. कांबी ता. शेवगांव जि. अ.नगर ह.मु. सावखेडा, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद २) अर्चना संतोष जाधव, वय. ४० वर्षे, धंदा, घरकाम, रा. शंकरवाडी, ता. पाथर्डी, जि. अ.नगर ३) विश्वमुर्ती जगन्नाथ मुळे, वय. ४५ वर्षे, धंदा, शेती, रा. सावखेडा, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ४) प्रल्हाद जगन्नाथ मुळे, वय. ४३ वर्षे, धंदा, शेती, रा. सावखेडा, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार:- निरंक

प्रकरण -वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, जगन्नाथ धोंडीराम मुळे हे मौजे सावखेडा ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथील रहीवासी होते व ते दि. १४/०४/२०२६ रोजी मौजे सावखेडा ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. अर्जदार क. १ ते ४ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे जगन्नाथ धोंडीराम मुळे यांना अर्जदार क. १ पत्नी असून अर्जदार क. २ ही विवाहीत मुलगी असून अर्जदार क. ३ व ४ हे मुले आहे. मयतास अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/ निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदववा. मुदतीत आक्षेप /उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक :-१९/०५/२०२६

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

**जाहीर प्रगटन/सायटेशन**

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. ३४१/२०२६

अर्जदार :- १) उमरबी शाबु सय्यद, वय. ७७ वर्षे, धंदा, घरकाम, रा. झांझर्डी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद २) कासम शाबु सय्यद, वय. ६८ वर्षे, धंदा, शेती, रा. झांझर्डी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ३) गुलाब शाबु सय्यद, वय. ५८ वर्षे, धंदा, शेती, रा. झांझर्डी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ४) गणी शाबु सय्यद, वय. ५३ वर्षे, धंदा, शेती, रा. झांझर्डी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ५) शब्बीर शाबु सय्यद, वय. ४८ वर्षे, धंदा, शेती, रा. झांझर्डी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ६) मुनिर शाबु सय्यद, वय. ४६ वर्षे, धंदा, शेती, रा. झांझर्डी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ७) मदिना भिकन शेख, वय. ५५ वर्षे, धंदा, घरकाम, रा. झांझर्डी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ८) शकीला बानो रईस शेख, वय. ५१ वर्षे, धंदा, घरकाम, रा. गल्ली नं. ४ बाबा मस्तान हॉलच्या पाठीमागे, रशिदपूरा औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार :-निरंक

प्रकरण :- वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, शाबु फत्तु सय्यद हे मौजे झांझर्डी ता. गंगापुर येथील रहीवासी होते व ते दि. ११/०३/२०१० रोजी मौजे झांझर्डी ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. अर्जदार क. १ ते ८ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे शाबु फत्तु सय्यद यांना अर्जदार क. १ ही पत्नी असून अर्जदार क. २ ते ६ हे मुले असून अर्जदार क. ७ व ८ ही विवाहीत मुली आहे. मयतास अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ८ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदववा. मुदतीत आक्षेप / उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

पु.ता. ३०/०६/२०२६
दिनांक :-१९/०५/२०२६

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

**जाहीर प्रगटन/सायटेशन**

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

सिव्हील एम.ए.क. ३३६/२०२६

अर्जदार :- १) सिताबाई गंगाधर चव्हाण, वय. ७५ वर्षे, धंदा, शेती, रा. मुददेशवाडगांव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद २) संतोष गंगाधर चव्हाण, वय ४३ वर्षे, धंदा, शेती, रा. मुददेशवाडगांव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ३) शरद गंगाधर चव्हाण, वय. ४० वर्षे, धंदा, शेती, रा. मुददेशवाडगांव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ४) अलका कारभारी नरवडे, वय. ४६ वर्षे, धंदा, शेती, रा. भोयगांव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार -निरंक

प्रकरण:- वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे बाबत

याअर्थी, वरील अर्जदारांनी ॲड. एस. के. लांडे यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, गंगाधर गोपाळा चव्हाण हे मौजे मुददेशवाडगांव ता. गंगापुर येथील रहीवासी होते व ते दि. १५/०५/२०१६ रोजी मुददेशवाडगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ते ४ हे वर नमुद पत्त्यावरील रहीवासी असून मयत नामे गंगाधर गोपाळा चव्हाण यांना अर्जदार क. १ ही पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मुले असून अर्जदार क. ४ ही विवाहीत मुलगी आहे. अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ ते ४ यांची जनक माता आहे. मयतास अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयताच्या माघारी केवळ अर्जदार क. १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे व इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय/निमशासकीय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यास कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा आक्षेप, उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः किंवा वकिला मार्फत आक्षेप उजर नोंदववा. मुदतीत आक्षेप /उजर न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

दिनांक :-१९/०५/२०२६

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

## संक्षिप्त वृत्त...

### दौंड-मनमाड विभागातील दुहेरीकरणामुळे काही रेल्वे गाड्यांचे मार्गांतर : १९ ते २७ मेदरम्यान प्री-एनआय व नॉन इंटरलॉकिंग कामे; प्रवाशांना नियोजनाचे आवाहन

**पूर्णा,/ प्रतिनिधी-** मध्य रेल्वेच्या दौंड-मनमाड विभागातील विसापूर-रांजणगाव-सरोळा दरम्यान दुहेरीकरणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामासाठी १९ मे ते २७ मे २०२६ या कालावधीत प्री-नॉन इंटरलॉकिंग व नॉन इंटरलॉकिंग कामे करण्यात येणार असल्याने काही रेल्वे गाड्यांचे मार्गांतर करण्यात आले आहे, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड येथील जनसंपर्क कार्यालयाने दिली.

या कालावधीत गाडी क्रमांक ११४०९ दौंड-निजामाबाद एक्सप्रेस तसेच ११४१० निजामाबाद-पुणे एक्सप्रेस या गाड्या बदललेल्या मार्गाने धावणार आहेत. संबंधित गाड्या दौंड-कुर्डुवाडी-लातूर रोड-परभणी-पूर्णा-निजामाबाद या पर्यायी मार्गाने चालविण्यात येणार आहेत. रेल्वे प्रशासनाच्या माहितीनुसार, १९ व २० मे रोजी धावणाऱ्या गाड्या परभणीमार्गे निजामाबादकडे वळविण्यात येतील. तर २२ मे ते २७ मेदरम्यानच्या फेऱ्यांमध्ये गाड्या पूर्णा मार्गे धावतील. तसेच निजामाबाद-पुणे एक्सप्रेसच्या परतीच्या फेऱ्यांनाही त्यानुसार मार्गांतर लागू करण्यात आले आहे.
रेल्वे प्रशासनाने प्रवाशांनी या बदलांची नोंद घेऊन प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन केले असून होणाऱ्या गैरसोयीबद्दल दिलगीरी व्यक्त केली आहे.

### अधिक मासानिमित्ताने परभणीत २५ मे पासून श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिका हद्दीतील मध्यवस्तीतील गांधी पार्कातील राजाराम सभागृहात २५ ते ३१ मे दरम्यान श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला आहे. वेदशास्त्रसंपन्न विष्णूशास्त्री बाळुगुरु असोलेकर यांच्या वाणीने श्रवणाचा लाभ होणार आहे. नागरीकांनी या सोहळ्यास सहपरिवार उपस्थित रहावे, असे आवाहन श्रीराम डहाळे, श्री सुवर्णकार गणेश मंडळ, श्री सुवर्णकार महिला मंडळ व समस्त भागवत भक्तांनी केले आहे.

### मराठवाडा हायस्कूलच्या शिवाजी नगर शाखेतील १० विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

**परभणी,/प्रतिनिधी :** नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा हायस्कूलच्या शिवाजीनगर शाखेतील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाचा नावलौकिक उंचावला आहे.

या परीक्षेत पृथ्वीराज रामचंद्र मुंजे यांनी २६४ गुण मिळवत विशेष यश संपादन केले. तसेच आचल दिनेश राठी - १९४, पार्थ प्रशांत सागर - १७४, शेख अरबाज शादुल्ला - १७२, मेघना मोरेश्वर काळे - १७२, अनुज आनंद शेळके - १६६, अमर दशरथ तौर - १६२, अर्णव बालाजी पोपळघट - १४८, सुभाषराव वायगुडघे - १३४ आणि अश्विन राहुल सराफ १३२ गुण मिळवत शिष्यवृत्तीस पात्र ठरले. विशेष म्हणजे, या दहा विद्यार्थ्यांपैकी आठ विद्यार्थी इयत्ता पाचवी 'ब' वर्गातील आहेत. या विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप विभाग प्रमुख सौ. गरुड, इयत्ता पाचवी 'ब'च्या वर्गशिक्षिका सौ. शेळके तसेच अविनाश जाधव आणि गणेश काळबांडे यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल नूतन विद्या समितीचे अध्यक्ष विजय जोशी, उपाध्यक्ष अनिल अष्टुरकर, दिलीपराव कुलकर्णी, सचिव संतोष धारासुरकर, कोषाध्यक्ष श्रीनिवास मुंदडा, सहसचिव तथा मुख्याध्यापक अनंत पांडे, कार्यकारिणी सदस्य नाथराव देशमुख, नंदकुमार देशमुख, सौ. पुष्पा मंगरूळकर, व्यंकटेश तोरंबेकर, सौ. चंद्रलेखा मालेगावकर, उपमुख्याध्यापक बाळकृष्ण कापरे, पर्यवेक्षक शिवाजीराव आरळकर, पर्यवेक्षक सूर्यकांत पाटील, एन. एल. साळवे तसेच सुनील रामपुरकर यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याबद्दल आरोपीविरोधात पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल

**परभणी,/प्रतिनिधी :** कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका अल्पवयीन मुलीशी जवळीक साधून, तिच्याशी मैत्री करत त्या मुलीवर अत्याचार केल्याबद्दल आरोपी विरोधात कोतवाली पोलिसांनी पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला.

एका पिढीत मुलीने कोतवाली पोलिस ठाण्यात एक तक्रार दाखल केली. त्या आधारे फेब्रुवारी ते मे या कालावधीत आरोपी नितीन मस्के याने आपल्याशी जवळीक साधली, मैत्री केली अन् शेत शिवारात नेऊन आपल्यावर अत्याचार केले, असे नमूद केले. त्या आधारे पोलिसांनी या प्रकरणात मस्के याच्या विरोधात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

### खोट्या कागदपत्राच्या आधारे जागेचा व्यवहार केल्याबद्दल अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर नगरपालिकेच्या तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांसह नगर रचना अधिकारी, दुय्यम निबंधक यांच्यासह १० जणांविरोधात जिंतूर पोलिस ठाण्यात बनावट दस्तऐवज खोटे कागदपत्र तयार करुन प्लॉटच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सत्यजित भास्करराव वानखेडे यांनी जिंतूर पोलिस ठाण्यात एक तक्रार दाखल केली. त्यात डॉ. भास्करराव वानखेडे यांच्या नावे जालना रस्त्यावरील पाण्याच्या टाकीच्या मागे ४००० चौरस फुटाचा प्लॉट संबंधी व्यक्तींनी संगणमत करुन, बनावट दस्त व खोट्या कागदपत्राच्या आधारे खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण केल्याची माहिती दिली. त्या आधारे पोलिसांनी तत्कालीन मुख्याधिकारी मिनीनाथ दंडवते, तत्कालीन नगररचना अधिकारी प्रतिक्षा कसलवार, शिवप्रसाद सानप, दुय्यम निबंधक लिंबनाथ बाळनाथ मधुरकर, रामकिशन मारोतराव घुले, रमेश भगवान जगताप, शेख गुलजार शेख समद, साजेद लतीफ खान पठाण व आर.डी. देशपांडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणात जिंतूर पोलिस अधिक तपास करीत आहेत. त्यामुळे याप्रकारच्या घटनांवर आळा घालण्याची आज खरी गरजअसल्याचा सुर नागरिकांतून होत आहे.

# पालकमंत्री यांच्या संकल्पनेतून एक शाळा दत्तक घेणार - पारवे



**जिंतूर ,/प्रतिनिधी:-** जिल्ह्यातील ५४ जिल्हा परिषद शाळांचा भौतिक व शैक्षणिक विकास साधणार:: जि.प. सदस्य मनीषा अभिजीत पारवे यांची स्पष्टोक्ती. जि.प.शाळांच्या विकासासाठी '' पालकमंत्री '' अंतर्गत जिल्ह्यातील ५४ जिल्हा परिषद शाळांचा भौतिक व शैक्षणिक विकास साधणार - जि. प. सदस्य मनीषा अभिजित पारवे परभणी:: परभणी जिल्हा परिषद अंतर्गत, जिल्हा परिषद परभणी, येथे जिल्हा परिषद अध्यक्षा, लता वाकळे यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा सम्पन्न झाली.

या बैठकीमध्ये, जिल्हा परिषद शाळांच्या समस्या मांडताना, जि. प. सदस्य मनीषा अभिजित पारवे यांनी, ''जिल्हा परिषदेच्या शाळा आणि जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षण यांच्यासमोर आज रोजी अनेक समस्या आहेत, अडचणी आहेत. जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षण आज रोजी डळमळीत होताना दिसत आहे. झपाट्याने कमी होत जाणारी पटसंख्या, पालकांचा उडालेला विश्वास, पालकांचा इंग्रजी माध्यमाकडे असणारा ओढा, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभाव, शिक्षकांच्या रिक्त जागा, जिल्हा परिषद शाळांमधील भौतिक यतिधांत्ता अभाव, शिक्षकांना असणारे शाळाबाह्य अशैक्षणिक कामे, शिक्षकांचे डेपोटेशन, यांसारख्या अनेक समस्या आज रोजी प्राथमिक शिक्षणाच्या समोर आ वासून उभ्या आहेत, हे वास्तव नाकारता येणार नाही. या सर्व समस्या कुणी निर्माण केल्या, याला जबाबाबदार कोण ?, शिक्षक, पालक, अधिकारी, प्रशासन की अन्य कोणी, याच्या खोलात आपणाला जायचे नाही. परंतु परत एकदा जिल्हा परिषद शाळा आणि जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षण यावरील पालकांचा विश्वास वाढून, गावामधील अंगणवाडीतील सर्व मुले जिल्हा परिषद शाळेत दाखल झाले पाहिजेत आणि दाखल झालेले मुल जिल्हा परिषद शाळेतील असणाऱ्या शेवटच्या इयत्तेपर्यंत टिकले पाहिजे यावर आपणाला आता काम करावे लागेल. आपल्या जिल्ह्यातील काही जिल्हा परिषद शाळा अतिशय सुंदर काम करत आहेत. मानवतच्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची पटसंख्या १३०० पेक्षा जास्त आहे. तसेच पाथरीच्या जिल्हा परिषद माळीवाडा शाळेची पटसंख्या ११५० पेक्षा जास्त आहे. ही आपल्या साठी गौरवाची बाब आहे. परंतु आजही जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळा उदासीन आहेत. दूधगांव आणि वस्सा या जिल्हा परिषद शाळा आज रोजी ० (शून्य) पटसंख्येच्या अभावी बंद झालेल्या आहेत, या गावांची लोकसंख्या ८००० पेक्षा जास्त असतानाही, या शाळा बंद आहेत, ही जिल्हा परिषद प्रशासन म्हणून आपल्यासाठी अत्यन्त दुर्दैवी बाब आहे. अशी खंत व्यक्त . केली. बोलताना त्यांनी सांगितले, आपल्या जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांचा भौतिक व गुणवत्तापूर्ण विकास होण्यासाठी मा. पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या संकल्पनेतून, प्रत्येक जिल्हा परिषद गटातील एक जिल्हा परिषद शाळा, तेथील जिल्हा परिषद सदस्य हे दत्तक घेतील, व शाळेचा भौतिक व गुणवत्तापूर्ण विकास करण्यासाठी पालकमंत्री अंतर्गत या शाळेसाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, तसेच प्रत्येक शाळेमध्ये, मुलींच्या सुरक्षिततेसाठी पिंक रूम तयार करण्यात येईल, अशी माहिती मनीषा पारवे यांनी दिली.

बैठकीसाठी, जिल्हा परिषद उपाध्यक्ष, ऍड. श्रीकांत विटेकर, शिक्षण व आरोग्य सभापती, वैशालीताई आंबेगावकर, मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर, यांच्यासह सर्व खात्याचे प्रमुख, सर्व सभापती, सर्व जिल्हा परिषद सदस्य, सर्व पंचायत समिती सभापती, यांची उपस्थिती होती.

## गंगाखेडकरांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहणार : आ. डॉ. राहुल पाटील यांची ग्वाही : शिवसेनेचे नूतन जिल्हाप्रमुख विष्णू मुरकुटे यांचा नागरी सत्कार

**परभणी./प्रतिनिधी:** गंगाखेडकरांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहणार : आ. डॉ. राहुल पाटील यांची ग्वाही : शिवसेनेचे नूतन जिल्हाप्रमुख विष्णू मुरकुटे यांचा नागरी सत्कार करण्यात आला आहे.

गंगाखेड तालुका व मतदारसंघ हा निश्चितच बाळासाहेब ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या विचारांवर प्रेम करणारा आहे. आतापर्यंत आपले कार्यक्षेत्र केवळ परभणी विधानसभा मतदारसंघापुरते मर्यादित होते. मात्र आता पक्षाने संपूर्ण परभणी जिल्ह्याची संघटनात्मक जबाबदारी आपल्यावर सोपविली आहे. त्यामुळे यापुढे गंगाखेडकरांच्या सुख-दुःखात, विकासात्मक कामांमध्ये आणि पक्षाचे जिल्हाप्रमुख विष्णू मुरकुटे यांच्या पाठीशी आपण भक्कमपणे उभे राहू, अशी ग्वाही आमदार डॉ. राहुल पाटील यांनी दिली.

शिवसेनेचे (उध्दव बाळासाहेब ठाकरे) नूतन जिल्हाप्रमुख विष्णू मुरकुटे यांचा व्यापारी संघ, विविध सामाजिक संघटना आणि शिवसेना यांच्या वतीने मोरया फंक्शन हॉल येथे नागरी सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना जिल्हाप्रमुख रवींद्र धर्मे होते. यावेळी परभणी महानगरप्रमुख डॉ. विवेक नावंदर, रिपब्लिकन पक्षाचे राज्य उपाध्यक्ष डॉ. सिद्धार्थ भालेराव, विठ्ठलराव रबदडे, डॉ. सुभाष कदम, माजी जिल्हा परिषद सभापती श्रीनिवास मुंडे, नगरसेवक धम्मानंद घोबाळे, पंडितराव मुंडे, गुरुजी मनोहर महाराज केंद्रे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष दगडू सोमानी, सुभाषदादा नळदकर, उपजिल्हाप्रमुख महादेव शेंडगे, बालाजी लोखंडे, साहेबराव कल्याणकर, तालुकाप्रमुख जानकीराम पवार, बापूराव पोळ, छगनराव मोरे, तालुका संघटक धोंडीराम जाधव, शिक्षक सेनेचे बाळासाहेब राखे, सायस चिलगर, शिवसेनेचे तालुका अधिकारी भागवत शिंदे, शहर संघटक अमोल खटिंग, प्रा. मुंजाजी चोरघडे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना डॉ. पाटील म्हणाले की, परभणी जिल्हा हा कायम शिवसेनेचा बालेकिल्ला राहील यात कोणतीही शंका नाही. भविष्यात दोन्ही जिल्हाप्रमुख आणि शिवसैनिकांच्या मदतीने जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघांवर भगवा फडकविणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी मुरकुटे म्हणाले की, आपण केलेल्या सामाजिक कार्याची तसेच पक्षभेद न करता प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होत गरजूंना मदत करण्याच्या भूमिकेची दखल घेऊन पक्षाने माझ्यावर जिल्हाप्रमुखपदाची जबाबदारी सोपविली आहे. ही जबाबदारी पूर्ण क्षमतेने पार पाडण्याचे वचन मी उद्धव ठाकरे आणि आमदार डॉ. राहुल पाटील यांना देत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मुंजाजी चोरघडे यांनी केले. सूत्रसंचालन बाळासाहेब राखे व नागेश बोरीकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन आयोजन समितीच्या वतीने डॉ. मनोहर ब्याळे यांनी मानले.

## जिंतूरात बनावट कागदपत्रांद्वारे प्लॉट व्यवहार; तत्कालीन मुख्याधिकाऱ्यासह १० जणांवर गुन्हा

**परभणी,/प्रतिनिधी:** शहरातील जालना रोड परिसरातील मौल्यवान प्लॉटच्या व्यवहारात बनावट कागदपत्रे तयार करून खरेदी-विक्री केल्याप्रकरणी जिंतूर पोलिसांनी तत्कालीन मुख्याधिकारी, नगर रचना अधिकारी, दुय्यम निबंधक कार्यालयातील कर्मचाऱ्यासह १० जणांविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे.
याबाबत सत्यजीत भास्करराव वानखेडे (वय ५५, रा. जवाहरनगर, अकोला) यांनी फिर्याद दिली. त्यावरून जिंतूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, नगर परिषद हद्दीतील गट नं. ११६/१/अ मधील जालना रोडवरील पाण्याच्या टाकीमागील सुमारे ४ हजार चौ. फुटांचा प्लॉट मयत डॉ. भास्करराव पुंजाजी वानखेडे यांच्या नावावर असल्याचे दाखवून आरोपींनी संगनमताने बनावट दस्तऐवज व खोटी कागदपत्रे तयार केली. त्यानंतर त्याच आधारे परस्पर खरेदी-विक्री व्यवहार करून फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे.
या प्रकरणात आरोपी एक नाव माहीत नाही,मिनीनाथ दंडवते (तत्कालीन मुख्याधिकारी, नगर परिषद जिंतूर), प्रतिक्षा पसलवाड (तत्कालीन नगर रचना अधिकारी), शिवप्रसाद आसाराम सानप,लिंबनाथ मधुरकर (दुय्यम निबंधक कार्यालय),रामकिशन मारोतराव घुले,रमेश भगवानराव जगताप,शेख गुलजार शेख समद,अ.ड. आर. डी. देशपांडे,साजेद लतिफ पठाण असे एकूण १० जणांचा समावेश आहे.

## सेलूमधील गंठण चोरी प्रकरणातील दोन आरोपी जेरबंद, अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त : स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**सेलू,/प्रतिनिधी:** शहरातील लक्ष्मी मॉलसमोर महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण हिसकावून पळालेल्या दोन चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या काही तासांत जेरबंद केले असून त्यांच्याकडून चोरीतील सोन्याचे गंठण व गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल असा सुमारे २ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १६ मे रोजी फिर्यादी स्नेहल स्वप्निल भरदम (रा. गणपती गल्ली, सेलू) या आपल्या स्कुटीवरून खरेदीसाठी लक्ष्मी मॉल येथे गेल्या होत्या. त्यावेळी लक्ष्मी मॉलसमोर दोन अज्ञात इसम मोटरसायकलवर आले आणि त्यांच्या गळ्यातील दीड तोळे वजनाचे अंदाजे दीड लाख रुपये किमतीचे सोन्याचे गंठण हिसकावून पसार झाले होते.
या प्रकरणी पोलीस स्टेशन सेलू येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपास करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज व फिर्यादीने दिलेल्या वर्णनाच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान आरोपींची ओळख पटवून परतूर (जि. जालना) येथून आरोपी खोबराजी शिवाजी काळे व त्याचा साथीदार अर्जुन रजनी चव्हाण (दोघेही रा. पारधी वाडा, परतूर) यांना १८ मे रोजी ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांनी आरोपींकडून चोरीस गेलेले ९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली युनिकॉर्न कंपनीची मोटरसायकल असा एकूण सुमारे २ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील तपासासाठी आरोपींना पोलीस स्टेशन सेलू यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप तसेच पोलीस अंमलदार विलास सातपुते, मधुकर ढवळे, उमेश चव्हाण, सिद्धेश्वर चाटे, रणजीत आगळे, राम पोळ, विष्णू चव्हाण, नामदेव डुब्बे, कश्यप साने, बालाजी रेड्डी आणि गणेश कोटकर यांनी केली.

## मराठवाडा हायस्कूलचे १५ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र; विद्यार्थी व शिक्षकांचे सर्वत्र कौतुक

**परभणी/प्रतिनिधी:** मराठवाडा हायस्कूलचे १५ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र; विद्यार्थी व शिक्षकांचे सर्वत्र कौतुक करण्यात आलेआहे.

नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत प्रशालेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या परीक्षेत प्रशालेतील १५ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

परीक्षेमध्ये श्रीकांत डुकरे याने २१४ गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. तसेच ऋतुजा लाड - २०२, सृष्टी काळे - १९४, पार्थ सोळंके - १९४, धनश्री खनपटे - १९०, समर्थ खंदारे - १९०, अथर्व पारवेकर - १७२, तनवी डहाळे - १७२, अनुष्का जगताप - १६८, अनुज बंग - १६४, शरद पवार - १६४, मुस्कान शेख - १६४, श्रीनाथ निर्मळ - १६२, हर्षदा करंडे - १५४ आणि राधिका घुले - १२६ गुण मिळवत शिष्यवृत्तीस पात्र ठरले. या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती विभागप्रमुख सौ. विद्या सोनुने, प्रदीप मुळे, सौ. मीरा चात्रे, विश्वास दिवाळकर, वसंत पुरी, सुधाकर रेडगे, गणेश सूर्यवंशी आणि श्रीपाद कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल नूतन विद्या समितीचे अध्यक्ष विजय जोशी, उपाध्यक्ष अनिल अष्टुरकर, दिलीप कुलकर्णी, सचिव संतोष धारासुरकर, मुख्याध्यापक तथा सहसचिव अनंत पांडे, कोषाध्यक्ष श्रीनिवास मुंदडा, संचालक वेंकटेश तोरंबेकर, संचालिका सौ. चंद्रलेखा मालेगावकर, सौ. पुष्पा मंगरूळकर, उपमुख्याध्यापक बाळकृष्ण कापरे, पर्यवेक्षक शिवाजी आरळकर, सहाय्यक पर्यवेक्षक एन.एल. साळवे, सेमी संस्कृत विभागाचे पर्यवेक्षक सूर्यकांत पाटील तसेच सहाय्यक पर्यवेक्षक सुनील रामपूरकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळीसर्व विद्यार्थ्यांनी अभ्यासावेळी मोठे एकाग्रतेने परिश्रम घेतले होते.

## नीट पेपरफुटी प्रकरणी युवक काँग्रेसचे जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन : विद्यार्थ्यांना न्याय देण्याची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी:** नीट पेपरफुटी प्रकरणी युवक काँग्रेसचे जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन : विद्यार्थ्यांना न्याय देण्याची मागणी; दोषींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

नीट मधील कथित पेपरफुटी, अनियमितता आणि विद्यार्थ्यांवरील अन्यायाच्या निषेधार्थ युवक काँग्रेसच्या वतीने आज मंगळवार १९ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन करत निवेदन देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी सुरू असलेला खेळ तात्काळ थांबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, देशातील लाखो विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी दिवस-रात्र परिश्रम घेतात. मात्र, नीट परीक्षेत सातत्याने समोर येत असलेल्या पेपरफुटी, गुणांतील विसंगती आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींमुळे विद्यार्थ्यांमध्ये असुरक्षितता व नैराश्याची भावना निर्माण होत आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेवरील विद्यार्थ्यांचा विश्वास डळमळीत होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. या संपूर्ण प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, तसेच पंतप्रधान नरेंद मोदी यांनीही विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

पेपरफुटी प्रकरणानंतर निर्माण झालेल्या मानसिक तणावामुळे प्रसारमाध्यमांतील वृत्तांनुसार काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटनांचा उल्लेख करत युवक काँग्रेसने तीव्र चिंता व्यक्त केली. संबंधित विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना शासनाने आर्थिक मदत, समुपदेशन आणि पुनर्वसन सहाय्य द्यावे, अशी मागणीही करण्यात आली. तसेच नीट



प्रकरणाची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर फौजदारी कारवाई करावी, परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुरक्षित करावी आणि विद्यार्थ्यांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

दरम्यान, हे आंदोलन युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज दादा मोरे तथा परभणी युवक काँग्रेस प्रभारी भगवानराव पंडागळे यांच्या आदेशानुसार करण्यात आले. सचिन जवंजाळ पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी जि.प. सदस्य अजिद दादा वरपुडकर, सुहास पंडित, मयुर मोरे, अमोल डाखोरे, राजपाल देशमुख, डिगांबर खरवडे, गोविंद झाडे, गोविंद चोपडे, गोविंद शर्मा, दत्ता कदम, कुणाल गायकवाड यांच्यासह युवक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अग्रलेख...

# शब्द वाटू धन, जनलोकां

शब्द हे शस्त्रासारखे असतात. जर एखाद्या बलवानाने हाती असलेल्या शब्दांचे शस्त्र उगारले तर त्याचा घाव अधिक खोलवर रुततो. ज्यांच्या हाती ते शस्त्र द्यावयाचे तो केवळ बलवान असून चालत नाही, तर शस्त्र चालविण्याची विवेकी विचारशक्ती त्याच्याकडे असावी लागते. शब्दांचे शस्त्र कुठे चालवायचे, केव्हा म्यान करायचे याचे भान राखावे लागतेच; पण काही वेळा गरज नसताना परजलेले शस्त्र अकारण कुठे तरी घाव घालून जाते. मुळात शब्द स्वभावतः संयमीच असतात. कोणत्याही शस्त्रात ठासून भरले तरी ते स्वतःहून चाल करून जात नाहीत. जीभ सैल असेल तरच ते जिभेवरून घसरतात. अशा रीतीने घसरल्यामुळे बाहेर पडलेल्या शब्दांचीच पंचाईत होते. कारण बाहेर पडलेला शब्द पुन्हा माघारी येत नसतो. मग सुरू होते शब्दांना सावरण्याची कसरत. नवनवे वादन निर्माण होऊ लागतात. त्यामुळे शब्दांचा शस्त्र म्हणून वापर करावयाचा की शब्द हे विचारांची रत्ने आहेत असे समजून त्यांचा सांभाळ करावयाचा हे ज्याचे त्याने ठरवायचे असते. कधी कधी शब्दांची जिभेवरून बाहेर पडण्याची प्रक्रिया ठरल्याप्रमाणे पार पडली, तरी जीभ जाणीवपूर्वक सैल सोडली जाते आणि शब्दांच्या खेळांची मजा अनुभवल्यानंतर त्यांनाच दोष देत सारवासारव सुरू होते. 'माझ्या बोलण्याचा विपर्यास केला', 'मला असे म्हणावयाचे नव्हते', 'मी तर असे बोललोच नव्हतो'' अशी वाक्ये अलिकडे अधूनमधून कानावर येतात; तो या शब्दांच्या खेळाचाच पुढचा टप्पा असतो. अशा वाक्यांतून शब्दांची विश्वासार्हता तर संपतेच, पण ज्याच्या जिभेवरून ते बाहेर पडलेले असतात, त्यांच्यावरील विश्वासही पणाला लागलेला असतो. विशेषतः राजकारणात शब्दांचा हा 'बोललो होतो-नव्हतो' खेळ कमालीचा लोकप्रिय असल्याचे अनेकवार दिसून आले आहे. आधी बेफिकीरपणे शब्द सोडून द्यायचे आणि नंतर त्यांची जबाबदारी झटकून टाकावी, असे राजकारणात अनेकदा घडलेले आहे. काही दशकांपूर्वी, जेव्हा शब्द केवळ कागदावरच टिपून घेतले जायचे, तेव्हा ते मागे घेणे किंवा त्यांची जबाबदारी झटकून टाकणे फारसे कठीण काम नव्हते. आपण असे बोललोच नव्हतो, असे बिनदिक्कतपणे सांगणे सोपे होते. माझ्या बोलण्याचा विपर्यास केला, असे सांगून बचाव करणारे राजकारणी नेते हे तेव्हा खरेखुरे धुरंधर मानले जात असत. पुढे माध्यमविश्वात प्रगती झाली, तंत्रज्ञानाचा भक्कम आधार माध्यमांना मिळाला आणि जिभेवरून बाहेर पडलेले किंवा शब्दशः 'घसरलेले' शब्द साठविण्याची व जतन करून ठेवण्याची सोय झाली. आजही आपल्या जिभेवरून घरंगळत बाहेर पडलेल्या किंवा घसरलेल्या शब्दांची जबाबदारी झटकण्याचे केविलवाणे प्रयत्न होताना दिसतातच. याला सारवासारव करणे असे म्हटले जाते. असे केल्याने शब्दांची विश्वासार्हता डळमळीत झाली, तरी ते उच्चारणाऱ्या जिभांना संरक्षण मिळते असे काही क्षेत्रांत विश्वासाने मानले जाते.

गेल्या अनेक वर्षांत अशारीतीने आपल्या तोंडून बाहेर पडलेल्या शब्दांची हत्यारे आपल्यावर उलटल्याचे दिसून आल्यानंतर बचावाचे साधन म्हणून जबाबदारी झटकण्याचे जे प्रकार घडले, त्यामध्ये पुढे कोणतेच क्षेत्र मागे राहिलेले नाही असे दिसते. राजकारणात नेहमी वापरला जाणारा हा बचावाचा उपाय अन्य अनेक क्षेत्रांत वापरला जाऊ लागला आणि जीभ घसरली तरी फारसा फरक पडत नाही, असेही अनेकांस वाटू लागले. आपल्या शब्दांचा वाद निर्माण झाला असे दिसू लागले तरी तोवर ते बोलणाऱ्या व्यक्तीचे मूळ उद्दिष्ट साध्य झालेले असल्याने, विपर्यास झाल्याचे खापर बरेचदा माध्यमांवर फोडले जाते. अध्यात्म क्षेत्राशी संबंधित असलेल्या लोकांमध्ये प्रसिद्ध असलेल्या धीरेंद्र शास्त्री नावाच्या एका व्यक्तीने छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अलिकडेच केलेल्या एका वक्तव्यावरून वाद भडकल्यानंतर सारवासारवीचा हाच उपाय वापरला होता, हे अनेकांस आठवत असेल. माझ्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात आला असून मोडतोड केलेले वक्तव्य प्रसृत करण्यात आले, हाच बचाव त्यांनीही केला होता. आपल्या वक्तव्याची केवळ एकच बाजू दाखवून विपर्यास केला गेला, असा बचावही काहींनी केल्याची उदाहरणे आहेत. आपल्या बोलण्याचा नेहमीच विपर्यास केला जातो असे सांगत लोकांचा विश्वास जपण्याचे व सहानुभूती मिळविण्याचे प्रयत्न काही करतात. आता माध्यमांसमोर व्यक्त केलेल्या विचारांची जबाबदारी टाळली तर पुराव्यानिशी ती माथी मारलीच जाते हे स्पष्ट होऊ लागल्यामुळे राजकीय क्षेत्रातील कोणासही अशी वक्तव्ये करताना अनेकदा विचार करावा लागत असल्याने, अशी काही वादग्रस्त वक्तव्ये कुणी केलीच, तर जाणीवपूर्वक वाद निर्माण करण्याचा त्यामागे हेतू असावा, असा समाजाचा समज पक्का होत असतो, हे लक्षात घेऊन वक्तव्ये करताना भान ठेवावे लागतेच, पण अशा वक्तव्यांची खरोखरीच मोडतोड किंवा विपर्यास झाला असेल, तर तसे करणाऱ्यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उमटत असते. असा मोठा नाजूक आणि संवेदनशील काळ सध्या आलेला असल्याने कोणतेही वक्तव्य केल्यानंतर त्यांचे बरे-वाईट परिणाम आपल्याला भोगावे लागणारच, याची जाणीव ठेवणे आवश्यक असते. कारण अशा वक्तव्यांतून निर्माण होणाऱ्या विश्वासार्हतेवरील प्रश्नचिन्हे केवळ त्या व्यक्तीभोवती केंद्रित न राहता त्याच्याशी संबंधित असलेल्या व्यवस्थेवरही उमटत असतात. राजकीय नेत्यांच्या अशा सवयीमुळे संपूर्ण राजकारणाच्या विश्वासार्हतेवर उमटलेली प्रश्नचिन्हे आपण अनेकदा पाहिली आहेत. चित्रपटसृष्टीतील वक्तव्यांकडे तर कुजबुज किंवा गॉसिप म्हणूनच पाहिले जात असल्याने त्यांची विश्वासार्हता शंकास्पदच असते, हे समाजानेही स्वीकारलेले आहे. म्हणूनच ज्या व्यवस्थांकडे विश्वासाने पाहिले जाते अशा व्यवस्थांमध्ये अशा वक्तव्यांना जागा असू नये, अशी समाजाची अपेक्षा असते. न्यायव्यवस्थेविषयी ही अपेक्षा काहीशी अधिक असते. कारण ही व्यवस्था संपूर्णपणे समाजाच्या विश्वासावर उभी राहिलेली असते. इथे उमटणारा प्रत्येक शब्द हा अंतिम असतो, अशी समाजाची श्रद्धा असते आणि अशा प्रत्येक शब्दाला न्याय मानून तो स्वीकारण्याची समाजाची मानसिकताही असते. न्यायव्यवस्थेतील शब्द हे केवळ शस्त्रे नव्हेत तर रत्ने असतात. शब्द हा देव असतो, अशी आपल्या संतांची शिकवण आहे. शब्द हेच जिवांचे जीवन असते, ते वाटल्यास वाढतात, असे संतपरंपरा मानते. याच संतपरंपरेचे पाईक असलेल्या समाजात शब्दांची ही महती मान्य असल्यामुळे त्यांची पूजा केली जाते. म्हणून ज्या व्यवस्थांमध्ये शब्द हे प्रमाण असते, तेथे विपर्यासास वाव असता नये.

भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी एका प्रकरणावरील सुनावणीदरम्यान केलेल्या वक्तव्यांमुळे उफाळलेल्या वादातून पुन्हा एकदा शब्दांच्या पावित्र्याची कसोटी लागणार आहे. विधि क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बनावट पदव्या मिळविल्या जात असल्याच्या मुद्द्यावर चिंता व्यक्त करताना सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी वापरलेल्या काही कथित शब्दांवरून गदारोळ माजला आणि त्यावर स्पष्टीकरण करण्याची वेळ सरन्यायाधीशांवर आली. आजचा तरुण हा विकसित भारताचा आधारस्तंभ आहे; त्याचा मला अभिमान आहे, असा खुलासा करताना, आपल्या वक्तव्याचा विपर्यास झाल्याची खंत त्यांना व्यक्त करावी लागली. न्यायसंस्थेतील सर्वोच्च पदावरील व्यक्तीच्या तोंडून उमटलेले कथित शब्द वादग्रस्त ठरून त्याच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उमटल्याने पुन्हा एकदा शब्दांचा वापर करण्याच्या विवेकाचा मुद्दा ऐरणीवर आलाच आहे. न्यायालयीन प्रक्रियेत आणि लोकशाहीत न्यायाधीशांच्या वक्तव्यांना अनन्यसाधारण महत्त्व असते. न्यायाधीशांनी युक्तिवादादरम्यान नोंदविलेली तोंडी निरीक्षणे अनेकदा चर्चेचा मुद्दा ठरतात आणि त्याचे सामाजिक पडसादही उमटतात. कारण अशा वक्तव्यांचे परिणाम केवळ तात्कालिक न राहता, व्यवस्थेच्या तटस्थ प्रतिमेवरही होत असतात. वस्तुतः ही वक्तव्ये म्हणजे निवाडा नसतो; तथापि त्याची नोंद घेतली जात असते. काही वक्तव्ये केवळ वैयक्तिक मतप्रदर्शन नव्हे, तर संविधानाच्या चौकटीच्या मर्यादा दाखविणारी असतात. म्हणूनच या व्यवस्थेतील शब्द हे शस्त्रे नव्हे तर रत्ने असतात. समाजाच्या मनात असलेली ही भावना संवेदनशीलतेने जपली गेली पाहिजे इतकेच!

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# मजूर पक्षाच्या अस्तित्वाचा लढा

ब्रिटनमध्ये जिमी कार्बिन यांच्या यांच्या नेतृत्वाखाली मजूर पक्षाने पुन्हा डावीकडे झुकण्याचा प्रयत्न केला. कार्बिन यांनी सामाजिक न्याय, सरकारी गुंतवणूक आणि युद्धविरोधी भूमिका यावर भर दिला; पण त्याच वेळी त्यांच्यावर अतिडावे, अव्यवहार्य आणि राष्ट्रीय सुरक्षेबाबत कमकुवत असल्याचे आरोप झाले. ब्रिटिश जनतेने त्यांना पूर्णपणे स्वीकारले नाही. त्या पराभवानंतर कीर स्टार्मर यांना पुढे आणण्यात आले. त्यांनी पक्षाला 'विश्वासार्ह' आणि 'सत्तेसाठी योग्य' बनवण्याचे आश्वासन दिले. प्रत्यक्षात त्यांनी कार्बिन युगातील अनेक नेत्यांना बाजूला केले. पक्षातील डाव्या गटाची ताकद कमी केली आणि मजूर पक्षाला पुन्हा मध्यवर्ती राजकारणाकडे आणले; पण इथेच स्टार्मर यांची खरी अडचण सुरू झाली. निवडणूक जिंकली खरी; पण ते पक्षाची स्पष्ट वैचारिक ओळख निर्माण करू शकले नाहीत. ते ना पूर्णपणे ब्लेअरवादी मध्यममार्गी ठरले, ना पारंपरिक समाजवादी. परिणामी, मजूर पक्षात एक प्रकारची वैचारिक पोकळी निर्माण झाली. सामान्य मतदारांना हा पक्ष नेमका कोणासाठी आहे, हेच समजेनासे झाले. स्थलांतराच्या प्रश्नावर पक्षाची भूमिका सतत बदलत राहिली. आर्थिक धोरणांमध्ये काटकसरीची भाषा आणि कल्याणकारी राज्याची आश्वासने यांचा विचित्र मेळ दिसला. पर्यावरण, ओळख राजकारण आणि अल्पसंख्यकांवरील प्रश्नांवर भर देताना पारंपरिक कामगार वर्गाच्या आर्थिक असुरक्षिततेकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही, अशी भावना वाढली. या पृष्ठभूमीवर ब्रिटनच्या कामगार वर्गातील अनेक मतदारांना मजूर पक्ष आता आपला राहिला नाही, असे अनेकांना वाटू लागले.

स्थलांतर, राष्ट्रीय ओळख आणि सांस्कृतिक बदलांविषयी अस्वस्थ असलेला पारंपरिक मतदार अलिकडे 'रिफॉर्म यूके'कडे आकर्षित होऊ लागला. हे केवळ निवडणूक गणिताचे बदल नाहीत, तर ब्रिटनच्या सामाजिक मानसिकतेतील मोठा बदल आहे. पूर्वी आर्थिक विषमता हा डाव्या राजकारणाचा केंद्रबिंदू होता. आता सांस्कृतिक असुरक्षितता आणि राष्ट्रीय ओळख यांसारखे प्रश्न अधिक प्रभावी ठरत आहेत. स्टार्मर आणि मजूर पक्ष या बदलाचे अचूक वाचन करण्यात अपयशी ठरताना दिसतात. स्टार्मर यांच्या नेतृत्वशैलीनेही ही समस्या अधिक गंभीर केली. ते मुळात वकील आणि अभियोजक आहेत. त्यामुळे त्यांची राजकीय शैलीही अत्यंत नियंत्रित, सावध आणि व्यवस्थापकीय स्वरूपाची आहे; पण ब्रिटिश राजकारणात केवळ प्रशासकीय क्षमता पुरेशी नसते. लोकांना भावनिक संवाद साधणारा, संकटात स्पष्ट दिशा देणारा आणि संघर्षाला सामोरे जाणारा नेता हवा असतो. बोरिस जॉन्सन यांच्याभोवती अनेक वाद होते; पण त्यांच्याकडे जनतेशी थेट जोड निर्माण करण्याची क्षमता होती. फरागे यांच्याकडेही ती आहे. स्टार्मर मात्र अजूनही प्रशासकीय अधिकाऱ्यासारखे वाटतात. त्यामुळे आर्थिक संकट, स्थलांतर प्रश्न किंवा पक्षांतर्गत बंडखोरी यासारख्या प्रसंगी ते जनतेमध्ये आत्मविश्वास निर्माण करू शकत नाहीत.



स्टार्मर यांच्याभोवती निर्माण झालेले वादही या प्रतिमेला अधिक हानी पोहोचवत आहेत. पीटर मंडेल्सन यांच्यासारख्या जुन्या ब्लेअरवादी नेत्यांना पुन्हा महत्त्व देणे, निकटवर्तीय सल्लागारांचा वाढता प्रभाव, पक्षातील मतभिन्नतेबाबत असहिष्णुता अशा अनेक बाबींमुळे स्टार्मर यांच्यावर 'नियंत्रणप्रिय' नेतृत्वाचा आरोप होतो आहे. भारतीय संदर्भात पाहायला मिळणारा घराणेशाहीचा आरोप इथे नसला, तरी आपल्या गटातील लोकांनाच पुढे आणणे ही भावना पक्षात नाराजी वाढवत आहे. परिणामी, मजूर पक्षात अस्वस्थता वाढली आहे. हे संकट केवळ स्टार्मर यांच्यापुरते मर्यादित नाही. संपूर्ण युरोपमध्ये डाव्या पक्षांसमोर असेच प्रश्न उभे आहेत. फ्रान्समध्ये समाजवादी पक्ष कोसळला. जर्मनीतील सोशल डेमोक्रॅट्स संघर्ष करत आहेत. इटलीमध्ये उजव्या राष्ट्रवादी शक्ती मजबूत झाल्या. कारण पारंपरिक डावे पक्ष जागतिकीकरणानंतरच्या नव्या वास्तवाला ठोस उत्तर देऊ शकले नाहीत. आर्थिक समानतेची भाषा अजूनही आहे; पण राष्ट्रीय ओळख, सांस्कृतिक बदल आणि स्थलांतर यांसारख्या प्रश्नांवर बचावात्मक दिसतात. परिणामी कामगारवर्गातील मोठा भाग उजव्या राष्ट्रवादी राजकारणाकडे झुकतो आहे. स्टार्मर यांचे आजचे संकट म्हणजे या व्यापक बदलाचे ब्रिटिश रूप आहे. त्यांनी मजूर पक्षाला निवडणूक जिंकून दिली; पण त्याला आत्मा देऊ शकले नाहीत. पक्षाला सत्तेत आणणे आणि दीर्घकालीन वैचारिक दिशा देणे या दोन वेगळ्या गोष्टी असतात. पहिली गोष्ट स्टार्मर यांनी साध्य केली; दुसऱ्यात मात्र ते अपयशी ठरताना दिसतात. म्हणूनच आज ब्रिटनमध्ये विचारला जाणारा खरा प्रश्न 'स्टार्मर राहतील की जातील?' हा नाही.

प्रश्न असा आहे की आधुनिक डावे राजकारण स्वतःची नवी ओळख निर्माण करू शकेल का? कामगारवर्ग, तरुण उदारमतवादी आणि सांस्कृतिकदृष्ट्या अस्वस्थ मध्यमवर्ग या परस्परविरोधी गटांना एकत्र ठेवणारी नवी राजकीय चौकट तयार होऊ शकेल का? स्टार्मर यांचे भवितव्य या प्रश्नांच्या उत्तरांशी जोडले गेले आहे. केवळ पद टिकवण्याची धडपड केली आणि व्यापक वैचारिक संकटाकडे दुर्लक्ष केले, तर त्यांचे नेतृत्व फार काळ टिकणार नाही; पण मजूर पक्षाला नव्याने परिभाषित करण्याचा प्रयत्न केला, तर कदाचित ते आजच्या संकटातून बाहेर पडू शकतील; मात्र त्यासाठी त्यांना प्रशासकीय नेत्यापासून राजकीय नेत्यामध्ये रूपांतर करावे लागेल आणि नेमके तेच त्यांना आजपर्यंत जमलेले नाही. आजची परिस्थिती अशी आहे की स्टार्मर यांचे राजकीय भवितव्य केवळ विरोधकांच्या हल्ल्यांवर अवलंबून नाही, तर ते त्यांच्या पक्षातील सहकाऱ्यांच्या संयमावर अवलंबून आहे.

हिवाळ्यातील इंधन भत्त्यात केलेली कपात हा स्टार्मर यांच्यासाठी राजकीय आत्मघात ठरताना दिसत आहे. यामुळे लाखो ज्येष्ठ नागरिक संकटात सापडले असून पक्षाच्या अनेक खासदारांनी उघडपणे या विरोधात मतदान केले किंवा गैरहजर राहिले. ही स्टार्मर यांच्या अधिकाराला दिलेली पहिली मोठी चपराक होती. स्टार्मर यांच्यावर सध्या सर्वांत जास्त टीका होत आहे ती म्हणजे त्यांनी घेतलेल्या महागड्या भेटवस्तू आणि देणग्यांवरून. ज्या नेत्याला 'मिस्टर क्लीन' म्हणून ओळखले जायचे, त्यांच्यावर आता 'क्रोनिझम' (नातेवाईक आणि मित्रत्वाचे हितसंबंध जोपासणे) चे आरोप होत आहेत. हे प्रकरण बाहेर आल्यावर स्टार्मर हे श्रीमंतांच्या तालावर नाचणारे बाहुले आहेत का? असा प्रश्न विचारला जात आहे. सुरुवातीला या देणग्यांची माहिती दडवून ठेवल्याने स्टार्मर यांची नैतिक बाजू कमकुवत झाली आहे. ब्रिटनची जनता आर्थिक टंचाईचा सामना करत असताना पंतप्रधान मात्र आलिशान जीवनशैली जगत असल्याचा नकारात्मक संदेश लोकांमध्ये गेला आहे. महत्त्वाच्या पदांवर स्टार्मर यांनी केलेल्या नियुक्त्यांवरून प्रशासकीय वर्तुळात मोठी नाराजी आहे. कॅबिनेटमधील प्रभावशाली अधिकारी सु ग्रे यांची नियुक्ती आणि त्यांच्या पगारावरून झालेला वाद यामुळे सरकारची नाचक्की झाली. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मते स्टार्मर हे अनुभवी लोकांपेक्षा आपल्या मर्जीतील लोकांना पदे देऊन 'राजकीय इको-सिस्टिम' तयार करत आहेत. सरकार आणि नोकरशाहीमध्ये संघर्षाची ठिणगी पडते, तेव्हा प्रशासनाची चाके मंदावतात. स्टार्मर यांना सध्या याच गतिरोधकाचा सामना करावा लागत आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# 'एक झाड आईच्या नावे' उपक्रमाचा बोजवारा

दरवर्षी वृक्षारोपण, पर्यावरण जनजागृती, संवर्धन आणि हरित क्रांतीला चालना देण्यासाठी राज्यभरातील प्रशासन, विविध संघटना, शाळा व ग्रामपंचायतींच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात येतात. पावसाळ्याच्या प्रारंभी विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ, महिला बचतगट, निसर्गप्रेमी, युवक मंडळांच्या सहभागातून गावोगावी वृक्षलागवड केली जाते. यामुळे पर्यावरण संरक्षणाबरोबरच नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासही मदत होते. शाळांमध्ये विद्यार्थ्यांना झाडांचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी विशेष उपक्रम घेतले जातात. एक विद्यार्थी एक झाड, माझे झाड माझी जबाबदारी, एक पेड माँ के नाम यांसारख्या मोहिमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष झाडे लावण्यास प्रोत्साहन दिले जाते. अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना लावलेल्या झाडांची नियमित निगा राखण्याची जबाबदारीही दिली जाते. त्यामुळे लहान वयातच पर्यावरणाबाबत संवेदनशीलता निर्माण होत आहे. ग्रामपंचायतींकडून गावातील सार्वजनिक जागा, स्मशानभूमी परिसर, रस्त्यांच्या बाजूची जागा, शाळा परिसर, शेतरस्त्यांवर वृक्षारोपण केले जाते. सकाळी भ्रमंतीला जाणाऱ्या महिला व निसर्गप्रेमी नागरिकांकडून विविध बियांचे जंगल परिसरात रोपण केले जाते. काही गावांमध्ये ग्रामसभेत विशेष ठराव करून वृक्षसंवर्धनाची जबाबदारी निश्चित करण्यात येते.

पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, केवळ झाडे लावणे पुरेसे नाही. त्यांचे संगोपन महत्त्वाचे आहे. त्यामुळे अनेक शाळा व ग्रामपंचायती आता वृक्षसंवर्धन या संकल्पनेवर भर देत आहेत. झाडांना नियमित पाणी देणे, जनावरांपासून संरक्षण करणे, मृत झालेल्या रोपांच्या जागी नवीन रोपे लावणे याकडे लक्ष दिले जात आहे. ग्रामीण भागात पर्यावरण संरक्षणाची प्रभावी चळवळ ठरत आहेत. राज्यात विविध राज्य मार्गांच्या रुंदीकरणाचे काम वेगाने सुरू असताना अनेक ठिकाणी रस्त्यालगतची जुनी व शेकडो वर्षांची वृक्षसंपदा धोक्यात आली आहे. स्थानिक नागरिक व पर्यावरणप्रेमींनी वृक्षतोडीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. रस्ते सुरक्षितता व वाहतूक सुलभतेसाठी रुंदीकरण गरजेचे असले तरी पर्यायी वृक्षारोपण, वृक्षांचे पुनर्स्थापन, कमी प्रमाणात वृक्षतोड यावर भर देण्याची मागणी होत आहे. तोडण्यात येणाऱ्या प्रत्येक वृक्षाच्या बदल्यात अनेक नवीन झाडे लावण्याचा दावा प्रशासनाने केला आहे. धाराशिव जिल्ह्यात 'एक पेड माँ के नाम' या राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत राबविण्यात आलेल्या या मोहिमेची गिनीज बुकमध्ये नोंद झाल्यानंतर जिल्ह्याचे नाव राज्यभर चर्चेत आले. प्रशासन, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी आणि नागरिकांच्या सहभागातून हा विक्रम घडविण्यात आला. मात्र विक्रमाची नोंद झाल्यानंतर आता या झाडांच्या संवर्धनाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची टीका पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांकडून होत आहे. आईच्या नावाने एक झाड हा भावनिक संदेश देत हजारो नागरिकांना या उपक्रमाशी जोडण्यात आले. शासनाच्या विविध विभागांनी लक्ष्य निश्चित करून मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केली. अनेक ठिकाणी शासकीय कार्यालये, शाळा, मोकळी मैदाने, रस्त्यांच्या कडेला आणि गाव परिसरात झाडे लावण्यात आली. वृक्षारोपणावेळी मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धीही करण्यात आली. मात्र प्रत्यक्ष परिस्थिती पाहता अनेक ठिकाणी लावलेली झाडे कोमेजल्याचे चित्र समोर येत आहे. उन्हाळ्याच्या तीव्र झळांमध्ये झाडांना पाणी मिळत नसल्याने अनेक रोपे सुकण्याच्या मार्गावर आहेत. काही ठिकाणी झाडांभोवती संरक्षक जाळी नाही, तर काही ठिकाणी जनावरांमुळे रोपांचे नुकसान झाले आहे. राज्यात २०४७ पर्यंत ३०० कोटी वृक्ष लागवडीचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने हरित महाराष्ट्र आयोग स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. हा आयोग पर्यावरण संवर्धन, जलसंधारण आणि हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी व्यापक लोकचळवळ म्हणून काम करेल.

राज्यातील वनाच्छादन वाढवण्यासाठी, वृक्षारोपण मोहिमेचे नियोजन करण्यासाठी महसूल व वन विभागाने मान्यता दिली आहे. राष्ट्रीय वन धोरणानुसार, कोणत्याही राज्याचे किमान ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित असणे आवश्यक आहे. महाराष्ट्राचे सध्याचे वनाच्छादन २१.२५ टक्के असून ते ३३ टक्क्यांपर्यंत नेण्याचे मोठे उद्दिष्ट आयोगाला दिले आहे. केवळ वृक्षारोपणच नाही तर लावलेली झाडे जगवणे आणि त्यांच्या संवर्धनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे ही या आयोगाची मुख्य जबाबदारी असेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील हा आयोग राज्याच्या पर्यावरण संवर्धनाला नवी दिशा देणार आहे.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# युद्धसंघर्ष आणि भारतीय अर्थव्यवस्था

सुरुवातीला इराण-इस्रायल व त्यानंतर लगेच अमेरिकेसह सर्वच आखाती देशांना या भीषण युद्धाची झळ बसली. आता दोन महिने उलटून गेले तरी, या युद्धाची व्यापकता वाढतीच आहे. उभयपक्षी घेण्यात आलेल्या आक्रस्ताळ्या महत्त्वाकांक्षेपोटी या कालावधीत नागरी परिसर-शहरांपासून शस्त्रास्त्रसाठे-अण्वस्त्र केंद्रांना लक्ष्य करण्यात आले. त्याचे स्वाभाविक परिणाम मानवीहानीपासून विध्वंसापर्यंत झाले. यातून व्यापारी-व्यावसायिक व आयात-निर्यात क्षेत्रदेखील जागतिक पातळीवर प्रभावित झाले. युद्धाशी संबंधितच नव्हे, तर त्याच्याशी दूरान्वयानेसुद्धा संबंध नसलेल्या देशांच्या आर्थिक व्यापार-व्यवहारांवर यामुळे स्वाभाविकपणे विपरीत परिणाम झाले. या मोठ्या विपरीत आर्थिक उलाढालींना भारत आणि भारतीय अर्थव्यवस्था अपवाद ठरली, ही बाब आज जगातील मुत्सद्यांपासून अर्थतज्ज्ञांपर्यंत मान्य करण्यात येत असून, त्याची कारणमीमांसा करतानाच, या पृष्ठभूमीचा धांडोळा घेणे म्हणूनच महत्त्वाचे ठरते.

दोन महिन्यांहून अधिक काळ सुरू असलेल्या या युद्धानंतर सुमारे १५ दिवसांच्या सशर्त युद्धबंदीनंतरच्या काळात, या युद्धाचे भारत आणि भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेले अथवा होऊ घातलेले परिणाम, हा विविध संदर्भात चर्चिला गेलेला विषय ठरला. युद्धग्रस्त आखाती देशांतील तेलसाठे व अण्वस्त्र केंद्रांच्या पृष्ठभूमीवर आर्थिकसंदर्भात सांगायचे म्हणजे, पाकिस्तानसारख्या शेजारी व कर्जबाजारी देशांसह आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेकार्थांनी आर्थिक अस्थिरतेवरील भारताची भूमिका व कारवाई उजवी ठरली. त्यातही महत्त्वाचे म्हणजे, भारत सरकारने तातडीचे व धोरणात्मक निर्णय घेत, तेलसाठे व त्याचा संग्रह करण्यावर सातत्याने भर देतानाच, चलनवाढीवर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वपूर्ण व उल्लेखनीय काम केलेले आहे.

भारताचे मुख्य आर्थिक सल्लागार अनंत नागेश्वरन् यांच्या मते, प. आशियातील युद्ध, त्यानंतरची स्थिती व सध्याची परिस्थिती या साऱ्याचा एकत्रित परिणाम प्रचलित आर्थिक वर्षात होणार असून, पूर्वी अनुमानित वार्षिक ६.६ टक्के विकासदराचे त्यानुसार फेरअवलोकन करणे अपरिहार्य ठरणार आहे. त्यांच्या मते, सध्याची जागतिक स्तरावरील आर्थिक अस्थिरता पाहता, सध्याच याविषयी टिप्पणी करणे घाईचे व धाडसाचे ठरेल. दरम्यान, गोल्डमन ॲण्ड मूडीजच्या नव्या आर्थिक अभ्यासानुसार, या युद्धाच्या पृष्ठभूमीवर भारतात नवा आर्थिक विकासदर ५.९६ टक्के ठरण्याचा अंदाज वर्तविला आहे. हे अंदाज भारताच्या अर्थव्यवस्थेवर युद्धामुळे होणारे संभाव्य आर्थिक परिणाम दर्शवितात.

तुलनात्मकदृष्ट्या गेल्या वर्षी अनंत नागेश्वरन् यांच्या आर्थिक अंदाजानुसार, डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या ५० टक्के अतिरिक्त अधिभारामुळे भारताच्या गेल्यावर्षीच्या आर्थिक विकासदरात ०.०५ ते ०.०६ टक्के घसरण होईल, असे स्पष्ट केले होते. गोल्डमन ॲण्ड मूडीजने गेल्या वर्षीच्या त्यांच्या अभ्यासानुसार, भारताच्या आर्थिक विकासदरात सुमारे एक टक्क्याची घट नमूद केली होती. दोन्ही परिस्थितींमध्ये भारताच्या आर्थिक विकासदरावर विपरीत परिणाम व्यक्त केला होता.

आर्थिक जाणकारांच्या मते, इराण-इस्रायल युद्धाचे भारतावर चार प्रकारे परिणाम होऊ शकतील. यामध्ये भारताला होणाऱ्या तेल-वायूच्या पुरवठ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर विलंब वा व्यत्यय येणे, खत-निर्यातीला होणाऱ्या विलंबित आयातीमुळे भारतीय शेती आणि शेतकऱ्यांवर परिणाम होणे, एकूणच आयात खर्चामध्ये अस्थिरता, विलंब व वाढ होणे व वाहतूक खर्चात प्रचंड वाढ होणे यांचा प्रामुख्याने उल्लेख करण्यात येतो. या साऱ्यांचा एकत्रित व अपरिहार्य परिणाम म्हणून एकूणच आर्थिक व्यवहार विलंबाने होऊ शकतात व त्याचा अपरिहार्य फटका भारताच्या अर्थव्यवस्थेला बसणार आहे. रुपयाचे अवमूल्यन व भारतीय शेअर बाजारात अस्थिरतेसह घसरण इ. सुद्धा होऊ शकते.

या प्रमुख आव्हानात्मक परिस्थितीतसुद्धा अनंत नागेश्वरन् यांच्यानुसार, भारताची अर्थव्यवस्था ही आजही सक्षम समजली जाते. त्यामुळे भारत आणि भारताच्या अर्थव्यवस्थेला युद्ध व त्यानंतर निर्माण झालेली अथवा निर्माण होऊ शकणारी आव्हाने कठीण असली, तरी अशक्य ठरणारी नाहीत. यासंदर्भातील लक्षणीय बाब म्हणजे, युद्धपूर्व काळात व ट्रम्पच्या आर्थिक मनमानीला तोंड द्यावे लागले असतानासुद्धा भारताची अर्थव्यवस्था भक्कम होती. तशातच भारताला अमेरिकेशिवाय युरोपीय देशांचे पाठबळ मिळाल्याने देशांतर्गत मुद्रास्फीती सुमारे १.३ टक्क्यांवर येण्याचे आर्थिक आक्रित घडले होते.

तुलनेने दीर्घकाळ चाललेले युद्ध, त्यावर पाकिस्तानने केलेली अपूर्ण व अपरिपक्व मध्यस्थी व अखेरीस युद्धबंदी दृष्टिक्षेपात न येण्याच्या पृष्ठभूमीवर, जगातील अन्य देशांप्रमाणेच भारताच्या परराष्ट्रीय धोरणासोबतच आर्थिक ऊर्जाविषयक संकटे कायमच आहेत. जनसामान्यांपासून व्यापार-उद्योगापर्यंत युद्धाची झळ लागण्याच्या पृष्ठभूमीवर भारताची भूमिका आणि बाजू अनेकार्थांनी वरचढ ठरली आहे.

या संदर्भात जागतिक पातळीवर तुलना करता, भारताने आपला ऊर्जा क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या तेल व वायूचा साठा-पुरवठा कायम राखण्याचे आव्हान यशस्वीपणे पेलले आहे. इतर अनेक मोठ्या देशांसाठी युद्धकाळात अशक्यप्राय ठरलेली अशी देशपातळीवर सुमारे दोन महिन्यांसाठी आवश्यक असा इंधनसाठा भारताने कायम तर राखलाच व तेही तेल-इंधनदरात नियंत्रण राखून. भारतीय अर्थव्यवस्थेची सद्य:स्थितीतील ही मोठी जमेची बाजू व ऐतिहासिक कामगिरी ठरली. यालाच जोड मिळाली ती इराणच्या प्रभावाखाली असणाऱ्या क्षेत्रातून भारतीय जहाजांच्या सफल व सुरक्षित वाहतुकीची. भारताचे हे मोठे आंतरराष्ट्रीय धोरणात्मक यश अर्थव्यवस्थेसाठीसुद्धा मोठे पाठबळ ठरले आहे.

हीच बाब घरगुती गॅसच्या संदर्भातपण सांगता येईल. गॅस सिलेंडरच्या पुरवठ्यात संथगती निर्माण झाल्याने गॅसधारकांच्या रांगा अपरिहार्यपणे लागल्या. त्यात भर पडली ती, यानिमित्त झालेल्या अफवांच्या बाजाराची. गॅस सिलेंडर्सची टंचाई वा विलंब या कारणांनी खाद्यान्न पदार्थांची व्यापाऱ्यांनी दरवाढ करून घेतली व त्याचा हकनाक फटका ग्राहक म्हणून जनसामान्यांना बसला.

ऊर्जा क्षेत्रातील या जागतिक संकटावर आर्थिक उपाययोजना म्हणून जगातील अधिकांश मोठ्या देशांनी दरवाढ-करवाढ अशा तातडीच्या आर्थिक उपाययोजनांचा पिढीजात आधार घेऊन उद्योग-अर्थव्यवस्थेला सावरण्याचा प्रयत्न केला असला, तरी भारताने युद्धपूर्व काळापासूनच तेल-आयातीच्या विविध पर्यायांचा परिणामकारक वापर करून केलेल्या उपाययोजनेला युद्धकाळात मुत्सद्देगिरीसह घेतलेल्या निर्णयांमुळे आपल्या अर्थव्यवस्थेला त्याचा नेमक्या व निर्णायकक्षणी फायदा झाला, हे विशेष!

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### आम्ही देशाकरिता काय करू शकतो?

आपण नेहमीच देश आमच्याकरिता काय करतो विचारत असतो. जनतेला शत्रूपासून, गुन्हेगारांपासून वाचवणे, रोजगार उपलब्ध करून देणे, दळणवळणाची साधने, रस्ते, रेल्वे, हवाई प्रवास आणि आवश्यक त्या सोयी सुविधा पुरवणे, घर, धान्य, कपडे, शौचालय, वैद्यकीय सुविधा, स्वछता आदी बाबी पुरवणे इत्यादी ही यादी बरीच मोठी आहे. आपल्याकरिता देशाने हे केलेच पाहिजे अशी आपली साधारण अपेक्षा असते व त्यात चूक काहीच नाही.

पण... जेव्हा देशावर संकट येते, शत्रू हल्ला करतो, दहशतवादी कारवाया वाढतात, कोरोनासारखी महामारी येते, दंगली, जाळपोळ होते, आंतरराष्ट्रीय आर्थिक स्थिती युद्धजन्य परिस्थितीमुळे डळमळीत होते आदी... त्यावेळी आपण काय केले पाहिजे? १९६५च्या युद्धाच्या वेळेस लालबहादूर शास्त्रींनी सोमवारी भात खाऊ नये असे आवाहन केले व स्वतः ते अमलात आणले. अजूनही त्या पिढीतील काही लोक सोमवारी भात खात नाहीत. १९६७ मध्ये इंदिरा गांधींनी जनतेने किमान वर्षभर सोने विकत घेऊ नये व सरकारला म्हणजेच देशाला सहकार्य करावे अशी विंनती केली व देशप्रेमी नागरिकांनी त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला. आज परत जागतिक महायुद्धाची परिस्थिती जगासमोर ठाकली आहे.

इंधनाचा पुरवठा विस्कळीत झाला आहे, सोन्याचे भाव आकाशाला भिडत आहेत, परकीय चलन व गंगाजळीच्या समस्या वाढत आहेत. अशा प्रसंगी आपले सरकार देशाकरिता एक वर्ष सोने विकत घेऊ नका, परदेशी प्रवास टाळा, विदेशी वस्तू विकत घेऊ नका असे आवाहन करते तर त्याला सकारात्मक प्रतिसाद देणे हे देशातील जनतेचे कर्तव्यच आहे. अशा बिकट प्रसंगी देखील या गोष्टीचे गलिच्छ राजकारण करणारेही आहेत, त्यांचा विचार न करता आपण देशाकरिता काय करू शकतो ते आपण केलेच पाहिजे.

**रवी वाघमारे**/नागपूर

## वाचक पत्रे

### वैनगंगा-नळगंगा प्रकल्प लाभदायक

उपरोक्त बातमी तरुण भारतात वाचण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा हा ड्रीम प्रोजेक्ट आहे, तो यशस्वी व्हावा यासाठी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत गवळी, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेश सोनटक्के, अधीक्षक अभियंता महादेवराव कदम, कार्यकारी अभियंता जितेंद्र तुरखेडे रात्रंदिवस मेहनत घेत आहेत. वैनगंगा नळगंगा हा नदीजोड प्रकल्प अस्तित्वात येत असल्याने विदर्भातील अन्नदाता शेतकरी सुखी समृद्ध होणारच यात शंका नाही. या प्रकल्पासाठी गोसीखुर्द धरणातून १२ जुलै ते २० सप्टेंबर या ७० दिवसांच्या मान्सून कालावधीत सुमारे ६३.६६ टीएमसी अतिरिक्त पाणी येते आणि साठवण क्षमता नसल्याने वाहून जाते. हेच अतिरिक्त पाणी उचलून त्यावरच नदी जोड प्रकल्प उभारला जाईल, अशी माहिती गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत गवळी यांनी दिली. या प्रकल्पामुळे ४ लाख ४ हजार २८१ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. वैनगंगा नळगंगा नदी जोडण्यासाठी ३४ नवीन धरणे बांधण्यात येणार आहेत. गोसीखुर्दपासून नळगंगा धरणापर्यंत ३२८.२८ किलोमीटर लांबीचे कालवे तयार केले जातील. त्याकरिता ३१ हजार ४९५ हेक्टर जमीन लागेल. त्या पोटी ४७.१७ टीएमसी पाणी सिंचनासाठी उपयोगी आणले जाईल. नदीजोड प्रकल्पात २८ हजार ३०६ हेक्टर जागा बुडीत क्षेत्रात जाईल, त्याकरिता ३९ गावांतील ७३१६ कुटुंबाचे पुनर्वसन केले जाणार आहे. प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरू करण्याआगोदर पुनर्वसनाच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे असे वाटते. सोबतच हा प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावा अशी अपेक्षा आहे.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

### जलसंवादावरचा वाचनीय अग्रलेख

सोमवार १८ मे च्या अंकातील 'जलसंवाद आणि टीआरपीच्या पल्याडचे गडकरी' हा अतिशय नाजूक विषयावरचा अग्रलेख वाचला. भूजल संवर्धन व एकूणच पाण्याची समस्या गंभीर आहे. हल्ली राजकारणात प्राधान्यक्रम ठरवताना गंभीर विषयांकडे दुर्लक्ष होते आणि म्हणूनच नितीन गडकरींसारखा राष्ट्रीय पातळीचा नेता जलसंवाद व जलक्रांती यावर परिषद घेतो ही कौतुकास्पद बाब आहे.

महाराष्ट्रामध्ये कित्येक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या अतिशय बिकट आहे. विहिरीच्या पुनर्भरणाचा प्रश्न कोणीही गांभीर्याने घेत नाही. त्यामुळे पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्था किंवा जलतारा या प्रकल्पाचे जनक डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांच्या अशा प्रकारच्या सामाजिक कार्याचे कौतुक वाटते. ही लोकचळवळ होणे गरजेचे आहे, असे वाटते.

**सुरेश पंदारे**/पुणे. ९३७२१९९१००

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# पुरुषोत्तमपुरी मंदिर परिसरात महिलेचे साडेपाच तोळ्याचे सोन्याचे गंठण चोरी

## चोरट्यांचे पोलीसासमोर आवाहन

माजलगाव (प्रतिनिधी ) पुरुषोत्तमपुरी येथील मंदिर परिसरात दर्शनासाठी आलेल्या एका महिलेच्या पर्समधून अंदाजे साडेपाच तोळ्यांचे सोन्याचे गंठण अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना रविवारी दि.17 मे रोजी सकाळी घडली.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, उमा शिवराज स्वामी (वय 54, रा. निलंगा, जि. लातूर) या आपल्या मैत्रिणींसह अधिक मासानिमित्त पुरुषोत्तमपुरी येथे दर्शनासाठी आल्या होत्या. सकाळी सुमारे 10.30 वाजता मंदिर परिसरात पास घेण्यासाठी रांगेत उभ्या असताना मोठी गर्दी होती. मंदिर परिसरात मौल्यवान वस्तू सांभाळण्याबाबत माईकवरून सूचना करण्यात आल्याने त्यांनी आपल्या गळ्यातील साडेपाच तोळ्यांचे सोन्याचे साखळीचे गंठण फिकट गुलाबी रंगाच्या पर्सच्या मागील कप्प्यात ठेवले होते.

दरम्यान, सकाळी सुमारे 11 वाजण्याच्या सुमारास दर्शनाचा पास खाली पडल्याने त्या तो उचलत असताना पर्समधील 50 रुपयांची नोट खाली पडली. त्यावेळी पर्सच्या कप्प्याची चैन उघडी असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी पाहणी केली असता पर्समधील अंदाजे 55 हजार रुपये किंमतीचे सोन्याचे गंठण अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे आढळून आले.

या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# परळी नगरपरिषदेविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे आक्रमक "ढोल बजाव" आंदोलन

## ढोल-ताशांच्या निनादाने नगरपरिषद परिसर दणाणला

**परळी वैजनाथ** | प्रतिनिधी

परळी नगरपरिषदेच्या कथित ढिसाळ, मनमानी व जनविरोधी कारभाराविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) आक्रमक झाली असून आज नगरपालिकेसमोर जोरदार "ढोल बजाव" आंदोलन छेडण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात झालेल्या या आंदोलनामुळे नगरपरिषद परिसर अक्षरशः दणाणून गेला होता.

"जनतेच्या पैशांचा हिशोब द्या", "विकासकामांची चौकशी करा", "घरकुल लाभार्थी यादी जाहीर करा" अशा जोरदार घोषणा यावेळी देण्यात आल्या. आंदोलनात सहभागी कार्यकर्त्यांनी नगरपरिषदेच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त करत भ्रष्टाचाराच्या चौकशीची मागणी केली.




राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने प्रभाग क्रमांक १५ व नवीन १६ नांदुरवेस परिसरात सन २०१६ ते २०२५ दरम्यान झालेल्या विकासकामांची सविस्तर माहिती सार्वजनिक करावी, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर कामांची चौकशी करावी, प्रधानमंत्री आवास योजना व रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांची यादी जाहीर करावी, अशा प्रमुख मागण्या या आंदोलनादरम्यान करण्यात आल्या.

याशिवाय नगरपरिषद कार्यालयातील फर्निचर खरेदीतील खर्चाची माहिती जाहीर करावी, पालखी मार्गावरील अंबेवेस येथे सुरू असलेल्या पुलाच्या कामाची चौकशी करण्यात यावी तसेच शहरात "नमो उद्यान" उभारण्यात यावे, अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या. यावेळी "जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडू," असा इशारा शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांच्यासह आंदोलनकर्त्यांनी दिला.

आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) परळी शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील, माजी नगराध्यक्ष दीपक नाना देशमुख, जेष्ठ नेते उत्तमदादा माने, अँड. जीवन देशमुख, नगरसेवक तथा गटनेते नितीन बागवाले, नगरसेवक कादर पाशा कुरेशी, याकुब शेख, अमर रोडे, लखन मोरे, गणेश सोळंके, चंद्रकांत पटाडे, सोहेल, गुलाब पिळवटे, निलेश वाघमारे, समीर कोरे, प्रमोद चौंडे, वैजनाथ जोशी, सतीश बागवाले, दीपक जाधव, सचिन चव्हाण, कल्पेश बागवाले, श्रीकृष्ण गायकवाड, लखन गायकवाड, आकाश बागवाले, शेख जाहेद, समीर कुरेशी, राजा खान यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# 'स्वाराती' चे डॉ. अभिमन्यू तरकसे यांचा काळवटी तलावात बुडून मृत्यू

अंबाजोगाई (त भा वृत्तसेवा)

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील भूलतज्ञ विभागाचे विभागप्रमुख डॉ. अभिमन्यू तरकसे यांचा काळवटी साठवण तलावात बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि. 19 मे) सकाळी घडली. या घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्रासह अंबाजोगाई शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. अभिमन्यू तरकसे हे दररोजप्रमाणे सकाळी पोहण्यासाठी काळवटी साठवण तलाव परिसरात गेले होते. पोहत असताना अचानक त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने ते पाण्यात बुडाले, अशी प्राथमिक माहिती सूत्रांकडून मिळत आहे. घटनेची माहिती समोर येताच परिसरात एकच खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांनी व संबंधितांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. मात्र, त्यांना वाचविण्यात अपयश आले.

डॉ. अभिमन्यू तरकसे हे 'स्वाराती' मधील अनुभवी व कर्तव्यदक्ष डॉक्टर म्हणून परिचित होते. त्यांच्या अकाली निधनामुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून, सहकारी डॉक्टर, कर्मचारी व मित्रपरिवारांकडून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत गाठले शिखर...!

अंबाजोगाई जवळील धावडी गावचे रहिवासी असलेले डॉ. अभिमन्यू तरकसे यांचे प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत झाले होते. या बिकट परिस्थितीवर मात करत त्यांनी शालांत व उच्च माध्यमिक परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळवले. त्यानंतर अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयातूनच त्यांनी वैद्यकीय पदवी (MBBS) घेतली. पुढे याच महाविद्यालयातून त्यांनी 'भूलशास्त्र' विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. याच संस्थेत 'ज्युनिअर रेसिडेंट' म्हणून रुजू झालेले डॉ. तरकसे आपल्या कौशल्याच्या जोरावर पुढे याच विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत होते.

दरम्यान याच काळवीट साठवण तलावात सहा महिन्यांपूर्वी विश्वनाथ बुरांडे यांचा बुडून मृत्यू झाला होता आता तरी नगरपरिषद प्रशासन या काळवीट साठवण तलावात पोहण्यास बंदी घालणार काय? असा प्रश्न अंबाजोगाईकर विचारत आहेत.

# परळी नगर परिषदेकडून मान्सूनपूर्व नालेसफाई मोहिमेला सुरुवात ; मोहीम ३० मे पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन

परळी वैजनाथ : प्रतिनिधी. : आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणी साचणे, दुर्गंधी व विविध गैरसोयींचा सामना करावा लागू नये यासाठी नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व स्वच्छता सभापती सौ.प्राजक्ताताई श्रीकृष्ण कराड यांच्या निर्देशाने परळी नगर परिषदेच्या वतीने मान्सूनपूर्व नालेसफाई मोहिमेला आज (दि.१६) पासून सुरुवात करण्यात आली. यावेळी नगर परिषदेचे पदाधिकारी, नगरसेवक तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



परळी वैजनाथ शहरातील नदी, नाले, गटारी आणि पावसाच्या पाण्याचा निचरा होणाऱ्या मार्गांची युद्धपातळीवर स्वच्छता करण्यात येत असून ही मोहीम ३० मेपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन नगर परिषद प्रशासनाने केले आहे. शहरातील विविध भागांत साचलेला गाळ, कचरा व अडथळे हटवून पाण्याचा प्रवाह सुरळीत करण्यावर भर दिला जाणार आहे. पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या संभाव्य अडचणी टाळण्यासाठी प्रशासनाने आधीच तयारी सुरू केली असून स्वच्छ, सुरक्षित आणि मान्सूनपूर्व आवश्यक सर्व तयारी हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून काम वेगाने सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, शहरातील नागरिकांनीही स्वच्छता मोहिमेत सहकार्य करावे, नाल्यांमध्ये कचरा टाकू नये तसेच परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन नगर परिषदेकडून करण्यात आले आहे.

# अखेर बीड पंचायत समितीला संतप्त शेतकऱ्यांनी ठोकले टाळे

## शिवराय, फुले, शाहु, आंबेडकर वाद्यांची आघाडीच्या भिमराव कुटे यांच्या नेतृत्वात आंदोलन

बीड । प्रतिनिधी

बीड पंचायत समितीच्या मार्फत शेतकर्यांसाठी शासनाच्या अनेक योजना आहेत. मात्र या योजनांचा प्रत्यक्ष लाभ तालुक्यातील शेतकर्यांना मिळून देण्यासाठी पंचायत समितीचे बीडीओंसह अधिकारी-कर्मचारी सफशेल अपयशी ठरल्याने अखेर शेतकर्यांनी शिवराय-फुले-शाहु-आंबेडकर वाद्यांची आघाडीचे समन्वयक भीमराव कुटे पाटील यांच्या नेतृत्वात आज पंचायत समिती कार्यालयास टाळे ठोकले.

शेतकर्यांच्या वैयक्तिक लाभाच्या विविध योजना शासनाने आखल्या आहेत. यामध्ये सिंचन विहीरी, गायगोटे, वृक्ष लागवड, घरकुल योजना, पांणद रस्ते या योजनांची अंमलबजावणी पंचायत समिती मार्फत करण्यात येते. परंतु या योजनेचा लाभ बीड तालुक्यातील शेतकर्यांना मिळत नसून योजनांची प्रभावीपणे राबविण्याची जवाबदारी बीड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व त्यांचे विविध विभागाचे प्रमुखांची आहे मात्र ते यात पूर्णपणे अपयशी ठरलेले आहेत.

तसेच सचन विहीरी, गायगोटे, वृक्ष लागवड, घरकुल योजना, पांणद रस्ते या योजनांमध्ये तत्कालीन गटविकास अधिकारी अनिरूद सानप यांनी लाभार्थ्यांकडून उघडपणे पैसे जमा करुन जवळपास पाच कोटी रुपयांच्या आसपास आर्थिक गैर व्यवहार केल्यामुळे बीड तालुक्यातील शेतकर्यांचे अतोनात नुकसान झाल्याचा गंभीर आरोप आंदोलनकर्त्यांनी यावेळी केला असून शेतकर्यांच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचे पैसे संबंधिताना लाच दिल्याशिवाय खात्यावर जमा केले जात नाहीत.

# उत्साहात भूमिपूजन : आ.धनंजय मुंडे यांच्या आमदार निधीतून परळीतील पुरातन काळभैरव मंदिर येथे सभागृहाची होणार उभारणी !

परळी वैजनाथ, प्रतिनिधी....

वैद्यनाथ मंदिर परिसरात नेहरु चौक (तळ) भागातील पुरातन श्री काळभैरव मठ संस्थानचे मंदिर आता नवे रूप घेणार असून माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या आमदार निधीतून याठिकाणच्या सभागृहासाठी वीस लक्ष रुपयांचा स्थानिक विकास निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून बहुउद्देशीय सभागृह उभे राहणार आहे. या सभागृहाच्या बांधकामाचे भूमिपूजन रविवारी (.दि.१७) ह.भ.प. भरत महाराज जोगी व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



परळी वैजनाथ ही ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाची नगरी आहे. वैद्यनाथ मंदिर व परिसरात पुरातन अनेक मठ, मंदिरे आणि देवालये आहेत. या जुन्या वास्तूंना नव्याने रुप देवून हा पुरातन वारसा व संस्कृतीची प्रतिके जपणे अत्यंत गरजेचे ठरते. तसेच ही मंदिरे परळी व पंचक्रोशीतील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान आहेत. श्री काळभैरवाचे तळावरील मंदिर अतिशय जाज्वल्य असे श्रद्धास्थान असून या ठिकाणी सुसज्ज असे बहुउद्देशीय सभागृह उभे राहिले पाहिजे अशी नागरिक व श्रद्धाळू भाविकांची भावना होती. या अनुषंगाने येथे बहुउद्देशीय सभागृह उभारणीसाठी परळी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार धनंजय मुंडे यांच्या स्थानिक विकास निधी मधून वीस लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या बहुउद्देशीय सामाजिक सभागृहाचे ह.भ.प. भरत महाराज जोगी व मान्यवरांच्या उपस्थितीत अतिशय उत्साहात भूमिपूजन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, श्री काळभैरव मंदिर चे विश्वस्त ह.भ.प. भरत महाराज जोगी, न.प.चे गटनेते वैजनाथ सोळंके, नगरसेवक जयराज देशमुख, पत्रकार संजय खाकरे, अक्षय शिंदे, इंद्रजीत विभुते,विशाल चव्हाण, अमोल वाघमारे, अमोल विभुते, व्यंकटेशराव गंगावणे, दीपक नागेश्वर आदी उपस्थित होते.

# जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी साहेब, 'उघडा डोळे बघा नीट'! अनिल बोर्डे यांची आक्रमक भूमिका

## बीड जिल्ह्यात गेल्या ३ वर्षांपासून ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना रखडली; ग्राहक पंचायत महाराष्ट्र संघटनेचा प्रशासनाला थेट इशारा

गेवराई (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यात ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना गेल्या तीन वर्षांपासून रखडलेली आहे. यासंदर्भात वारंवार पाठपुरावा करूनही जिल्हा स्तरावर आणि शासकीय पातळीवर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. परिणामी जिल्ह्यातील लाखो ग्राहकांचे प्रश्न आणि समस्या प्रलंबित आहेत. जिल्हा पुरवठा अधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी साहेब यांचे या गंभीर बाबीकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असून, "आता तरी उघडा डोळे आणि बघा नीट" अशी म्हणण्याची वेळ आली आहे, अशी घणाघाती टीका ग्राहक पंचायत महाराष्ट्र (नोंदणीकृत) संघटनेचे बीड जिल्हा उपाध्यक्ष अनिल गोविंदराव बोर्डे यांनी केली आहे. याप्रकरणी त्यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेत प्रशासनाचा तीव्र निषेध केला आहे.बीड जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यासाठी ग्राहक पंचायत महाराष्ट्र या अधिकृत व नोंदणीकृत संघटनेच्या वतीने आवश्यक ती सर्व कायदेशीर कागदपत्रे जिल्हा प्रशासनाकडे वेळेत सादर करण्यात आली आहेत. मात्र, जिल्हास्तरीय शासकीय यंत्रणेने अद्याप त्यावर कोणताही निर्णय किंवा विनिमय केलेला नाही. शासकीय कामातील या दिरंगाईमुळे आणि लालफितीच्या कारभारामुळे ग्राहक चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये सध्या तीव्र असंतोषाचे वातावरण पसरले आहे.

ज्या प्रतिनिधींची नावे सुचवण्यात आली आहेत, ते संघटनेचे अधिकृत कार्यकर्ते असून गेल्या अनेक वर्षांपासून ग्राहक प्रबोधन, जनजागृती आणि ग्राहक हक्कांच्या रक्षणासाठी सातत्याने सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. अशा अनुभवी कार्यकर्त्यांना समितीत स्थान देऊन तात्काळ ग्राहक संरक्षण परिषद बीडची समिती व विशेष कक्ष स्थापन करणे आवश्यक होते. त्यामुळे ग्राहकांच्या दैनंदिन समस्यांचा निपटारा करणे प्रशासनाला सोयीचे झाले असते. परंतु, प्रशासनाच्या ढिम्म कारभारामुळे या प्रक्रियेला ब्रेक लागला आहे.जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी जिल्हास्तरावर सातत्याने पत्रव्यवहार व विनंत्या करूनही पुरवठा विभागाने याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा केला आहे. प्रशासनाच्या या मनमानी कारभारावर आता जिल्ह्यातील ग्राहक संतप्त झाले आहेत. " शिवकुमार स्वामी साहेब, आता तरी उघडा डोळे बघा नीट" असा थेट इशारा अनिल बोर्डे यांनी दिला आहे.या प्रलंबित प्रकरणात जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी स्वतः जातीने लक्ष घालून तात्काळ समितीची निर्मिती करावी आणि ग्राहकांच्या प्रश्नांना न्याय द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. आता या आक्रमक भूमिकेनंतर बीड जिल्हा प्रशासन नेमकं काय पाऊल उचलणार आणि याकडे कधी लक्ष देणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून राजकीय व सामाजिक वर्तुळात याची जोरदार चर्चा रंगली आहे.

# भावाच्या जमीनीवर ताबा सांगणाऱ्या बहिणींचा मनाई हूकूम अर्ज न्यायालयाकडून खारीज

## अॅड.गणेश एम. कोल्हे यांचा खंबीर युक्तीवाद ठरला निर्णायक

बीड : मानकुरवाडी येथील वादग्रस्त जमीन गट नं.274 मध्ये वडिलोपार्जित व भावंडाच्या जमीनीमध्ये विवाहित बहिणींनी ताबा वहिवाटीकरिता मागणी केलेला मनाई हुकूम अर्ज सह दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर बीड यांचे न्यायालयात खारीज करण्यात आला आहे. यावेळी प्रतिवादी भावंडांच्या वतीने न्यायालयात अॅड.गणेश एम कोल्हे यांनी भक्कम बाजू मांडली. याबाबत माहिती अशी की, मौजे मानकुरवाडी ता.वडवणी जि.बीड येथील गट नं.274 मध्ये वादी लताबाई उमाजी जगताप व वृंदावनी परमेश्वर भुसारे या दोन सख्ख्या बहिणींनी वडिल पांडूरंग देवराव जाधव व सख्खे तीन भाऊ नामे जगन्नाथ, ईश्वर, शरद पि.पांडूरंग जाधव सर्व राहणार मौजे मानकुरवाडी ता.वडवणी जि.बीड यांचे विरुध्द जमीनीमध्ये ताबा वहिवाटीकरिता मनाई हूकूम अर्ज दाखल केला व सदरचा अर्ज मा.न्यायालयात दि.6 एप्रिल 2026 रोजी गुणवत्तेवर निष्कर्ष नोंदवून खारीज केला.

# लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत दैदिप्यमान यश

## इयत्ता 5 वी व 8 वी शिष्यवृत्ती परीक्षेत तब्बल 38 विद्यार्थी पात्र

उदगीर (त भा वृत्तसेवा)

लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालय, उदगीर येथील विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवत माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेचा नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात विद्यालयातील इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत १८ विद्यार्थी तर इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत तब्बल २० विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले असून विद्यालयाच्या नावलौकिकात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशामुळे संपूर्ण विद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मधील गुणवंत विद्यार्थी :

१) वेदिका पुंडलिक मुळे – १९८ २) तेजश्री सुरज घाळे – १९२ ३) तन्मय विठ्ठल येलमटे – १७२ ४) परी तानाजी बंडे – १६४ ५) स्वरित सतीश विश्वनाथे – १६२ ६) दर्शन नामदेव वाडकर – १६० ७) श्रुती मारुती भिसाडे – १५८ ८) गणेश उमेश पाटील – १५४ ९) कल्याणी गुरुदत्त महामुनी – १५२ १०) वैभव गणेश बिरादार – १५२ ११) ईश्वरी दिगंबर मुढाळे – १५० १२) भगवती दिनेश देवनाळे – १४८ १३) आस्था अमोल येणकीकर – १४२ १४) आर्यन सतीश राठोड – १४२ १५) शिवम प्रल्हाद मोरे – १४२ १६) आरव अमितकुमार असरे – १४० १७) निशांत कृष्णा सोमवाड – १२४ १८) गजानन दत्तात्रय नंदगावे – १२०

इयत्ता ८ वी माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी :

१) श्रेयश विनोदकुमार खरात – २३६ २) साधना बालाजी बजगीरे – २२४ ३) श्रुती संजय मदने – १९८ ४) सुनील प्रेमराज हंचनाळे – १९८ ५) हर्षविना अमर जाधव – १९८ ६) विक्रमादित्य अशोक शिंदे – १७८ ७) प्रथमेश जे. जेराव हिवराळे – १७६ ८) सिद्धांत प्रदीप पवार – १७२ ९) नागेश लिंगराम वंगाटे – १६८ १०) समीक्षा सतीश लाडवते – १६८ ११) आदित्य राजेंद्र ढवेळे – १६६ १२) आदित्य सोमनाथ ममदापूरे – १६६ १३) श्रावणी सुनील जाधव – १६६ १४) आरती रणजित जावरे – १६४ १५) कपिल साहेबराव बिरादार – १५८ १६) आयुष पांडुरंग पेठे – १५६ १७) तेजस्विनी शिवकुमार बोरगावकर – १५० १८) अंजली किशोर जाधव – १४४ १९) ओमकार तानाजी हेळगे – १४० २०) शरयू दशरथ बिरादार – १३८

विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष डॉ.सुरेंद्रजी आलूरकर,उपाध्यक्षा सौ. ज्योतीताई ठाकूर,कार्यवाह डॉ. हेमंतजी वैद्य, सहकार्यवाह अमरनाथ खुर्पे ,मुख्य प्रशासकीय अधिकारी प्राचार्य चंद्रकांतजी मुळे, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा स्थानिक कार्यवाह शंकरराव लासूणे, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष सतनप्पा हुरदळे, मुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले, शिष्यवृत्ती विभाग प्रमुख रामेश्वर मलशेट्टे, सौ.विजया गोविंदवाड यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

विद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आदर्श परंपरा, शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश संपादन झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

### पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६ अंतर्गत भाजपा जालना निवासी प्रशिक्षण वर्गाचा उत्साहात समारोप

# कार्यकर्ताच भारतीय जनता पक्षाची खरी ताकद असून विचार, संघटन व सेवाभावातून राष्ट्रनिर्मिती शक्य आहे - आ.बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६ दि. १६ मे व १७ मे रोजी आयोजित भाजपा जालना महानगर व ग्रामीण जालना जिल्ह्याच्या निवासी प्रशिक्षण वर्गाचा समारोप मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. यावेळी समारोप प्रसंगी बोलताना आ. बबनराव लोणीकर यांनी भारतीय जनता पक्षाच्या विचार-सरणीचा व कार्यपद्धतीचा आढावा घेत कार्यकर्ताच पक्षाची खरी ताकद असल्याचे सांगितले. भारतीय जनता पक्ष हा सामान्य कार्यकर्त्यांच्या कष्ट, विचार, संघटनशक्ती आणि सेवाभावावर उभा असलेला पक्ष आहे. राष्ट्र प्रथम या भावनेतून कार्य करणारा प्रत्येक कार्यकर्ता देशाच्या राष्ट्रनिर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असे ते म्हणाले.

तसेच पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेले एकात्म मानववाद हे तत्त्वज्ञान आजही देशाला दिशा देणारे असून भाजपा कार्यकर्त्यांनी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून सेवा व विकासाची भावना जोपासावी, असे आवाहनही त्यांनी केले.



या दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण वर्गामध्ये विविध विषयांवर मान्यवरांनी सखोल मार्गदर्शन केले. यामध्ये पक्षाचा इतिहास व विकास माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, कार्यकर्ता विकास, सांभाळ व दायित्व बोध श्री. सुनील राणे, देशापुढील आव्हाने आणि निदानाचा आमचा प्रयत्न डॉ. भागवत कराड, बूथ व्यवस्थापन, मन की बात, आयटी व तांत्रिक कार्यक्रम श्री. संजय केनेकर, पक्षाची कार्यपद्धती श्री. किशोर शितोळे, विचार परिवार श्री. विलास दहिभाते, वैचारिक अधिष्ठान श्री. सुरेश केसापूरकर, प्रत्यक्ष कार्यानुभव सत्र आ. नारायण कुचे, मोदी सरकारचे गरीब कल्याणाचे उपक्रम कैलाश गोरंट्याल, कार्य विस्तार डॉ. अजित गोपछडे तसेच सोशल मीडिया, नवीन तंत्रज्ञान (-ख), नमो प व सरल प तेजस मालविया यांनी मार्गदर्शन केले. या सर्व सत्रांमधून कार्यकर्त्यांना पक्ष विचारधारा, संघटनात्मक कौशल्य, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, जनसंपर्क आणि प्रभावी कार्यपद्धती यांचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले. या समारोप प्रसंगी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, खा.डॉ.अजित गोपछडे,ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे,आ.संतोष पाटील दानवे, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत व सर्व नगरसेवक, जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भाजपा जालना महानगर व ग्रामीण जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते व संयोजकांनी परिश्रम घेतले. प्रशिक्षण वर्गामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी काळात पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## संक्षिप्त

### महाराष्ट्रात मतदार याद्यांची 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहिम; ९.८६ कोटी मतदारांच्या घरी पोहोचणार निवडणूक यंत्रणा

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'विशेष सखोल पुनरिक्षण' (डखठ) मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला आहे. या मोहिमेत महाराष्ट्राचा समावेश असून, राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे.

बीएलओच्या प्रत्यक्ष घरांना भेटी

महाराष्ट्रात विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम अत्यंत व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहे. यात राज्यातील एकूण ९,८६,४४,४१३ मतदारांच्या तपशिलाची खातरजमा मतदान केंद्रस्तरीय अधिका-यांमार्फत (इङज)नियुक्त करण्यात येणार आहे. हे अधिकारी प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन माहिती गोळा करतील. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमण्यात आलेले 'बूथ लेव्हल एजंट्स' (इङ-) त्यांना सहकार्य करणार आहेत.

सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामात व्यस्त असलेल्या क्षेत्रीय यंत्रणेचा विचार करून या तिसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबरमध्ये पूर्ण होईल. दिनांक २० ते २९ जून २०२६ या कालावधील बीएलओ यांना प्रशिक्षण आणि पूर्वतयारी करण्यात येईल. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी जाऊन भेटी देण्यात येतील. ५ ऑगस्ट २०२६ रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल तसेच ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती नोंदविता येतील आणि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादीची प्रसिद्ध करण्यात येईल. भारत निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले एजंट (इङ-) नियुक्त करण्याचे आवाहन केले आहे. यामुळे मतदार यादीतून दुबार नावे तसेच मृत व्यक्तींची नावे काढणे आणि नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि अचूक होण्यास मदत होणार आहे.



**जालना शहर महानगरपालिके तर्फे जुना जालना भागातील भाजी मंडी येथे अतिक्रमण हटवण्यात आला आहे.**
**(छायाचित्र मजहर सौदागर)**

### औषध विक्रेत्यांच्या संपाबाबत नागरिकांना आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेच्या वतीने दि. २० मे, २०२६ रोजी देशव्यापी संप पुकारण्यात आल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाला दिली आहे. या संपामध्ये संघटनेचे सभासदांनी सहभागी होवू नये याबाबत त्यांना पत्राद्वारे विनंती करण्यात आली आहे. तथापि, नियमित औषधांची आवश्यकता असलेल्या रुग्णांनी व त्यांच्या नातेवाईकांनी संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक औषधांचा आगाऊ साठा करून ठेवावा. संपाच्या कालावधीत गरजू रुग्णांना औषधे उपलब्ध न झाल्यास किंवा अत्यावश्यक औषधांची गरज भासल्यास नागरिकांनी अन्न व औषध प्रशासन कार्यालयातील सहाय्यक आयुक्त (औषधे) श्री. जी.

## गतिरोधक ठरला जीवघेणा; अपघातानंतर प्रशासन जागे, धोकादायक गतिरोधक अखेर हटवले

### रिफ्लेक्टर व पांढरे पट्टे नसल्याने महिलेचा मृत्यू; सार्वजनिक बांधकाम विभागाविरोधात संताप

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद । प्रतिनिधी**



जाफराबाद-भोकरदन मार्गावरील नर्मदा पॅलेसजवळील धोकादायक गतिरोधकामुळे एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर अखेर संबंधित गतिरोधक हटविण्यात आले आहेत. अंधारात गतिरोधक न दिसल्याने झालेल्या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या लक्ष्मी एकनाथ कांबळे (वय ४०, रा. ब्रम्हपुरी ता. जाफराबाद, जि. जालना) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून सार्वजनिक बांधकाम विभागाविरोधात संतापाची लाट उसळली आहे.

ही दुर्घटना रविवारी (दि. १७ मे) रात्री सुमारे ९ वाजेच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, दुचाकी चालकाला रस्त्यावरील गतिरोधक अंधारामुळे दिसून आले नाही. त्यामुळे दुचाकी जोरात उडाल्याने मागे बसलेल्या लक्ष्मी कांबळे या रस्त्यावर फेकल्या गेल्या. अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या होत्या. स्थानिक नागरिकांनी तातडीने मदत करत त्यांना रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. दरम्यान, संबंधित गतिरोधकावर रिफ्लेक्टर, पांढरे पट्टे तसेच कोणतेही इशारा फलक नसल्यानेच हा अपघात घडल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या ठिकाणी यापूर्वीही अनेक लहान-मोठे अपघात झाले होते. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष करण्यात आल्याने अखेर एका महिलेचा जीव गेल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. घटनेनंतर संतप्त नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. रस्ते सुरक्षेच्या मूलभूत उपाययोजनांकडे झालेल्या दुर्लक्षामुळे एका निष्पाप महिलेचा जीव गेला. याला जबाबदार संबंधित यंत्रणाच आहे, असा संतप्त सूर परिसरातून उमटत आहे. जाफराबाद-भोकरदन मार्गावर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. विशेषतः रात्रीच्या वेळी गतिरोधक स्पष्ट दिसत नसल्याने दुचाकीस्वारांसमोर मोठा धोका निर्माण होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी सर्व गतिरोधकांवर तात्काळ रिफ्लेक्टर, पांढरे पट्टे आणि इशारा फलक बसवावेत, अशी मागणी जोर धरत आहे.

#### मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा

» गतिरोधक टाकण्यात आले त्याच दिवशी मी संबंधित उपअभियंता सूर्यवंशी यांना फोनद्वारे सूचना दिली होती की, हे गतिरोधक चुकीच्या पद्धतीने टाकण्यात आले असून भविष्यात जीवितहानी होऊ शकते. मात्र प्रशासनाने दुर्लक्ष केले आणि अखेर कांबळे बाई यांचा जीव गेला. आता घटना घडल्यानंतर गतिरोधक काढण्यात आले, पण गेलेला जीव परत येणार नाही. शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन सोमोटोद्वारे मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पर्यावरण विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश गवळी यांनी केली.



### दैठणा खुर्द येथे उपसरपंचपदी भारत सवणे यांची बिनविरोध निवड

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील दैठणा खुर्द येथील ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाच्या रिक्त जागेवर सदस्य भारत सवणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित विशेष बैठकीत या निवडीवर शिक्कामोर्तब करण्यात आले.

उपसरपंच निवडीसाठी ग्रामपंचायत सदस्यांची एक विशेष बैठक ग्रामपंचायत कार्यालयात बोलवण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी सरपंच सुनील तायडे हे होते, तर निवडणूक निरीक्षक म्हणून मंडळ अधिकारी भोंगाने यांनी काम पाहिले. निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी तलाठी गारवे आणि ग्रामसेवक रामेश्वर मेहेत्रे, पोलीस कर्मचारी विलास जाधव, पोलीस पाटील ज्ञानेश्वर बोंबले यांनी सहकार्य केले. या निवडणूक प्रक्रियेत उपसरपंचपदासाठी भारत सवणे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित केले. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य दीपक सवणे, उत्तमराव सवणे, नारायण चव्हाण, शबाना शेख, मीरा घोडे, उषा शिंदे यांच्यासह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. निवडीनंतर नवनियुक्त उपसरपंच भारत सवणे यांचा ग्रामस्थांच्या वतीने शाल व पुष्पहार घालून जंगी सत्कार करण्यात आला. त्यांच्या या निवडीबद्दल तालुक्यातून व राजकीय वर्तुळातून कौतुक होत आहे.

## जिल्हाधिकारी यांनी घेतला महसूल विभागाच्या कामकाजाचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील महसूल विभागाच्या कामकाजाला गती देण्यासाठी तसेच विविध प्रलंबित प्रकरणांचा वेळेत निपटारा करण्याच्या दृष्टीने आज तहसील कार्यालय, बदनापूर येथे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. बैठकीत महसूल, निवडणूक, गृहनिर्माण व ग्रामविकासाशी संबंधित विविध योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी बदनापूर तालुक्यात सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला. जनगणना काम अचूक व वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. तसेच 'सर्वांसाठी घरे' या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना घरे उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेबाबतही चर्चा करण्यात आली. बैठकीत विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (डखठ) अंतर्गत निवडणूक विषयक कामकाजाचा आढावा घेण्यात आला. मतदार यादी अद्ययावत करणे, पात्र मतदारांची नोंदणी व त्रुटी दूर करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना दक्ष राहण्याचे निर्देश देण्यात आले. शासकीय जमिनींवरील अतिक्रमण हटविणे आणि सिलींग जमिनींसंदर्भातील प्रकरणांचाही सविस्तर आढावा घेण्यात आला. शासकीय जमिनी अतिक्रमणमुक्त करण्यासाठी प्रभावी कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. तसेच प्रलंबित सिलींग प्रकरणांचा



तातडीने निपटारा करण्यावर भर देण्याचे निर्देश दिले. मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांची प्रगतीही बैठकीत तपासण्यात आली. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सुलभ दळणवळणासाठी पाणंद रस्त्यांची कामे गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. बैठकीदरम्यान विविध विभागांच्या प्रलंबित कामकाजाचा आढावा घेत जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. प्रशासनातील समन्वय वाढवून नागरिकांच्या समस्या तत्परतेने सोडविण्याचे आवाहनही त्यांनी केले. यावेळी बैठकीस तहसीलदार, नायब तहसीलदार, गट विकास अधिकारी, मुख्याधिकारी, गट शिक्षण अधिकारी, सर्व मंडळ अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## पाटोदा-विडोळी, उस्वद-बन रस्त्यांच्या निकृष्ट दुरुस्तीची चौकशी करा -प्रकाश सोळंकेंची तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील पाटोदा-विडोळी व उस्वद-बन रस्त्यांच्या दुरुस्ती कामात निकृष्टपणा, थातूरमातूर काम व पूर्ण बिल उचलण्याचा डाव असल्याचा आरोप करत मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी मा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर व मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, जालना यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवून तक्रार केली आहे.

या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले असून रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या मार्गांवरून नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, रुग्णवाहिका व वाहनधारकांची दररोज ये-जा असते. खराब रस्त्यांमुळे अपघाताचा धोका वाढला असून नागरिकांत नाराजी आहे. शासनाकडून लाखो रुपयांचे इस्टिमेट मंजूर असताना संबंधित एजन्सीकडून काम इस्टिमेटप्रमाणे न करता घाईगडबडीत व निकृष्ट पद्धतीने केले जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. काही ठिकाणी खड्डे वरवर बुजवले जात असून काही ठिकाणी कामच झालेले दिसत नाही. उपअभियंता, मंठा, कनिष्ठ अभियंता व संबंधित एजन्सी यांनी संगनमत करून काम पूर्ण झाल्याचे चित्र निर्माण करून पूर्ण बिल उचलण्याचा डाव असल्याचा संशय व्यक्त



करण्यात आला आहे. या कामाबाबत सामाजिक कार्यकर्ते वसंतराव राऊत, उस्वद यांनीदेखील तक्रार केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी श्री. निवाळे यांनी इस्टिमेटप्रमाणे काम झाले नाही तर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असे सांगितल्याचा उल्लेख निवेदनात आहे. या प्रकरणी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून इस्टिमेट, तांत्रिक मंजुरी, प्रशासकीय मंजुरी, टेंडर प्रक्रिया, कामाचा आदेश व मोजमाप पुस्तिका यांची चौकशी करावी. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित एजन्सीचे बिल अदा करू नये, दोषी अधिकारी-कर्मचारी व एजन्सीवर विभागीय तसेच आवश्यक असल्यास फौजदारी कारवाई करावी आणि निकृष्ट किंवा अपूर्ण काम पुन्हा दर्जेदार पद्धतीने करून घ्यावे, अशी मागणी प्रकाश सोळंके यांनी केली आहे.

## बोले तैसा चाले...!

# ७० वर्षानंतर माहुली संगम येथील छत्रपती ताराराणी व थोरले शाहू महाराजांच्या समाधीस्थळाच्या जिर्णोद्धाराचा मार्ग मोकळा

### १३३ कोटींच्या भव्य स्मारकास मंजुरी; डॉ.संजय लाखे पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या इतिहासातील पराक्रम, स्वाभिमान आणि हिंदवी स्वराज्याची तेजस्वी परंपरा जपणाऱ्या रणरागिणी मोगलमर्दिनी छत्रपती ताराराणी आणि छत्रपती शंभूराजे पुत्र थोरले शाहू महाराज यांच्या सातारा जिल्ह्यातील माहुली संगम येथील समाधीस्थळाच्या जिर्णोद्धाराचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. तब्बल ७० वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या या पवित्र स्थळाच्या विकासासाठी १३३ कोटी रुपयांच्या भव्य स्मारकास मंजुरी देण्यात आल्याची माहिती शिवसेना सचिव तथा सहमुख्य संपर्क प्रमुख (मराठवाडा) डॉ. संजय लाखेपाटील यांनी दिली.



मागील महिन्यात ३ एप्रिल रोजी शिवसेना सचिव डॉ. संजय लाखेपाटील, मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे, शिवसेना सातारा जिल्हा संपर्क प्रमुख तथा नवी मुंबईचे नगरसेवक अंकुश बाबा कदम, रघुनाथ चित्रे, प्राचार्य मोरे सर, करण गायकर, राहुल गावडे आणि शरद देशमुख यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ संभाजी शिंदे यांची भेट घेतली होती. यावेळी त्यांनी माहुली संगम येथील समाधीस्थळाची दुरवस्था छायाचित्रे व व्हिडिओच्या माध्यमातून दाखवून दिली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्नुषा आणि मोगल बादशहा औरंगजेबाला दक्षिणेत रोखून धरणाऱ्या रणरागिणी ताराराणी तसेच दिल्लीच्या तख्तावर भगवा फडकवणारे थोरले शाहू महाराज यांच्या कार्याला साजेसे प्रेरणादायी स्मारक उभारण्याची मागणी करण्यात आली होती.

या मागणीची गंभीर दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शंभूराजे देसाई यांना स्मारकाचा आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आज मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत या भव्य स्मारकासाठी १३३ कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी देण्यात आली. या निर्णयाबद्दल डॉ. संजय लाखेपाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, पर्यटन मंत्री तथा सातारा पालकमंत्री शंभूराजे देसाई, शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि जयकुमार गोरे यांचे आभार मानले. हे स्मारक केवळ दगड-मातीचे बांधकाम नसून, मराठ्यांच्या पराक्रमाचा, स्वराज्याच्या संघर्षाचा आणि हिंदवी साम्राज्याच्या तेजस्वी इतिहासाचा प्रेरणादायी वारसा जतन करणारे केंद्र ठरेल, अशी भावना डॉ. लाखेपाटील यांनी व्यक्त केली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# खतांसाठी शेतकरी रांगेत; नायगावात युरिया-डीएपीचा काळाबाजार तेजीत

गोविंद नरसीकर
**नरसी, दि. १९ मे -**

खरीप हंगाम तोंडावर येताच नायगाव तालुक्यात युरिया व डीएपी खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत असून, काही खत विक्रेत्यांकडून शासन दरापेक्षा जादा दराने खत विक्री केली जात असल्याच्या तक्रारींनी जोर धरला आहे. शेतकऱ्यांना आवश्यक असलेले युरिया व डीएपी खत सहज उपलब्ध होत नसल्याने अनेक गावांतील शेतकऱ्यांना पहाटेपासून खत दुकानांसमोर रांगा लावाव्या लागत आहेत.




तालुक्यातील अनेक खत विक्रेत्यांकडून खत उपलब्ध नाही असे सांगितले जात असले तरी मागच्या दाराने जादा दराने विक्री होत असल्याचा आरोप शेतकरी वर्गातून केला जात आहे. काही ठिकाणी खत खरेदीसाठी शेतकऱ्यांना अनावश्यक औषधे, सूक्ष्म अन्नद्रव्ये किंवा इतर कृषी साहित्य घेण्याची सक्ती केली जात असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक पैसे आकारून उघडपणे काळाबाजार सुरू असल्याची चर्चा ग्रामीण भागात सुरू आहे.

विशेष म्हणजे, कृषी विभागाकडून वेळोवेळी तपासण्या व कारवाईचे दावे केले जात असले तरी प्रत्यक्ष परिस्थितीत कोणताही बदल दिसून येत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. कारवाईचा केवळ दिखावा केला जातो, मात्र दोषी विक्रेत्यांवर ठोस कारवाई होत नाही, असा आरोप शेतकरी संघटनांकडून करण्यात येत आहे.

तालुक्यातील अनेक गावांमधून खत टंचाई व काळाबाजाराबाबत तक्रारी वाढत असताना संबंधित कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून अचानक छापेमारी मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे. संशयित खत विक्रेत्यांकडे विभागाने एखादा 'डमी ग्राहक' अथवा फंटर पाठवून प्रत्यक्ष व्यवहाराची शहानिशा करावी आणि शासन नियमांचे उल्लंघन करत जादा दराने खत विक्री करणाऱ्या दुकानदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

याशिवाय दोषी आढळणाऱ्या विक्रेत्यांचे परवाने तात्काळ निलंबित अथवा रद्द करावेत, तसेच अशा विक्रेत्यांची नावे जाहीर करून इतरांनाही धडा शिकवावा, अशी मागणी होत आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना वेळेत व योग्य दरात खत उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असून, कृषी विभागाने निष्क्रियता झटकून तातडीने कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, जादा दराने खत विक्री झाल्यास शेतकऱ्यांनी पक्की पावती घ्यावी, संबंधित दुकानाचे नाव, बिल व व्यवहाराची माहिती कृषी विभागाकडे लेखी स्वरूपात द्यावी, असे आवाहनही करण्यात येत आहे.

# जंगलसमृद्ध किनवटमध्ये वाढते तापमान; शहरात व्यापक वृक्षारोपण करण्याची मागणी

तभा वृतसेवा
**किनवट, दि. १९ मे -**

नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक जंगल क्षेत्र असलेल्या किनवट तालुक्यात यावर्षी तापमानाने विक्रमी वाढ नोंदवली असून शहराचे तापमान ४४ अंश सेल्सिअसपेक्षाही अधिक गेल्याने नागरिकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. वाढत्या उकाड्यामुळे सर्वसामान्यांचे जनजीवन विस्कळीत होत असून ग्रामीण व शहरी भागातील अनेक विंधन विहिरी, बोअरवेल आणि पाण्याचे स्रोत कोरडे पडण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र दिसून येत आहे.

याच पार्श्वभूमीवर आगामी पावसाळ्यात जुन मधे किनवट शहरात व्यापक वृक्षारोपण मोहीम राबविण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. विशेषतः तहसील चौक ते शिवाजी चौक, हनुमान मंदिर, राम मंदिर, विठ्ठल मंदिर या प्रमुख मिरवणूक मार्गांवर तसेच



अण्णाभाऊ साठे चौक, सरस्वती कॉलनी परिसरातील व्हीआयपी रोड, विविध मुख्य रस्ते आणि गल्लीबोळांत तसेच शहराचया बाजुने वाहणारया नदी आणी नाल्यांच्या किनाऱ्यावर मियावाकी पद्धतीने झाडे मोठ्या प्रमाणात लावण्यात यावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शहरातील कमी होत चाललेली हरितक्षेत्रे, वाढते काँक्रीटीकरण आणि दुर्लक्षित वृक्षलागवड यामुळे तापमानात सातत्याने वाढ होत आहे. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर देसी प्रकारातील सावलीची, पर्यावरणपूरक आणि शोभेची झाडे लावल्यास शहराचे वातावरण निसर्गमय होण्यास मदत होणार असून भविष्यात तापमान नियंत्रणासाठीही त्याचा फायदा होईल.

मात्र गेल्या अनेक वर्षांपासून या प्रश्नाकडे नगर परिषद प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे नगर परिषदेकडून मालमत्ता करासोबत वृक्ष कर दरवर्षी वसूल केला जातो. परंतु त्या निधीचा वापर प्रत्यक्ष वृक्ष लागवडीसाठी न करता इतर कामांवर केला जात असल्याचा संताप जनतेतून व्यक्त होत आहे. नागरिकांनी नगर परिषद प्रशासनाला पावसाळ्यापूर्वी विशेष नियोजन करून शहरातील उपलब्ध जागांवर वृक्ष लागवड, झाडांचे संरक्षण, लोखंडी गार्ड, पाणी व्यवस्था व नियमित देखभाल यासाठी ठोस कृती आराखडा जाहीर करण्याची मागणी केली आहे. जमा होणारा वृक्ष कर व इतर उपलब्ध निधीचा वापर करून किनवट शहर हिरवेगार, स्वच्छ व पर्यावरणपूरक करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी आता जोर धरत आहे.

## भोकरमध्ये महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

**नांदेड** -जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती भोकरमध्ये विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील श्री महादेव मंदिर येथून जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक वस्ताद लहुजी साळवे चौक , बस स्टँड रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक , डॉ . आंबेडकर चौक, गांधी चौक मार्गे महादेव मंदिर येथे



मिरवणूकीची सांगता करण्यात आली. जयंती उत्सवात बेलदरा, सावरगांव माळ, सोनारी, दापशेड, जुन्नी ,जारीकोट येथील भजनी मंडळाचा सहभाग होता. रात्री ९ वाजता शिवाचार्य महाराजांच्या प्रवचनाच्या प्रारंभी महाराज व मान्यवरांच्या हस्ते जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले . बालयोगी व्यंकटस्वामी महाराज, दिगंबर शिवाचार्य गुरुमाऊली महाराज, महादेव शिवाचार्य महाराज, वेदाचार्य बस्वराज महाराज चिंचोलीकर यांनी महात्मा बसवेश्वर यांनी समतेची शिकवण देवून बाराव्या शतकात अठरा पगड बहुजन समाजाला एकत्र करून समाजातील रूढी , परंपरा ,अंधश्रध्देविरुद्ध आवाज उठवून समता निर्माण केली .त्यांचे विचार आचरणात आणण्याचे आव्हान त्यांनी केले. यावेळी अमरनाथ महाराज, अशोक महाराज , नगरसेविका वनश्री लक्षटवार,डॉ .व्यंकटराव माने, प्रकाश कोंडलवार,यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलतांना नगराध्यक्ष भगवानराव दंडवे म्हणाले महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचा प्रचार ,प्रसार करणे समाजाच्या विकासात्मक दृष्टीकोनातुन गरजेचे असून सर्व समाजातील लोकांचे सहकार्य , माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांची प्रेरणा, मार्गदर्शन व बालयोगी व्यंकटस्वामी महाराज यांच्या आशिर्वादामुळेचं आपण नगराध्यक्ष झाल्याचे त्यांनी सांगितले. भोकर शहरात महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा उभारण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याची ग्वाही त्यांनी दिली .प्रास्ताविक जयंती मंडळाचे अध्यक्ष सतिश देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मनोज गिमेकर यांनी तर आभार बालाजी येलपे यांनी मानले. जयंती उत्सवासाठी उज्वल केसराळे, ड. विशाल दंडवे, शिवराज स्वामी, मन्मथ शेट्टे , माधव श्रीखंडे, शंकराव देवठाणकर, त्र्यंबक पटवेकर, शंकर मिसाळे,सुरेश ठोणे, काशिनाथ देशमुख, एम. के. बिरादार, बालाजी ठोणे, आदींनी परिश्रम घेतले.

# तांडा वस्ती सुधार योजनेतील कामात अनियमिततेचा आरोप

तभा वृतसेवा
**हिमायतनगर, दि. १९ मे -**

तालुक्यातील बळीराम तांडा व पोटा तांडा येथे सुरू असलेल्या तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत रस्ते व नाली बांधकामात मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, संबंधित कामांची गुणवत्तापूर्ण चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याबाबत ग्रामस्थांनी पंचायत समिती, हिमायतनगरचे गटविकास अधिकारी यांना लेखी दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत पोटा तांडा येथे सि.सी. रस्ता व नाली बांधकामासाठी ७ लाख रुपये, तर बळीराम तांडा येथे पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी ७ लाख रुपये, असा एकूण १४ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

मात्र, संबंधित कामांमध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याचा आरोप ही करण्यात आला आहे. पोटा तांड्यातील सि.सी. रस्ता बांधकामात नाल्याची माती मिसळून काम सुरू असल्याचे, तसेच वाळू, खडी, गजाळी न वापरताच काम उरकीले जात असून त्या कामास लागणारे इतर साहित्याचे प्रमाण कमी असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. शासनाच्या अंदाजपत्रकाकडे दुर्लक्ष करून निधीचा अपव्यय होत असल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे.

तसेच, संबंधित विभागाच्या ज्युनिअर इंजिनिअर (जे.ई.) यांनी कामांची पाहणी न केल्यामुळे ठेकेदार व ग्रामपंचायत प्रशासनाच्या संगनमतातून निकृष्ट दर्जाचे काम सुरू असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

या प्रकरणाची गुणनियंत्रक यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करून निकृष्ट दर्जाचे काम तात्काळ थांबवावे व संबंधित कामाचे देयके रोखावीत, अशी मागणी माजी सभापती बापूराव आडे,तंटामूक्त गाव समितीचे अध्यक्ष धर्मा थावरा राठोड, श्यामराव बाबुराव जाधव, मधूकर पांडू राठोड,भारत धावजी राठोड, टिकाराम धुप्पा राठोड, शेषेराव पवार आदिंसह ग्रामस्थांनी केली असून या चौकशी कामात हयगय अथवा टाळाटाळ झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

## औषध विक्रेता बंदच्या पार्श्वभूमीवर नांदेडमध्ये नियंत्रण कक्ष स्थापन

तभा वृतसेवा
**नांदेड, दि. १९ मे -**

ऑल इंडिया ऑर्गनायजेशन ऑफ केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट यांच्या वतीने २० मे २०२६ रोजी एक दिवसाचा बंद पुकारण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी औषध व अन्न प्रशासनाच्या सहाय्यक आयुक्त कार्यालयाने जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे.

नियंत्रण कक्षासाठी सहाय्यक आयुक्त (औषधे) अ.तु. राठोड (मो. ८३६९०२७०६८), अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती शि.व. श्रीरामे (मो. ८०८०१०८८१८) तसेच लिपिक टंकलेखक अ.रा. पाटील (मो. ८४४६३१८९८३) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

बंदच्या कालावधीत गरजू रुग्णांना औषधे उपलब्ध न झाल्यास अथवा अत्यावश्यक औषधांची गरज भासल्यास नागरिकांनी वरील क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. तसेच संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी नागरिकांनी आवश्यक औषधे आगाऊ खरेदी करून ठेवावीत, असेही अन्न व औषध प्रशासनाने कळविले आहे.



**नांदेड शहरालगतच्या लिंबगाव रस्त्याच्या कडेला दरवर्षीप्रमाणे यंदाही गुलमोहराने आपला लालभडक साज चढवला आहे. - छायाचित्रकार : विजय होकर्णे**

## अतिक्रमण करून अवैध प्लॉटींग करणाऱ्यांवर कारवाई करा अन्यथा कार्यालयासमोर अमरण उपोषणाचा दिला इशारा

तभा वृतसेवा
**मुदखेड, दि. १९ मे -**

मुदखेड शहरातील प्रभाग क्र.२ मुख्यनाल्यावरील आणि बाजुच्या ३० फुटच्या रोडवरील मियाँ चौकीदार यांच्या घरापासून ते सरदार वल्लभाई पटेल शाळेपर्यंत अतिक्रमण व कब्जा करुन अवैध प्लॉटींग करणाऱ्यांवर चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी म्हणुन अनेकदा निवेदने दिले. तरी सुद्धा संबंधीत अधिकारी यांनी आज पर्यंत आपल्या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नसल्यामुळे. निवेदनकर्त्यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

प्रभाग क्र.२ गट नं.७ मधील बागमार गल्ली येथील नविन प्लॉटींगला गुलाबखान चाँदखान यांच्या घरापासून ते मोठ्या नाल्याच्या बाजुच्या ३० फुटाच्या रोडपर्यंत लेआऊट प्रमाणे १८ फुटाचा सी. सी. नाली व सी.सी. रोड करीता जागा उपलब्ध करुन देण्यात यावे. निवेदनकर्ते यांच्या मागण्या पूर्ण नाही झाल्यास दि.२५ मे रोजी पासून नगर परिषद कार्यालयासमोर अमरण उपोषणास बसणार आहोत असे निवेदनात नमुद केले आहे. संबंधीत अधिकारी यांनी दि.२४ मे च्या अगोदर निवेदानावरील मागण्या मान्य करुन योग्यती कार्यवाही करावी. अन्यथा दि.२५ मे रोजी सकाळी ११:०० वाजता नगर परिषद मुदखेड येथे अमरण उपोषण करण्यात येईल असे निवेदकर्ते मो. बुरहान अ. माजीद, मो. रहेमान अली चाऊस, शेख रफिक, पत्रकार आवेश कुरेशी, यांनी इशारा दिला आहे.

## वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्याच्या सोलार पॅनलचे नुकसान

**हिमायतनगर** -तालुक्यातील पळसपूर येथील शेतकरी मारोतराव वानखेडे यांच्या शेतातील सोलार पॅनल वादळी वाऱ्यामुळे नुकसानग्रस्त झाल्याची घटना घडली आहे. पळसपूर शिवारातील त्यांच्या शेत सर्वे नं. २४१ मध्ये विहिरीवर जी. के. कंपनीचे सोलार पॅनल बसविण्यात आले होते. मात्र २ मे २०२६ रोजी झालेल्या जोरदार पावसासह वादळी वाऱ्यामुळे सोलार पॅनलच्या प्लेट फुटल्या.

## पिक विमा न भेटलेल्या शेतकऱ्यांसाठी जवळगावकर कृषिमंत्र्यांच्या भेटीला

तभा वृतसेवा
**हदगाव, दि. १९ मे -**

हदगाव - हिमायतनगर तालुक्यातील अनेक मंडळातील शेतकरी बांधवांच्या खात्यात जे की, पात्र आहेत अद्यापही पीक विमा ची रक्कम जमा झाल्या नसल्याची धक्कादायक घटना घडली असून याची माहिती मिळताच हदगाव विधानसभेचे लोकनेते माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर यांनी विलंब न लावता मुंबई गाठत राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे यांच्याकडे सदरील पिक विमा रकमेचा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यात यावा अशी ठाम मागणी केली.



हदगाव सह हिमायतनगर तालुक्यातील मंडळ अंतर्गत पिक विमा काही शेतकऱ्यांना भेटला पण अद्यापही पिक विमा न भेटलेल्या शेतकरी बांधवांची संख्या मोठी असल्याकारणाने व पुढे खरीप हंगामासाठी लागणाऱ्या बी बियाणे व खतांसाठी शेतकरी बांधवांना हातभार लागावा व त्यांचा हक्काचा पिक विमा त्वरित भेटावे याकरिता हदगाव विधानसभेचे लोकनेते माजी आ. जवळगावकर यांनी कृषिमंत्री यांच्याकडे केली ज्यात पीक विमा वितरणातील अडचणी शेतकरी बांधवांना होत असलेला आर्थिक मनस्ताप यासह तीव्र नाराजी पसरली असून त्वरित पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ विमा रक्कम जमा करण्याबाबत ठाम मागणी यावेळेस करण्यात आली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी नेहमीच आक्रमक आणि तत्पर भूमिका घेणारे लोकनेते माजी आ. जळगावकर यांनी शासनाने या विषयात तातडीने लक्ष घालून न्याय द्यावा अशी मागणी केली.

## आर्थिक तडजोड न झाल्याने गुन्हे दाखल करण्याची पोलीस उपनिरीक्षकांनी धमकी दिल्याची तक्रार

तभा वृतसेवा
**उमरी, दि. १९ मे -**

उमरी पोलीस उपनिरीक्षक सचिन अरमाळ यांचा उमरी पोलीस ठाण्यात मनमानी कारभार चालू असून पोलिस उपनिरिक्षक या पदाचा गैरवापर करून आर्थिक तडजोड न झाल्यास गुन्हे दाखल करण्याची धमकी देत असल्याचा आरोप श्रीनिवास अनंतवार यांनी मुंबई पोलीस महासंचालक मुंबई , पोलीस उपमहानिरीक्षक परिक्षेत्र नांदेड व पोलीस अधीक्षक नांदेड यांच्याकडे लेखी स्वरूपात केला आहे .

निवेदनात श्रीनिवास आनंतवार म्हणाले की उमरी येथे लघुउद्योग म्हणून छोटी कंपनी टाकली आहे ते कंपनी रितसर कायद्याच्या चौकटीत राहूनच उद्योग सुरू केला आहे पण दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी मी व माझे कुटुंब घरी नसताना हैदराबाद येथील कांहीं अनोळखी माणसे व इतर गुंडे लोकांना घेऊन पोलीस उपनिरीक्षक सचिन अरमाळ यांच्याकडे जाऊन त्यांना काही चिरीमिरी देऊन माझ्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला आहे सदर कंपनी बोगस असल्याचा आरोप करण्यात आला कांहीतरी तडजोड करा अन्यथा गुन्हे दाखल करू असे म्हटले आहे. तसे माझ्याकडे ऑडिओ क्लिप असुन त्या मध्ये पोलिस उपनिरीक्षक यांनी फोन करून सदरिल व्यक्ती हैद्राबाद वरून आले आहेत जिल्हा पोलिस अधिक्षक कडे गेले होते तशी लेखी तक्रार आहे म्हटले आहे मी बाहेरगावी असल्याने कारणाचे तुम्ही व्हीडीओ कॉल रेकांडींग करा कंपनीचा सिल फोडा क्यॅप्टर प्रिंट तपासा असे बोललो आहे तुम्हाला कांही खोटे आढळून आल्यास माझ्यावर कायदेशिर कारवाई करा असे पण सांगीतले आहे पण ते परत परत फोन लावून कांही तरी करा अन्यथा गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली आहे .

पोलीस उपनिरीक्षक सचिन अरमाळ हे वादी व फिर्यादी यांच्याकडून आर्थिक वसुली करण्यात माहीर असुन त्यांच्या या गैरवर्तनामुळे वर्दहस्तमुळे उमरी शहरात खुलेआम जुगार - मटका अवैधदारू चालू आहे असल्याचे सतत ते हप्ते वसूल करण्यात मग्न असतात हप्ते वेळेवर भेटले नाही तर ते गुन्हे दाखल करतात असा अरोप ही अनंतवार यांनी केला आहे.

# शारदा कन्स्ट्रक्शनकडून बेकायदेशीर खोदकाम व बांधकाम

### अधीक्षक अभियंत्यांनी दिले चौकशीचे आदेश

तभा वृतसेवा
**नांदेड, दि. १९ मे -**

तरोडा नाका जंक्शन ते पासदगाव रस्त्याच्या दुतर्फा विनानिविदा बेकायदेशीररित्या खोदकाम व बांधकाम शारदा कन्स्ट्रक्शन कंपनीने केले असून या कंपनीचे काम तात्काळ थांबण्यात यावे अशी मागणी ॲड. प्रमोद नरवाडे यांनी एका निवेदनाद्वारे सार्वजनिक बांधकाम मंडळाच्या अधीक्षक अभियंत्याकडे केली होती. या निवेदनाची दखल घेत या कामाची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश अधीक्षक अभियंता यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना दिले आहेत.

तरोडा नाका जंक्शन ते पासदगाव रस्त्याच्या दुतर्फा विना निविदा बेकायदेशीर खोदकाम व बांधकाम करण्यात आले आहे. हे काम शारदा कन्स्ट्रक्शन कंपनीने बेकायदेशीरपणे केले असून सदरील नालीचे खोदकाम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेत आहे. त्यामुळे शारदा कन्स्ट्रक्शन कंपनीला दंड लावावा तसेच उत्तर विभागाचे उपकार्यकारी अभियंता संतोष नाईक आणि शाखा अभियंता विजयकुमार कांचले यांनी संबंधित एजन्सीला अर्थपूर्ण तडजोड करून विना निविदा काम करण्याची परवानगी दिली असून या सर्व प्रकरणाची चौकशी करून दोषीवर कारवाई करावी अशी मागणी ॲड. प्रमोद नरवाडे यांनी एका निवेदनाद्वारे अधीक्षक अभियंत्याकडे केली होती. या निवेदनाची दखल घेत सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधीक्षक अभियंता यांनी ॲड. प्रमोद नरवाडे यांच्या तक्रारी संबंधाने सखोल चौकशी करून केलेल्या कारवाईबाबत अहवाल सादर करावा असे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना दिले आहेत.

# बनायेंगे मंदिर या गुन्ह्यातून कारसेवक किशोरसिंह चौहाण यांच्यासह १२ जणांची निर्दोष मुक्तता

तभा वृतसेवा
**नांदेड, दि. १९ मे -**

मुखेड पोलीस प्रशासनाने एका विशिष्ट धर्माच्या राजकीय कार्यकर्त्याच्या दबावापोटी भारतीय जनता पार्टीचे एकनिष्ठ कार्यकर्ते तथा कट्टर हिंदुत्ववादी रामभक्त किशोरसिंह चौहाण यांच्यासह अन्य १२ जणांवर दि. १६ ऑक्टोबर २०१६ रोजी नवरात्र उत्सव साजरे करताना दुर्गादेवी मिरवणुकीत विशिष्ट धर्माच्या राजकीय कार्यकर्त्याच्या घरा समोर केंद्र शासनाने बंदी घातलेल्या बनायेंगे मंदिर या गाण्यावर नृत्य केले व शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले होते. या गुन्ह्यातुन त्यांच्यासह अन्य जणांची निर्दोष मुक्तता झाली आहे.

दिनांक १६ ऑक्टोबर २०१६ रोजी नवरात्र महोत्सव च्या काळात अष्टभुजा दुर्गा देवी मिरवणूक करण्यात आली होती जात असताना तेलीपेठ हनुमान मंदिर चौकात देशभक्तीपर गीतावर मंडळाचे कार्यकर्ते नृत्य करत होते. याच परिसरात एका विशिष्ट धर्माच्या कार्यकर्त्यांचा घर आहे विशेष म्हणजे चौक असल्यामुळे कार्यकर्ते बनायेंगे मंदिर व देशभक्ती गाणे वर ली नोंदवते करत असताना मुखेड पोलीस प्रशासनाचे कर्मचारी हस्तक्षेप करीत मिरवणूक पुढे नेण्याचा आग्रह केला. पण कार्यकर्त्यांनी गाणे पूर्ण झाल्यावरच आम्ही पुढे जाऊ असे पोलीस प्रशासना सांगितले बनायेंगे मंदिर या गाण्यावर बंदी असून आपण हे गाणे वाजू शकत नाही गाणे बंद करा अन्यथा कारवाई करू असा इशारा पोलीस प्रशासन दिला यावरून कार्यकर्त्यांनी समजायचे भूमिका घेत जाणे बंद करून मिरवणूक पुढे नेली व शांततेच्या मार्गात मिळवण्याची विसर्जन झाले. मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते आपापल्या घरी पण दुसऱ्या दिवशी कट्टर हिंदुत्ववादी विचाराचे कार्यकर्ते किशोरसिंह चौहाण यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी पप्पू उर्फ माधव मुसळे, अशोक मुसळे, श्याम लालपालवाले, गणेश कदम, संजय वाघमारे, संजय पांचाळ, श्रीनिवास वाडेकर, सचिन वाडेकर, राजू कदम आदीसह ४५ कार्यकर्त्यावर राजकीय दबावापोटी गुन्हे दाखल करण्यात आले होते विशेष बाब म्हणजे या मिरवणुकीत सहभागी नसलेल्या विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांचे नाव गोवण्यात आले होते. व गु. र. न. १४२/२०१६ पोलीस ठाणे मुखेड कलम १५३ कलम १८६, १८८, २९२ भादवी प्रमाणे आणी मुंबई पोलीस कायदा कलम ३६, १३४ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले. खोटे दाखल केल्याचे माहिती मिळताच हिंदुत्ववादी विचाराचे कार्यकर्त्यांनी पोलिस ठाण्यात जाऊन ठिय्या करताच ३२ कार्यकर्त्यांचे नाव चौकशी अंती मागे घेण्यात आले. विशेष बाब म्हणजे या गुन्ह्यात मयत व्यक्तीला गोवण्यात आले होते.

तब्बल १० वर्षानंतर साक्षी पुरावे तपासून मुखेड न्यायालयाचे कनिष्टस्तर न्यायाधीश किशोर मुंडे यांनी सर्व १२ रामभक्तांची निर्दोष मुक्तता केली आरोपी तर्फे ॲड. डी. जी. हाक्के यांनी काम पाहिले व ॲड. फारुक शेख , एच. आर. शेख यांनी सहकार्य केले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# डिझेलसाठी वाहनधारकांसह शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा

## आवश्यक तेवढेच डिझेल घ्यावे- जिल्हा पुरवठा विभागाचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मे**

मागील पंधरा दिवसात डिझेलची अचानक मागणी वाढल्यामुळे डिझेलचा तुटवडा भासू लागला आहे. कंपन्याकडून सुरळीत डिझेलचा पुरवठा होत असून वाहनधारकांनी आवश्यक तेवढेच डिझेल भरावे असे आ-वाहन जिल्हा पुरवठा अधिकारी अप्पासाहेब पाटील यांनी केले आहे परंतु जिल्ह्यातील पेट्रोलपंपावर डिझेलसाठी शेतकऱ्यांसह वाहनांच्या रांगा कायम असल्याचे दिसत आहे.

जिल्ह्यात मागील पंधरा दिवसांपासून डिझेलची मागणी अचानक वाढली आहे. सध्या शेतीची कामे सुरू असून नांगरणी व इतर मशागतीची कामे ट्रॅक्टरद्वारे केली जात आहेत. हिंग-ोली जिल्ह्यामध्ये ८६ पेट्रोल पंप असून या ठिकाणावरून डिझेलची विक्री केली जाते. दररोज साधारणत: दोन ते सव्वा दोन लाख लिटर डिझेलची आवश्यकता भासते. त्यानुसार मनमाड, अकोला व सोलापूर येथील डिझेल कंपन्यांच्या डेपोवरून जिल्ह्यात डिझेलचा पुरवठा केला जातो. मात्र पंधरा दिवसात अचानक सव्वा तीन लाख ते साडेतीन लाख लिटर डिझेल दररोज लागत आहे. पंपावर ट्रॅक्टर चालकांची गर्दी होऊ लागली आहे. शेती मशागतीच्या कामामुळे ही गर्दी होत असल्याचे दिसत आहे. डिझेलची गरज व पुरवठा यामध्ये तफावत निर्माण झाल्यामुळे तुटवडा निर्माण झाला आहे. त्यातच सुट्टीच्या दिवशी डेपोवरून डिझेलचा पुरवठा केला जात नाही त्यामुळे डिझेल पुरवठ्यामध्ये सुट्टीच्या दिवशी खंड पडत आहे. याचाही परिणाम डिझेल पुरवठ्यावर होऊ लागला आहे.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सर्व डिझेल कंपन्यांच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधून तातडीने आवश्यक डिझेल पुरवठा करावा अशा सूचना दिल्या आहेत. त्यानुसार डिझेलचा पुरवठा होऊ लागला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील वाहन चालकांनी डिझेल घेण्यासाठी गर्दी करू नये. तसेच आवश्यक तेवढेच डिझेल खरेदी करावे. कंपन्याकडून दररोज डिझेल पुवठा होत असून पुढील काळात डिझेलचा पुरवठा सुरळीत होईल असेही जिल्हा पुरवठा अधिकारी पाटील यांनी सांगितले आहे.

दरम्यान, क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्यावतीने दि १९ मे रोजी डिझेल व पेट्रोल महागाई तसेच टंचाईच्या विरोधात गोरेगाव येथील चौफुली येथे आंदोलन करण्यात आले. महागाई कमी करून इंधन मुबलक उपलब्ध करून द्यावे अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनात गजानन कावरखे, नामदेव पतंगे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# अंत्योदय आणि एकात्म मानवतावादाचा विचार घराघरापर्यंत पोहोचवा-कराड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मे**



भारतीय जनता पक्ष हा केवळ सत्तेसाठी चालण-ारा पक्ष नसून तो एका विशिष्ट विचारधारेवर आधारलेला पक्ष आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मांडलेला अंत्योदय आणि एकात्म मानववाद हाच आमच्या कार्याचा मुख्य गाभा आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने ही विचारधारा आणि केंद्र सरकारच्या जनकल्याणकारी योजना घराघरात पोहोचवाव्यात असे प्रतिपादन माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी केले.

हिंगोली येथे आयोजित भाजपा कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षण कार्यशाळेत ते समारोपीय भाषणात ते बोलत होते. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी डॉ. कराड पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या अकरा वर्षांत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्यासाठी अनेक महत्त्वाच्या योजना राबविल्या आहेत. विरोधकांकडून होणारा अपप्रचार खोडून काढण्यासाठी कार्यकर्त्यांनी तंत्रज्ञान आणि सोशल मीडियाचा प्रभावी वापर करावा आणि प्रत्येक बुथ स्तरावर पक्षाची ताकद वाढवणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यशाळेत माजी जिल्हाध्यक्ष नितीन भुतडा,प्रदेश प्रवक्ता विनोद वाघ,भाजप नेते किरण पातुरकर,मराठवाडा संयोजक मनोज पांगरकर,प्रदेश प्रवक्ता किशोर शितोळे यांनी विविध तांत्रिक आणि राजकीय विषयांवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.या प्रसंगी खासदार रामराव वडकुते,आमदार तान्ह-ाजीराव मुटकुळे, आमदार डॉ. प्रज्ञाताई सातव, माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, जिल्हा संयोजक फुलाजीराव शिंदे, माजी जिल्हाध्यक्ष बाबाराव बांगर,उज्वलाताई तांभाळे शिवाजीराव मुटकुळे यांच्यासह जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उप-स्थित होते.

# म्हाडाला पत्रकारांच्या निवासस्थाना संदर्भात मुख्यमंत्र्यांचे आदेश, आ. मुटकुळेंच्या पत्रावर कार्यवाही

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मे**



पत्रकारांना गृहसंकुलासाठी जागा उपलब्ध करुन म्हाडा अंतर्गत घरे देणे संदर्भात आ.तान्हाजी मुटकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हाडाच्या मुख्य अधिकाऱ्यांना कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

आ.तान्हाजी मुटकुळे यांच्याकडे पत्रकार वेल्फेअर सोसायटीच्या वतीने पत्रकारांना जागा व घरे उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी चार एक्कर जागेचा प्रस्ताव तातडीने पाठविण्याचे आदेश जिल्हा प्रशासनास दिले होते. यानंतर जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी वरिष्ठाकडे हा प्रस्ताव पाठविला आहे. याच अनुषंगाने आ.तान्हाजी म ुटकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली होती. या पत्रात हिंगोलीतील परिसरातील विविध माध्यमाच्या प्रतिनिधींना निवास करिता पंतप्रधान आवास योजनेंतर्गत पत्रकार वेल्फ ेअर सोसायटी हिंगोलीच्या माध्यमातुन निवासासाठी घरांची मागणी करण्यात आली आहे. सदरील गृह निर्माणासाठी म हाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडाला) जागा उपलब्ध करुन देण्याचे जिल्हा प्रशासनाला आदेशीत करण्यात यावे. सदरील गृह संकुलासाठी सर्वे नं. ९९ मधील ४ एक्कर जमीन उपलब्ध करुन देण्यात यावी. याच बरोबर म्हाडा अंतर्गत हिंगोलीत कार्यरत पत्रकारांना घरे उपलब्ध करुन देण्याचे आदेशीत करण्यात यावे. तसेच अव्वर सचिव स्तरावर संबंधित यंत्रणेची बैठक घेवुन पत्रकारांच्या घराच्या मागणीची पुर्तता करण्यात यावी, अशी म ागणी आ.तान्हाजी मुटकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. यावरुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हाडाच्या मुख्य अधिकार्यांस कार्यवाही करावी असे आदेशित केले आहे. एकुणच आता लवकरच पत्रकारांच्या गृहसंकुलाचा प्रश्न मार्गी लागणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाचे व आ.तान्हाजी मुटकुळे यांच्या पाठपुराव्याचे पत्रकारांनी स्वागत केले आहे. यासंदर्भात लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व म हसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे बैठकही होणार आहे.

# जिल्हा परिषदेवर राष्ट्रवादीचा झेंडा फडकविणार- आ. राजू नवघरे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मे**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये हिंग-ोली जिल्हा परिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची एकहाती सत्ता आणायचीच, असा ठाम निर्धार आमदार राजू नवघरे यांनी व्यक्त केला आहे. हिंगोली येथील हॉटेल शिवलीला पॅलेसच्या सभागृहात रविवारी आयोजित राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हास्-तरीय कार्यकर्ते व पदाधिकारी मेळाव्यात ते बोलत होते.

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तसेच नवनिर्वाचित नगरसेवकांच्या सत्कारानिमित्त या भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला जिल्हाध्यक्ष अनिल पतंगे, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, प्रकाश थोरात, शेख निहायाल, कन्हैया बाहेती, संजय दराडे, शेख नांजिम, वसमतचे उपनगराध्यक्ष शेख इमरान, माजी नगराध्यक्ष राजू देशमुख, संचित गुंडेवार, रवींद्र गडदे, विकास शिंदे, सतीश टापरे, उत्तमराव पोले, हिंमत राठोड, वैशाली वाघ, विजय डोखळे यांच्यासह जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आमदार राजू नवघरे यांनी कार्यकर्त्यांचे कान टोचले. विनाकारण मुंबईला निवेदने घेऊन फिरणाऱ्या कार्यकर्त्यांनी आता गावपातळीवर पक्ष वाढवण्यासाठी ताकद पणाला लावावी, असा सज्जड दम त्यांनी दिला. जिल्ह्यात पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी आणि बुथ पातळी-वर व्यापक काम करण्यासाठी कार्यकर्त्यांना लागेल ती सर्व मदत देण्यास आपण तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पहिल्यांदाच जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीला मेळाव्याचे स्वरूप आले असून, हीच ताकद कायम ठेवून राष्ट्रवादीला जिल्ह्यात 'नंबर वन' बनवण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना जिल्हाध्यक्ष अनिल पतंगे यांनी स्पष्ट केले की, आगामी काळात प्रत्येकाच्या कामाचे योग्य मूल्यम ापन केले जाईल आणि पक्षशिस्त पाळणाऱ्यांनाच संधी दिली जाईल. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये संभाव्य उमेदवारांच्या कामाचा पूर्ण आढावा घेऊनच तिकिटांचे वाटप केले जाईल, असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले.

नवनिर्वाचित नगरसेवकांचा गौरव या मेळाव्याचे औचित्य साधून जिल्ह्यात नुकत्याच निवडून आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा म ान्यवरांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला.

या महत्त्वपूर्ण बैठकीचे सूत्रसंचालन संजय दराडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार रवींद्र गडदे यांनी मानले. या मेळाव्यामुळे हिंगोली जिल्ह्या-तील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये आगामी निवडणुकांसाठी नवा उत्साह संचारल्याचे पाहायला मिळत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### २६ मे ला सकल मातंग समाजाचा मोर्चा

हिंगोली- एक ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने अनुसूचित जाती-जमाती उपवर्गीकरण संदर्भात निर्देश राज्यांना दिले होते. त्या आधारावर महाराष्ट्र शासनाने सेवानिवृत्ती न्यायाधीश अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती गठीत केली होती. समितीला दोन वेळा मुदतवाढ देऊन संपूर्ण कामकाज पूर्ण करून समितीने सदरील आव्हाल शासनास सादर केला आहे दोन महिने उलटूनही त्यावर कुठलीच ठोस कारवाई महाराष्ट्र शासनाने केली नसल्याचे बाब मातंग समाजात उपेक्षित वंचित समाजाच्या निदर्शनास आली असून या घटकांमध्ये असंतोषाची लाट पसरली आहे या घटनेच्या निषेधार्थ हिंगोली जिल्ह्यात सकल मातंग समाजाने कंबर कसली असून हिंगोली जिल्ह्यातील सकल मातंग समाजाची मागणी आहे की तात्काळ उपवर्गीकरणाची घोषणा करावी या प्रमुख मागणीसाठी दिनांक २६/०५/२०२६ रोजी भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हा मोर्चा साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यापासून ते जिल्हाधिकाऱ्यावर धडकणार असल्याची माहिती सकल मातंग समाज अनुसूचित जाती उपवर्गीकरण कृती समिती हिंगोली यांनी दिली आहे.

### शनि महाराज जयंतीनिमित्त भव्य आरती



हिंगोली- येथील सराफा बाजारमधील शनी मंदिरात शनि महाराज जयंती निमित्त भव्य आरती. महाप्रसादाचा आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्रेयांश हलवाई यांच्या हस्ते शनी महाराज तेल अभिषेक करण्यात आले. संतांच्या उपस्थित भव्य आरती करण्यात आली. यावेळी पू. खुशालचंद महाराज काली माता मंदिर, विनायक महाराज बद्रीनारायण मंदिर प्रदीप धळवाई धळवाई हनुमान मंदिर, प्रल्हाद गुरु, अँड नंदकिशोर मुंदडा, राजेंद्र हलवाई, राजेश बांगर, विजय सराफ, प्रल्हाद माने, दिनेश बासटवार, अरविंद शाहू, नितीन शाहू, मनोज हलवाई गणेश बांगर,अंशू हलवाई, विजय हलवाई, श्याम खंडेलवाल, अर्जुन हलवाई, पुरुषोत्तम डोईफोडे, सर्वेश डोके, जतिन शाहू, कृष्णा अग्रवाल, आनंद अग्रवाल, गेंदू टाक व अनेक महिला भक्तगण उपस्थित होते.

### परभणी-हिंगोली विधानपरिषद कार्यक्रम जाहीर

हिंगोली- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या परभणी-हिंगोली स्थानिक प्राधिकारी मतदार संघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. सदरील निवडणूक कार्यक्रमानुसार परभणी-हिंगोली स्थानिक प्राधिकारी मतदार संघक्षेत्रात आचार संहिता लागू झाली आहे. यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने आज माहीती दिली.

# २२ मे ला पंडित दीनदयाल रोजगार मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ मे**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, हिंगोली यांच्या वतीने जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी दि. २२ मे २०२६ रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा तथा प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यात सेवा क्षेत्रातील नामांकित कंपनी व आस्थापना सहभागी होणार असून त्याम ध्ये कैरोस सेक्युरिटी हेल्थ अ‍ॅन्ड कॅम्पोसाईट सर्व्हिस प्रा. लि., सिकिंद्राबाद तसेच पलटन सेक्युरिटी फोर्स, हिंगोली या आस्थापनांचा समावेश आहे. संबंधित आस्थापनांकडून एकूण १०० रिक्त पदांची मागणी प्राप्त झाली असून उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येणार आहेत.

१० वी, १२ वी, पदवीधर तसेच इतर शैक्षणिक पात्रता असलेल्या नोकरी इच्छुक उमेदवारांना या रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी होता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी विभागाच्या संकेतस्थळावर रोजगार नोंदणी करून युजर आयडी व पासवर्डच्या माध्यमातून संबंधित रिक्त पदांसाठी ऑनलाईन अर्ज करावा.

त्यानंतर उमेदवारांनी दि. २२ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता शैक्षणिक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती व बायोडाटासह जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, एस-३, दुसरा मजला, हिंगोली येथे प्रत्यक्ष उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

रोजगार मेळाव्याबाबत अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४५६-२२४५७४ वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त बा. सु. मरे यांनी केले आहे.

# औंढा नागनाथ तहसील कार्यालयात राशन कार्ड देण्यास टाळाटाळ

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, १९ मे**




औंढा नागनाथ तह-सील कार्यालयात बऱ्याच दिवसापासून राशन कार्ड तसेच नवीन राशन कार्ड देण्यास टाळाटाळ होत आहे तहसील पुरवठा विभागात विचारले असता संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे दिले जातात राशन कार्डधारकांना तहसील विभागाचे खेटे मारावे लागत आहे. शेख नाजीम शेख सत्तार व शेख मोबीन शेख मुख्तार यांनी तहसीलदार यांना या संदर्भात निवेदन सादर केले आहे.

गोरगरीबांना राशन कार्डवर रास्त भाव दुकानांतून धान्य वाटप केले जाते परंतु औंढा नागनाथ तह-सीक कार्यालयात लाभार्थ्यांना राशन कार्ड तसेच नवीन राशन कार्ड मिळवण्यासाठी चकरा माराव्या लागत आहेत. शेख नाजीम सत्तार व शेख मोबीन यांनी निवेदनात नमुद केले आहे की, मागील एक वर्षापासून नवीन राशन कार्ड बनवण्यासाठी दिलेले आहे. राशन कार्ड बनवण्यासाठी सर्व कागदपत्राची पूर्तता सुद्धा केलेली आहे. तरीसुद्धा आम्ह-ाला मागील एक वर्षापासून राशन कार्ड देण्यात आलेले नाही व आम्हाला राशन भेटत नाही आम्ही वेळोवेळी तहसील कार्यालयात चकरा मारल्या परंतु येथे उडवा उडवीचे उत्तरे मि ळतात तरी आम्हाला लवकरात लवकर राशन कार्ड ऑनलाइन करून देण्यात यावे अशी मागणी केली आहे. राशन कार्ड संदर्भात आणि पुरवठा विभागात संबंधित वरिष्ठांनी लक्ष घालावे अशी म ागणी नागरिकांमधून होत आहे.

# रखडलेल्या विकासकामांवर उप नगराध्यक्ष आक्रमक

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १९ मे**



शहरातील रखडलेल्या व अपूर्ण विकासकामांवरून, उपनगराध्यक्ष सय्यद इमरान अली यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग वसमत कार्यालयाला थेट जाब विचारत सविस्तर माहितीची मागणी केली आहे. शहरातील प्रमुख रस्ते, दुभाजक, नाली व सुशोभीकरणाची कामे महिन-ोनमहिने बंद अवस्थेत पडून असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

लक्की हॉटेल ते मयूर मंगल कार्यालय मार्गावरील दुभाजक, रोड व नालीचे काम तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा (आसेगाव कॉर्नर) ते शासकीय फ ेडरेशन कौठा रोडपर्यंतचे दुभाजक व रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. अर्धवट काम, तुटलेले रस्ते, उघड्या नाल्या आणि धुळीमुळे नागरिक, वाहनधारक व व्यापाऱ्यांचे प्रचंड हाल होत आहेत.

उपनगराध्यक्षांनी मागितलेल्या माहितीत कामांचे अंदाजपत्रक, अंतिम मुदत, आजपर्यंत झा-लेले व बाकी असलेले काम, नाली व स्लॅबची माहिती, बॉक्स सेलचे इस्टिमेट, दुभाजकातील इलेक्ट्रिक पोल, झाडे, कटआऊट, रबर प्लास्टिक पेंट, साईड बोर्ड, पेव्हर ब्लॉक आणि स्पीड ब्रेकर यांचा संपूर्ण तपशील मागवला आहे.

विकासकामांच्या नावाखाली शहराची दुर्दशा सुरू आहे. जनता रोज त्रास सहन करत आहे. रखडलेली कामे तात्काळ पूर्ण झाली नाहीत तर लोकप्रतिनिधींसह तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही उपनगराध्यक्ष सय्यद इमरान अली यांनी दिला आहे. दरम्यान, कोट्यवधी रुपयांची विकासकामे अपूर्ण अवस्थेत का पडली? प्रशासन ठेकेदार संगनमत आहे का? आणि नागरिकांच्या पैशांचा हिशोब कोण देणार? असे सवाल आता जोर धरू लागले आहेत.